म. ग्रं. सं. ठाणें
प्रत्य ३५५
क्र. ३८५
१९६४

दक्षिणेची यात्रा-वर्णन

अर्थात्

प्रयाग-काशी-गया यात्रा

लेखक

दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी

संचालक : दत्तदिगंबर यात्रा कंपनी,
गोखलेहॉलसमोर, पुणें--२

REFBK-0014280

REFBK-0014280

मूल्य रु. १-५०

श्रीक्षेत्र काशी येथें तुम्ही कोठें उतराल ?

काशी महाराष्ट्र भवन

२९/१३ गणेशदीक्षित गल्ली, दुर्गाघाट, वाराणसी – १

त्रिस्थळी यात्रेस येणाऱ्या मंडळीच्या इच्छेनुरूप शास्त्रोक्त पद्धतीनें प्रयाग, काशी, गया या ठिकाणीं धार्मिककृत्यें संघातफें पार पाडलीं जातात. रहाण्याची, भोजनाचीहि व्यवस्था भवनांत केलेली आहे.

वेदाचार्य श्रीकृष्ण वामन देव
कार्यवाह, अ. भा. महाराष्ट्र तीर्थ पुरोहित संघ

काशी येथें जरतारी रेशमी माल कोठें खरेदी कराल ?

बनारस येथील रेशमी मालाचे प्रमुख व विश्वसनीय व्यापारी

दा म ले आ णि कं प नी

दुर्गाघाट, वाराणसी – १

यांच्याकडे बनारसी शालू, पैठण्या, फेटे, कद, साड्या, खण इत्यादि खात्रीचा माल योग्य भावांत मिळतो. जेव्हां काशीस याल त्या वेळीं आमच्या शो-रूमला जरूर भेट द्या.

पित्रयंची यात्रा

अर्थात्

प्रयाग • काशी • गया





— लेखक —

दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी

१९६४ ४०७४८ भे-प्रवास १।।८।६-६

त्रिस्थळी यात्रा-वर्णन

(अर्थात् प्रयाग, काशी, गया तीर्थवर्णन)

★

लेखक :

दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४०.८४८. दि: ..... दिवार
क्रमांक ..... नों दि 22.6.65

प्रस्तावना :

लक्ष्मण केशव तांबे



REFBK-0014280

REFBK-0014280

★

मूल्य रु. १-५०

अनुक्रमणिका

१.	प्रास्ताविक ...	...	१
२.	प्रयागतीर्थ ...	...	१७
३.	प्रयागांतील दर्शनीय स्थळें ...	...	२६
४.	श्रीक्षेत्र काशी ...	...	३६
५.	काशी येथील दर्शनीयस्थळें	...	४९
६.	द्वादश ज्योतिर्लिंगें ...	...	६२
७.	श्रीक्षेत्र गया ...	...	६५
८.	गयेंतील दर्शनीयस्थळें ...	...	६९
९.	श्राद्धविधि ...	...	७८
१०.	बुद्धगया ...	...	८३

या पुस्तकाचे सर्व प्रकारचे हक्क लेखकाच्या स्वाधीन

पुस्तक प्राप्तिस्थान :

दत्तदिगंबर यात्रा कंपनी, गोखले हॉलसमोर, पुणें २

प्रकाशक – सौ. सुशिला द. कुलकर्णी, ९२८ सदाशिव, 'श्रीदत्तनिवास', पुणें २
मुद्रक – अ. चिं. रायरीकर, स्वस्तिक मुद्रणालय, ४३८ शनवार, पुणें २
कव्हर छपाई – केसरी मुद्रणालय, नारायण पेठ, पुणें २

त्रिस्थळी यात्रिकांना प्रेमळ निरोप

माझे परममित्र व दत्तदिगंबर यात्रा कंपनीचे सुविख्यात संचालक श्री. दादासाहेब कुलकर्णी यांनीं प्रस्तुत त्रिस्थळी यात्रा-वर्णनाचें पुस्तक मोठ्या परिश्रमपूर्वक लिहिलें आहे. त्यांच्या यात्रा-कंपनीच्या वतीनें भारतांतील बहुसंख्य प्रेक्षणीय व पुण्यदायक क्षेत्रस्थळें पहावयाची उत्सुकता जरी अनेकांना सदैव असली तरी यात्रेनिमित्त आवश्यक असणाऱ्या खर्चाची तरतूद प्रत्येकाला करतां येण्याजोगी नाहीं. शिवाय तेवढ्या खर्चाची ऐपत असणारे भाग्यवान असोत अथवा पैशाच्या आभावीं मनाशीं हिंपुटी होऊन राहणारे मंदभाग असोत, अध्यात्मविद्येचें उत्पत्तिस्थान असणाऱ्या आपल्या प्राणप्रिय भारतांत ठिकठिकाणीं असणाऱ्या पुण्यक्षेत्रांची मिळेल तेवढी माहिती तरी निदान अवश्य मिळवावी, असें मात्र त्यांपैकीं सर्वांनाच सारखें वाटत असतें. कारण प्रवासाला निघणारांना प्रवासांत कोणकोणत्या स्थळीं जाऊन कसकसा कार्यक्रम पार पाडावयाचा याची अगाऊ कल्पना असावी हें ज्याप्रमाणें अगत्यपूर्वक वाटत असतें तद्वत प्रवासाला जातां न येणारी मंडळीहि प्रत्यक्ष जातां न आलें तरी निदान पुस्तकाच्या साधनानें कां होईना पण अपेक्षित स्थळांचीं शाब्दचित्रें अवलोकन करून आपआपले तात्कालिक समाधान करून घेत असतात. एवंच, स्थलवर्णनात्मक पुस्तकाची आवश्यकता सर्वांनाच सर्वकाल असते हें अगदीं उघड आहे.

श्रीदादासाहेबांनीं या पुस्तकांतील दिलेली सर्व माहिती जितकी अमोल तितकीच उद्बोधकहि आहे. प्रवासाची आत्यंतिक आवड असणाऱ्या दादासाहेबांनीं अनेक वेळां काशी-यात्रेस जाऊन या 'त्रिस्थळीं-यात्रा' पुस्तकांतील बरीचशी माहिती तपशीलवार गोळा केलेली आहे. मुख्यतः प्रयाग, काशी व गया या क्षेत्रांची माहिती यथानुक्रमें मिळवून यात्रिकांना सर्वतोपरी मार्गदर्शन व्हावें हा दादासाहेबांचा उद्देश त्यामुळें सफल होईल यांत शंका नाहीं.

श्री. दादासाहेबांच्या हातून एतद्विषयक ग्रंथनिर्मिति अशीच या पुढेंहि होवो. या कामीं त्यांनीं घेतलेल्या परिश्रमांचें चीज निश्चितच होईल असें मी आश्वासन देऊन मी माझें निरोप्याचें काम पूर्ण करतों.

– ल. के. तांबे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६०६४८ दिः २५.६.५५
आक्षेप ..... दि. ११.७.५८

त्रिस्थळी यात्रेस प्रस्थान ठेवण्यापूर्वी –

वास्तविक मी कांहीं लेखक नव्हे. केवळ दत्तदिगंबर यात्रा कंपनीचा संचालक या नात्यानें भारतांतील वेगवेगळ्या ठिकाणच्या सहली व यात्रा काढून त्या यशस्वी रीत्या पार पाडणें यांतच चित्तसर्वस्व वेंचणें हें मला शोभण्याजोगें. तरीहि लेखनाच्या प्रपंचांत मी उतरलोंच व हें ' **त्रिस्थळी-यात्रा** ' हें पुस्तक यथामती लिहून वाचकांना सुपूर्त करण्याचें धाष्टर्य मी आज करीत आहें.

सन १९४९ मध्यें दत्तदिगंबर यात्रा कंपनीची मी स्थापना केली. त्या गोष्टीस आतां पंधरा वर्षांचा काळ लोटला. तपश्चर्येच्या या कालांत तीर्थयात्रा करणाऱ्या प्रवाशांनां कोणत्या प्रकारची माहिती हवी असते, कोणत्या सूचना त्यांना करणें आवश्यक ठरते, कोणत्या गैरसमजापासून त्यांना परावृत्त करावें लागते व विशेषतः क्षेत्रदर्शनाबरोबरच देवदर्शनाचें नुसतें पुण्य पदरीं न पडतां निसर्गसौंदर्य व मानवी शिल्पकला यांच्या साहचर्यामुळें मानवी अंतःकरण व मन सात्त्विक आनंदानें कांठोकांठ कसें भरून जातें या किंवा अशा आशयाची सविस्तर चर्चा अहोरात्र मला करावी लागली. त्याच त्या गोष्टी यात्रिकाला पुनः पुनः सांगूनहि लक्षांत न राहण्याजोग्या असतात. म्हणून यात्रा कंपनीच्या माहितीपत्रकांत दर वेळीं त्या प्रसिद्ध करण्याची दक्षता मी बाळगली. पण माहितीपत्रक हें निव्वळ दत्तदिगंबर यात्रा कंपनीतर्फे ही काशीयात्रा करणाऱ्या मंडळीपुरतेंच मर्यादित असते. स्वतंत्रपणें त्रिस्थळीं यात्रेस जाऊं इच्छिणाऱ्या मंडळीसाठीं या त्रिस्थळी यात्रेचें पुरेशी माहिती असलेलें असें एखादें सर्वांगपूर्ण पुस्तक उपलब्ध होणें अत्यंत जरूरीचें होतें.

आपला संपूर्ण भारत विविध तीर्थक्षेत्रांनीं संपन्न असा देश आहे. ' काशीस जावें नित्य वदावें. ' आपल्या आयुष्यांत निदान एक वेळ तरी 'काशीयात्रा' घडावी असें प्रत्येक भारतीयास वाटतें. म्हणून काशी, प्रयाग, गया या तीन क्षेत्रांची यात्रा म्हणजे ' काशी त्रिस्थळी, यात्रा ' समजली जात असल्यामुळें या यात्रेची सविस्तर माहिती या पुस्तकांत दिलेली आहे. शिवाय आणखीहि कांहीं क्षेत्रांचें त्रोटक मार्गदर्शनहि केलेलें दिसेल.

गेल्या १५ वर्षांच्या तपस्यापूर्तीनंतर मजकडून ज्यानें हें लेखनपुष्प प्रकाशित करून घेतलें त्या श्रीदत्तप्रभूंच्या चरणावरच तें मी प्रथमतः वाहून मग आजच्या शुभदिनीं आपणांसारख्या रसिकांच्या हातीं देत आहें.

१५ ऑगस्ट १९६४

– द. दि. कुलकर्णी

प्रास्ताविक

प्रयाग, काशी व गया या तीन तीर्थांची यात्रा म्हणजेच त्रिस्थळी यात्रा होय. या यात्रेचे वर्णनास सुरुवात करण्यापूर्वी यात्रा म्हणजे कायं, तिचें महत्त्व, आवश्यकता वगैरेसंबंधीं थोडीशी चर्चा प्रारंभी करणें आवश्यक आहे. —लेखक

॥ वस्तू वाटे नवी जो अवड बहु तिची लोकरीती अशी ही ॥

वरील सुभाषित मानवी स्वभावालाच काय पण इतर जीव-सृष्टीलाही लागू पडतें. फक्त त्याचे व्यवहार व मानसिक भावना आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीं इतकेंच. असलेल्या परिस्थितींत नेहमीं कांहींना कांहीं तरी बदल हवा असतो असा मानवी स्वभाव आहे आणि तसा तो आहे म्हणूनच जिवन सुसह्य होतें. सृष्टीच्या घटनाही अशाच आहेत. जुनें नष्ट होणें व त्या ठिकाणीं नवीन येत रहाणें हा जो बदल आहे तो मानवाला जीवन उत्साहवर्धक होण्यास कारणीभूत होतो. तसं जर न घडतं तर किती अनवस्था प्रसंग उद्भवला असता व जिवन किती दुःसह, कंटाळवाणें व नीरस झालें असतें याची कल्पनाच करावी ! सुंदर बालकें, भरघोस तारूण्य व शरीर सौष्ठव, नवीन उमललेलीं फुलें, नवीन वनस्पती, ताजीं व टवटवीत झाडें, रुचकर मोहक ताजीं फळें; नवीन नवीन प्राण्यांची, कीटकांची यच्चयावत् सृष्टीची उत्पत्ति; वारंवार ऋतुमानांत, हवेंत होणारे बदल; हीं सर्व नाविन्याचीं उदाहरणें आहेत.

जुन्या चालीरीतींचीं वैशिष्ट्यें

याच क्रमानुसार असलेल्यांत बदल, रूचीपालट मानवाला हवा असतो आणि हा बदल श्रेष्ठच पाहीजे असें नाहीं, कनिष्कहि चालतो. बदल पाहिजे इतकेंच. पद्मिनीसारखी रूपखनी निजांगना पदरीं असतां खनी कुब्जेशीं नातें जोडूं इच्छीणारे निघतातच ना ? नेहमीं पंचपक्वान्नावर ताव मारणाऱ्या राजाला मधूनच कोंडाभाकरीची लज्जत चाखावीशी वाटतेच कीं नाहीं ? ही नाविन्याची आवड स्वैरगतीनें मानवी समाजांत वावरू लागल्यानें मानवानें आपल्या सुखाकारितांच निर्माण केलेली प्रगतीपर अशी कुटुंबसंस्था विस्कळीत होण्याचे मार्गास लागली आहे; हें आधुनिक दृश्य दृष्टीआड करतां येत नाहीं आणि त्यामुळें उत्तरोत्तर प्रापंचीक सुखाला ओहोटी लागली आहे. पाश्चात्य समाजामध्यें तर या नाविन्याचा अतिरेक होऊन अनेक संसार धुळीस मिळाले आहेत आणि त्याचेंच अंधानुकरण आमचे-कडे होऊं लागल्यानें तोच अनवस्था प्रसंग आमचेवर ओढवणार कीं काय अशी साधार भीति वाटूं लागली आहे. असें हें कालांतरानें कां होईना केव्हांतरी घडणारच याची जाणीव आमच्या पूर्वजांना पूर्वीच होती आणि म्हणून त्यांनीं नाविन्याचा अतिरेक होऊ नये म्हणून नाविन्यही साधावें व मानवी मनाला चांगल्या कार्यास गुंतवावें म्हणून सणवार, हव्यकव्य, लग्न मुंज, व्रतवैकल्यें, उपासतापास, कथाकीर्तनें, पुराणें, उत्सव, वानप्रस्थाश्रम, संन्यास, तीर्थयात्रा, देशपर्यटन आदींची योजना धर्मांतच करून टाकली. यामुळें मानवी दोषांचा परिहार होऊन ईश्वरपरायणही होतें. या अनेक कर्मकांडामुळें, नेहमीं चाललेल्या कंटाळवाण्या संथ जीवनामध्यें उत्साह निर्माण होतो. थोडक्यांत म्हणजे मानवी जीवन सुखावह होण्यासाठीं मन व शरीर तेजस्वी व कार्यक्षम असावयास पाहीजे आणि तें तसें होण्यासाठींच जुन्या चालीरीतींची योजना समाजनेत्यांनीं पूर्ण विचारांतीं आंखली आहे. पण त्यांतील मर्माबद्दल आपणांस अज्ञान असल्यामुळें आपण त्यांची उपेक्षा करतों व पर्यायानें सुख लोटून दुःख जवळ करतों.

तत्त्वांचा लोप व तपशिलांचा बडेजाव

याचा अर्थ तेंच तेंच कर्मकांड, पोथ्या पुराणें, कथा कीर्तनें, जपजाप्य, या जुन्या पुराण्या, आधुनिक कालांत टाकाऊ ठरलेल्या

गोष्टींना आम्ही अंधश्रद्धेनें, बुरसटलेल्या कल्पनेनें उजळा देऊं पहात आहोंत, असा नव्हे. वास्तविक खरं म्हटलं म्हणजे या टाकाऊ नव्हेतच. आपली त्याजकडे पहाण्याची दृष्टि विकृत झाली आहे; कारण जाणण्याची दृष्टि नष्ट झाली आहे. शिवाय आपल्या वागणुकींत थोतांड फार माजलें आहे; जागृत श्रद्धा नष्ट होऊन अंधश्रद्धा निर्माण झाली आहे, तत्त्वाचा लोप होऊन तपशीलाचा बडेजाव माजला आहे. प्रत्येक हिंदूच्या घरीं देव असतो, तुळस असते व गाय असते असें असूनही त्या घरांत द्वेष, कलह, मत्सर, दुःख, स्वार्थ, मारामाऱ्या इत्यादि दुर्गुणांचा बुजबुजाट का असावा ? जळीं, स्थळीं, काष्ठीं देव भरला आहे अशा तत्त्वज्ञानानें भारलेल्या ३३ कोटी हिंदूंजवळ ३३ कोटी देव असतां, जिथें तिथें त्यांची पीछेहाट कां ? त्यांचे संसार दुःखी कां ? कलह, खून, मारामाऱ्या, मत्सर, स्वार्थ, अप्रामाणिकपणा या दुर्गुणांनीं ते बुजबुजलेले कां ? जेथें तेथें प्रत्येक क्षेत्रांत त्यांची पीछेहाट कां ? अखिल विश्व व्यापून राहिलेला त्यांचा आर्यधर्म संकुचित होतहोत आतां केवळ भारतांतच आणि तोसुद्धां खंडित भारतांतच मलीन, तेजहीन, पराक्रमहीन, नामशेष होतो कीं काय अशा स्थितीला कां यावा ? या सर्व प्रश्नांचें उत्तर एकच. तत्त्व सुटलें, वरच्या फोलपटाला महत्त्व आलें. रामाची पूजा करावयाची पण रामाच्या गुणांबद्दल अज्ञान. राम एकपत्नी होता तर हा भक्त परदारासक्त. राम एकवचनी तर हा सकाळपासून संध्याकाळपर्यंत वचनभंगाचा विक्रम करीत असतो. राम शूर तर हा भेकड वगैरे. शंकराच्या देवळांत जाऊन अत्यंत भावनेनें दगडी नंदीच्या पायावर डोकें ठेवणारा हा भक्त आपल्या रोजच्या गाडीला जुंपलेल्या मूक सजीव नंदीला उपाशी मारतो, त्याचीं हाडें बाहेर काढतो व निर्दयपणें त्याला वागवितो. त्याला झोडपण्याचे वेळीं तर तें निर्जीव यंत्रच आहे असें समजतो. मग 'दया धर्म का मूल है' हें तत्त्व गेलें कोठें ? आणि मग रामाची पूजा ती कसली ? दगडाचीच पूजा ती ! मग हें ढोंग नव्हे काय ? सारा जन्म असत्य बोलण्यांत, खोट्या वजनमापांनीं, हिशेबांनीं लुबाडण्यांत, स्वार्थ साधण्यासाठीं वाटेल तें पाप करण्यांत घालवून मग प्रचंड देवालय बांधून त्यावर सोनेरी कळस चढवावयाचा ! अशी ढोंगी धर्मवृत्ति असल्यावर खरा धर्म नष्ट झाल्यास नवल नाहीं !

खरे यात्रेकरू

हें इतकें विवरण करण्याचा उद्देश एकच कीं, धर्मांत सांगितलेल्या गोष्टींचें मर्म जाणा. पोथ्या पुराणें कीर्तनें सगळेच ऐकतात पण शिवाजी महाराजांसारखें श्रोते किती निघतात ? मर्म जाणून कृतींत उतरविणारा विरळाच ! याच कल्पनेप्रमाणें आपल्या धर्मांत ' यात्रा ' सांगितल्या त्या अनेकांनीं केल्या व सध्यां करीत आहेत. पण यात्रेचा खरा अर्थ कोणी जाणला तर पाश्चात्यांनीं ! त्यांनीं सुद्धां विश्वयात्रा केल्या. अनेक संकटें सोसलीं. प्रतिकूल परिस्थितींत येईल त्या कष्टाला तोंड दिलें, साहस केलें पण अनुभव मिळविला, ज्ञान मिळविलें. नवीन मुलुखाची, लोकांची, त्यांच्या धर्माची, चालीरीतींची, वनस्पति, खनीज, जल या सर्व गोष्टींची माहीती मिळविली; आराखडे काढले, नकाशे काढले आणि पृथ्वी पादाक्रांत केली ! हे खरे यात्रेकरू.

धर्माच्या नांवावर दांभिकता

वरील विधानांशीं तुलना करतां आमचीं स्थिती काय आहे ? आम्ही कोठें आहोंत व कसे आहोंत ? अध्यात्मिक दृष्ट्या राहूं द्या पण पारमार्थिक दृष्ट्या तरी आम्ही अंतर्मुख दृष्टि करून आत्मनिरीक्षण केलें तर काय आढळतें ? मानवी प्राणि हा स्खलनशील आहे. क्षणोक्षणीं, पावलोंपावलीं, कळत न कळत आपल्या हातून पाप हें घडतच असतें मग जाणूनबुजून तर गोष्टच सोडा ! अशा स्थितींत पापाचें क्षालन होऊन चित्तशांती लाभावयाची कशी ? त्याकरितां शास्त्रकारांनीं जे अनेक पर्याय वा विधि सांगितले आहेत ते सर्वांगदृष्टीनें पूर्ण विचार करूनच सांगितले आहेत. यांतीलच यात्राविधी हा एक आहे. कुटुंबकलह, आपसांतील द्वेष इत्यादि दुर्गुणांचा आश्रय करीत बसण्यापेक्षां यात्रा केल्यानें पुण्यसंचय होऊन पापक्षालन होतें, चित्तशुद्धी होतें, नाना देश, मानवी स्वभाव, चालीरीती, निसर्ग सौंदर्य या सर्वांचा अनुभव मिळून ज्ञानोत्पत्ति होते आणि म्हणूनच धार्मिक दृष्ट्या कां होईना यात्रेच्या निमित्तानें प्रवास घडतो आणि प्रवासानें मनःशांती मिळते. मात्र वर विवेचन केलेली दृष्टि असावी, नाहींतर यात्रेला व्यवसाय बनविणारा वर्ग हल्लीं आहेच आणि तोही फार मोठ्या प्रमाणावर

आहे ! असला वर्ग परोपजीवी, सुखार्थी, स्वार्थी व विषयलंपटहि असतो. असले गलेलठ्ठ बोकेसंन्यासी यात्रेकरू म्हणून अंगाला राख फासून 'काशीसे आये है और रामेश्वरसे जाते है' असें म्हणत नानातऱ्हेचीं सोंगें काढून अज्ञ जनतेच्या धार्मिक अंधश्रद्धेचा फायदा घेऊन देशभर धुमाकूळ घालीत असतात. यांचें ध्येय एकच 'उदर निमित्तं बहु कृत वेषः'—कांहींही उद्योग न करतां—केवळ धर्माचें ढोंग करून—आळसांत कालक्रमणा करून हा पोटार्थी वर्ग निष्क्रियतेंत जगत असतो. अशा वर्गाला पोसणें हें समाजाला व त्याचबरोबर देशालाही घातक आहे पण हें अजूनही उमजत नाहीं, नव्हें, हें आम्ही उघड्या डोळ्यांनीं नुसतें पहात रहातों; याचा विचारही करीत नाहीं. पण आतां आपल्या समाजानें व त्याचबरोबर आपल्या सरकारनेंही या गोष्टीकडे कानाडोळा करूं नये व धर्माच्या नांवाखालीं निरुद्योगीपणानें जगण्याचा जो परीपाठ पडला आहे त्याला आळा घालावा. या वर्गाच्या व याचबरोबर यात्रेच्या ठिकाणच्या दलालांच्या गर्हणीय वर्तनामुळेंच सुशिक्षित समाजाची धर्मावरील श्रद्धा उडत चालली आहे. या पंडे लोकांनीं तर देवाचा धर्माच्या नांवावर नुसता बाजार मांडला आहे आणि तो आधुनिक चिकित्सक बुद्धीला किळसवाणा वाटतो.

यात्रेचें महत्त्व व तिचे प्रकार

'यात्रा' ही आपल्या हिंदुधर्मांत आहे असें नव्हे; सर्व धर्मांतच आहे. जेथें देव मानला जातो तेथें देवामागून धर्म आलाच आणि धर्म आहे तेथें यात्रा आहेच. यात्रेमुळें प्रवास घडतो आणि प्रवासामुळें देवदेवतांची माहिती होते. देवदेवतांच्या मागें इतिहास हा असतोच; त्यामुळें आपल्या प्राचीन इतिहासाची, पूर्वजांची माहीती होते. प्रवासाला अडचणी काय येतात, त्यांचें निवारण कसें करावें, मुख्य मुख्य यात्रांचें महत्त्व काय, यात्रा स्थापण्यांत पूर्वजांचा उद्देश काय, सुलभ मार्ग कोणचा, आवश्यक धार्मिक गोष्टी कोणत्या, आसपासचीं ऐतिहासिक स्थळें कोणतीं, सृष्टीसौंदर्याचे देखावे कोठें आहेत, एकंदर यात्रा किती आहेत, मार्ग किती, कोणते व कसकसे आहेत, वाटेंत व स्थानावर उतरण्याची सोय काय आहे व खाण्यापिण्याची स्थिती काय आहे; हवापाणी, लोकस्थिति, स्थान महात्म्य, विश्वरूप दर्शन, चमत्कार, आश्चर्यकारक

वस्तु, त्यांचे गुणधर्म वगैरे वगैरे अनेक गोष्टींचें यात्रेमुळें ज्ञान होतें आणि ज्ञानप्राप्ती म्हणजेच मोक्ष. देव मानणारे आस्तिक यात्रा करतात व पारमार्थिक दृष्टीनें ज्ञान मिळवितात, तर देव न मानणारे नांस्तिकहि यात्रा करतात व ऐहिक दृष्टीनें ज्ञान मिळवितात. त्यांचा उद्देश ज्ञानांत भर घालावी हाच असतो; म्हणून कोणी उत्तर ध्रुवाचा शोध करतो, तर कोणी जमिनींत खोल शिरत जातो, तर कोणी पर्वताच्या अत्युच्य शिखरावर जाऊं इच्छितो, तर कोणी महासागराचा तळ धुंडाळतो, तर कोणी अज्ञात प्रदेश हुडकून काढतो. तात्पर्य असे अचाट साहसी प्रयत्न केले जातात, हीहि एक यात्राच. सभा, सम्मेलनें, परिषदा, प्रदर्शनें यासुद्धां यात्राच, असें हें यात्रेचें महत्त्व आहे.

यात्रेचा अर्थ व फायदा

यात्रा करून काय फायदा ? यात्रा काय म्हाताऱ्या कोताऱ्यांनीं कराव्या, तरुणांचा तो विषय नव्हे; ही समजूत भ्रामक आहे. खरं म्हटलं तर मानवजातीवर ज्यांनीं अनंत उपकार करून ठेवले व करीत आहेत ते यात्रेकरू तरुणच होते. अपंग व गलीतगात्री नव्हते. तेव्हां शास्त्रकारांनीं ज्या उपयुक्त गोष्टी सांगितल्या आहेत त्या केवळ धार्मिक आहेत, जुन्या आहेत अतएव टाकाऊ आहेत असें समजूं नये. याची उपयुक्तता कालांतरानें कळेल; कारण हे करणारे व सांगणारे लोक वेडे नव्हते. आचारविचार, धार्मिक कृत्यें इ. ज्या गोष्टी आहेत त्यांतील हेतु समजून घ्यावा. मानवाच्या ऐहिक व पारमार्थिक कल्याणाकरितांच त्या पूर्वजांनीं केल्या आहेत. संसारसुद्धां एक यात्राच आहे. या संसारयात्रेचा प्रवास करीत असतांना थोडा विसावा मिळावा, थकवा नाहींसा व्हावा व पुन्हां जोमानें ही यात्रा करण्यास उत्साह यावा म्हणूनच या देवादिकांच्या यात्रांची योजना केलेली आहे; यामुळें कोते विचार, दुर्गुण, रागलोभादि विकार कमी होतात व संसारयात्रा सुखावह होते. शिवाय आणखी एक फायदा म्हणजे यात्रेंत पदोपदीं ईश्वराची साक्ष पटते व मन ईश्वरपरायण होतें.

हिंदुधर्माचें वैशिष्ट्य

पूर्वी सांगितलें आहेच कीं, नास्तिक असो, आस्तिक असो वा कोणत्याही धर्माचा असो तो यात्राप्रिय असतोच; कारण कितीही निर-

निराळे धर्म असले तरी प्रत्येक धर्मांत यात्रेचें महत्त्व आहेच. हिंदुधर्मांत तर फारच आहे; नुसतें फारच नव्हें तर रुचिवैचित्र्यपूर्वक आहे कारण हा धर्मच आहे असा आहे कीं, याच्यासारखा विशाल धर्म नाहीं. याला महासागराचीच उपमा शोभेल. खरा विश्वधर्म हिंदुधर्मच होऊं शकतो. हें आम्ही वृथा अगर अंध अभिमानानें म्हणत नाहीं. शांत मनानें विचार केल्यास या धर्मासारखा दसरा धर्म नाहीं हेंच पटेल. यांत काय नाहीं ? सर्व कांहीं आहे. प्रत्येकाच्या आवडीनिवडीनुसार आचारस्वातंत्र्य या धर्मांतच आहे. या धर्मांत मूर्तिपूजा करणाराही आहे तसा मूर्तीपूजा न मानणाराही आहे, यांत प्रपंच करणारा आहे तसा वैरागीही आहे, वैवाहिक आहे तसा ब्रह्मचारी आहे, सगुण भक्ति करणारा आहे तसा निर्गुणभक्ति करणाराही आहे, अत्यंत त्यागी आहे तसा अत्यंत भोगीहि आहे, एकेश्वरी आहे तसा अनेकेश्वरी आहे, पुण्यात्म्याला मोक्ष आहे तसेंच पापात्म्यालाही मुक्ती मिळण्याचें सुलभ साधन आहे; उभें गंध लावणारा, आडवें गंध लावणारा व मुळींच गंध न लावणारा या सर्वांचा समावेश यांत होतो. तात्पर्य प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार आचाराचें स्वातंत्र्य आहे आणि म्हणूनच या धर्माइतका विशाल व सहिष्णु धर्म दुसरा नाहीं. या सहिष्णु वृत्तिमुळेंच अनेक देव-देवता, पंथ, मतें, आचार; रानटी समाजापासून तों सुधारलेल्या समाजापर्यंतच्या धार्मिक समजुती या सर्वांबद्दल पूज्य भावना बाळगली जाते. गणेशभक्त कधीं दत्ताची मूर्ती दिसतांच नाक मुरडणार नाहीं उलट तितक्याच भक्तीभावानें हात जोडील; याला कारण या धर्माची शिकवणूकच अशी कीं, देव हा सर्वांठायीं भरला आहे. दत्त काय आणि गणेश काय हीं निरनिराळी आवडीनुसार निर्माण केलीं गेलेलीं रूपें आहेत. देव येथून तेथून एकच. 'आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरं ।' याप्रमाणें 'सर्वदेवं नमस्कारं । केशवं प्रतिगच्छति ॥' म्हणूनच या धर्माचें दुसऱ्या मताशी, पथाशीं, आचाराशीं वा धर्माशीं भांडण नाहीं. हा धर्म जबरदस्ती करीत नाहीं. सर्व धर्मातील तत्त्वें यांत असून यांत प्रत्येक व्यक्तीला आवडीनुसार वाव आहे म्हणूनच अनेक भक्तांनीं आपापल्या आवडीनुसार अनेक देवता निर्माण केल्या आणि त्यामुळें तितकीं तितकीं स्थानें व क्षेत्रें निर्माण झालीं; त्यामुळें सर्व भरतखंड या क्षेत्रांनीं व्यापलें गेलें. त्याचा फायदा म्हणजे तितक्या दूरपर्यंत प्रवास

होऊं लागले, ओळखी वाढल्या, परीचय झाले, चालीरीती समजल्या, धर्माचा प्रसार होण्यास मदत झाली व आपण फार दूर असलों तरी सर्व एक आहोंत ही भावना निर्माण होण्यास मदत झाली. हा या अनेक यात्रांचा मुख्य फायदा आहे. कांहीं लोकांना अशी शंका येते कीं, देव एक व धर्म एक तर इतक्या यात्रा निर्माण झाल्या कोठून व कशा-साठीं ? ही कल्पना आमचें मतें उष्टी आहे. इतर धर्मांचें जसें एक एकच क्षेत्र व एकेश्वरी मत आहे त्यावरून ही कल्पना सुचली गेलीसें दिसतें. पण हिंदुधर्मांचें वैशिष्ठ्य तर यांतच आहे आणि म्हणून या शंकेचें निरसन मुद्दाम करण्यासाठीं एवढा उहापोह केला आहे.

मुख्य मुख्य यात्रा

अष्टविनायक, चारधाम, बारा ज्योतिर्लिंगें, सप्तपुऱ्या, देवीचीं साडेतीन पीठें, पंच महासरोवरें, पंच केदार, पंच बदरी, त्रिस्थळी, पंच प्रयाग, पंच महातत्त्वें, चार आयुधें वगैरे इतक्या यात्रा सांगण्याचा उद्देश सर्व भरतखंड पाहिला जावा, परप्रांतीयांची माहीती, चालीरीती, उत्कृष्ट देखावे, कलाकौशल्य, अनेक चमत्कार, दृष्टीस पडावेत. गंगेची कावड रामेश्वरास व रामेश्वरचा सेतु गंगेंत त्रिवेणींत टाकावा याचा हेतु हाच आहे. आणखी विशेष म्हणजे याचा आनंद, अनुभव व भरपूर माहिती मिळवावयाची असेल तर यात्रा शक्यतों पायींच करावी. काटकपणासाठीं जोडासुद्धां वापरूं नये, अन्नछत्रांतील अन्न सेवू नये, भिक्षा मागूं नये तर उद्योग करीत करीत पैसे मिळवून पोट भरीत जावें; इत्यादि ज्या मूळ कल्पना आहेत त्यांतील हेतु उघड आहे. यात्रेच्या योगानें मनुष्य काटक, हुषार, चतुर व बहुश्रुत व्हावा. कोणी म्हणतील कीं, आतां आपलीं बरीच धार्मिक स्थानें परधर्मीयांच्या दुष्टाव्यानें भ्रष्ट झालीं तर आतां त्यांचें महत्त्व काय राहिलें ? शंका बरोबर, पण तितकीच अज्ञानमूलक. कारण मुख्यतः आधीं देव कधीं भ्रष्ट होतच नाहीं. ही कल्पनाच चुकीची. शिवाय आपल्या थोर शास्त्रकारांनीं असें प्रसंग उद्भवलेच तर काय करावें याचाहि यापूर्वीच दूर दृष्टीनें विचार करून पर्याय सांगून ठेवला आहे. कोणतीही वस्तू शुद्ध करण्याचें साधन म्हणजे मंत्र, पंचगव्य व गंगोदक; यामुळें मूळ कशाही व कोणत्याही परिस्थितींत कायम टिकविता येतें,

या अचूक व फार मोलाच्या तत्त्वामुळेंच या धर्मावर अनेक हल्लेघाले झाले, वावटळीं संकटें आलीं तरी त्या सर्वांना पुरून उरण्याइतका हा धर्म श्रेष्ठ ठरला आणि या चिवट व लवचिकपणामुळेंच पुढेंही कालांतरापर्यंत असा हा एकच धर्म कशाही प्रसंगाला तोंड देऊन टिकून राहील असा आत्मविश्वास वाटतो. ग्रीक, रोमन, मिसर, इराणीयन, खाल्डीयन, बाबीलोनियन इत्यादि अनेक संस्कृत्या निर्माण झाल्या व कालाच्या ओघांत नष्टहि झाल्या पण हिंदु संस्कृति मात्र अद्याप टिकूनच आहे.

सारांश मूळ कशाची जरूर असेल तर आपल्या धर्मावर आपली पूर्ण श्रद्धा पाहिजे. परधर्म कितीही मोहनीय वाटला तरी 'स्वधर्मे निधनं श्रेयः' हेंच तत्त्व लक्षांत बाळगावें. ही श्रद्धा टिकण्यासाठींच आपल्या पूर्वजांनीं स्नान-संध्या, कुलाचार, पूजा, व्रतें, वैकल्यें, उपवास; देवळें, तीर्थें, त्यांचे उत्सव; कथा, कीर्तनें पुराणें; यात्रा इत्यादींची योजना केली आहे.

प्रवासास सुदृढ प्रकृतीची जरूरी

आतांपर्यंत यात्रा करण्याचा उद्देश, यात्रेचें महत्त्व व यात्रा प्रवासापासून होणारे फायदे याचें विवेचन केलें. आतां यात्रेला निश्चित जावयाचें अशी आपल्या मनाची तयारी झाल्यानंतर काय काय तयारी लागते यांचेंहि ज्ञान असणें आवश्यक आहे. मनाची तयारी पूर्ण झाल्यानंतर आपली शरीरप्रकृति प्रवासास योग्य अशी बळकट आहे कीं कसें हें प्रथम पाहिलें पाहिजे. पूर्वीपेक्षां अलीकडच्या काळांत प्रवासाच्या साधनांत पुष्कळच क्रांति झाली असल्यानें आरामशीर प्रवास होण्यास बरेंच साह्य झालें आहे. त्यामुळें पूर्वीइतका खडतर प्रवास राहिला नाहीं. तथापि शरीरप्रकृति दणकट, निरोगी असणें हें पूर्वीइतकेंच आजही आवश्यक आहे. कारण प्रवासांत अन्नांत, हवेंत, पाण्यांत व शरीराच्या रोजच्या व्यवहारांत बदल होत असल्यानें त्याचे दुष्परिणाम बाधू नयेत इतपत सुदृढ प्रकृतीची फार आवश्यकता आहे. जरी आधुनिक प्रवासांत सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत तरी तो प्रवास आहे. वेळ आहे, प्रसंग आहे, अवचित अडचण उत्पन्न होण्याचा संभव असतो; म्हणून थंड पाण्याचें स्नान, पायीं चालण्याचा सराव; ऊन, पाऊस, वारा सोसणें; एका चटईवर निजणें, अर्धपोटीं रहातां येणें वगैरेची शरीराला संवय असणें चांगलें. याची आवश्यकता पूर्वीच्या

क्लेशदायक प्रवासांत होती आणि हल्लींच्या सुखसोयीयुक्त प्रवासांत नाहीं, असें समजण्याचें कारण नाहीं. यांचें महत्त्व पूर्वीइतकेंच आजही आहे. कारण पूर्वींचे प्रवास जसे खडतर तशी शरीरयष्टीहि दणधाकट होती; उलट हल्लीचे प्रवास जरी सुखकर झाले असले तरी त्या मानानें शरीर-यष्टीहि नाजूक बनली आहे.

बरोबर सामान काय घ्यावें ?

ज्या यात्रेस जावयाचें त्या स्थळाचा व मार्गाचा नकाशा, छापील पुस्तक-टिपण, जें शक्य असेल तें माहितीपूर्ण वाङ्मय घ्यावें. रेल्वे—मोटार आदि वहानांचें वेळापत्रक (टाईम टेबल), घड्याळ, जर्मन सिल्हरचें बंपर-वजा स्निग्ध मावण्यासारखें लांबोडें भांडें, पत्र्याच्या ट्रंकेऐवजीं कातडी बॅग—१५ शेर वजनापर्यंतची, वेळ प्रसंग पडल्यास हमाल न मिळाल्यास स्वतः नेता येण्यासारखी, ४×३ या आकाराचे मेणकापडाचे २ तुकडे घ्यावे. एक उष्णतेच्या जागीं मेणाची बाजू वर करून वापरतां येतो व दुसरा ओलाव्याच्या जागीं मेणाची बाजू खालीं करून वापरतां येतो. धाबळी, शाल यांसारखीं लोंकरीचीं वस्त्रें; नसल्यास घोंगडी. शक्य झाल्यास मेणकापडाचा डगलाही करून घ्यावा. जेवण करण्याकरितां एका डब्यांत मावतील अशा वाट्या, राजापुरी लोटा—भात करण्यास व पाणी काढण्यास असा—याचा दुहेरी उपयोग होतो. ताटली, लोखंडी पळी, ३० हात दोरी, घडीचा स्टोव्ह, स्टोव्हच्या पिना, वायसरचें रबर वगैरे साहित्य. आपल्या-जवळ नेहमी १।२ दिवसांचा शिधा असावा. तोंडी लावण्यासाठीं लोणचें, तिळकूट, तिखट, मेतकूट इत्यादि जिनसा बरोबर घेणें अधिक चांगलें.

सावधगिरीच्या सूचना

यात्रेला निघाल्यानंतर प्रवासांत सावधगिरीनें वागावें लागतें. त्या-संबंधीं कांहीं महत्त्वाच्या सूचना पुढीलप्रमाणें :—

(१) प्रवासांत अनोळखी वा अनधिकृत माणसाकडून रेल्वे गाडयांची, मोटारची, कोणत्याही मार्गाची वा इतर कसलीही माहिती घेऊं नये. (२) स्टेशन मास्तर, मोटारचे अधिकृत अधिकारी, खात्रीचा परिचीत मनुष्य व पोलीस यांजकडूनच माहिती घ्यावी. (३) आपण कोठें जाणार, कोठें उतरणार, बरोबर कोणकोण आहे, काय उद्देशानें आपण

जात आहों, आपला घरचा पत्ता, आपला गांव, घरीं माणसं कोणकोण आहेत, बरोबर काय काय सामान आहे, बरोबर पैसे किती घेतले आहेत, वाटेंत पैशाची कायकाय व्यवस्था केली आहे वगैरेसंबंधीं कोणाशीही त्यांतल्या त्यांत अनोळख्याशीं तर बिलकूल वाच्यता करूं नये.(४) वाहनांत बसण्यापूर्वी वा हमालाच्या हातीं सामान देण्यापूर्वी त्या वाहनाचा नंबर, हमालाचा नंबर प्रथम जरूर पहावा व लक्षांत ठेवावा. (५) रेल्वे, मोटार, बोट या वाहनांचें तिकीट नंबर तारीख व मार्ग टिपून ठेवावा.(६) माहितगार माणसाच्या मदतीशिवाय कोणत्याही ठिकाणीं, कोणत्याही रस्त्याला, सार्वजनिक जागा, धर्मशाळा वा हॉटेल वगैरे ठिकाणीं जाऊं नये. (७) धर्मशाळा बहुधा मोफत असतात पण सराईला भाडें असतें. धर्मशाळा गलिच्छ असतात, त्या मानानें सराई जरा स्वच्छ असतात. शिवाय स्वतंत्रापणें रहातां येतें. सोयीच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीनें सराईमध्येंच उतरावें (८) सार्वजनिक उघडया जागेपेक्षां स्वतंत्र खोली घेणें चांगलें. कुलूप लावतां येतें व सामान सुरक्षित राहतें. (९) केवळ प्रवासांतील ओळखीच्या भरंवशावर आपल्या स्वतंत्र खोलींत सहकारी घेऊं नये. (१०) बरोबरीचे पैसे सर्व एके ठिकाणीं ठेवूं नयेत. आपल्या निरनिराळ्या सामानांत व अंगावरील कपड्यांत शिवाय कनवटीला असे विभागलेले असावेत. तसेंच नोटा व नाणें मोडीच्या स्वरूपांत घ्यावें. (११) मोड जपून वापरावी. संपवूं नये. नाहींतर रुपयाचे १५ आणे व दहा रुपयांच्या नोटीचे नऊ रुपये घेण्याचा बांका प्रसंग येऊन ठेपतो. (१२) जरूर लागलीच तर मोडीकरतां वटाव देण्याऐवजीं एखादी लहानशी गरजू वस्तु घ्यावी म्हणजे मोडीचें काम भागतें. (१३) शक्य तों आपण अनभिज्ञ, नवखे वा यात्रेकरू आहोंत असें भासवूं नये. (१४) अंगावरील पोषाखांत वरचेवर काढण्यासाठीं ४।५ रुपयांपेक्षां जास्त रक्कम ठेवूं नये. बाकीची रक्कम अंगावरील पोषाखांतच पण दुसऱ्या खिशांत ठेवावी व ती सहसा दुसऱ्याच्या देखत बाहेर काढूं नये. (१५) जरूर पडल्यास उपयोग व्हावा म्हणून वाटेंत २।३ ठिकाणें आगाऊच ठरवून ठेवावींत कीं जेथून पैशाची व्यवस्था त्वरीत होऊं शकेल किंवा घरून ताबडतोब व्यवस्था होईल अशी योजना निघण्यापूर्वीच करून ठेवावी. (१६) बरोबर रकमेची जोखीम बाळगण्यापेक्षां

ठिकठिकाणच्या बँकेवरचे ड्राफ्ट घ्यावेत. (१७) बँकेशीं, पोस्टाशीं वा पोलीसशीं संबंध आल्यास ओळखीच्या पुराव्यासाठीं अडचण जाते; म्हणून निघतांना बरोबर नामांकित लोकांचीं पत्रें किंवा सरकारी अधिकाऱ्यांचीं पत्रें–सोबत आपला फोटो असलेलीं, किंवा आपणाला ठिकठिकाणाहून आलेलीं आपलीं खाजगी नातलगांचीं पत्रें जवळ ठेवावींत. या खबरदारीनें निष्कारण होणारा त्रास, वेळ, खर्च वांचतो. (१८) प्रकृति नीट राहाण्याच्या दृष्टीनें एकसारखा प्रवास करूं नये; म्हणजे दोनदोन तीनतीन दिवस स्नान-भोजनाविरहित काढूं नयेत. निदान सकाळीं १० ते दुपारीं २ पर्यंतच्या काळांत सोयीस्कर ठिकाणीं स्नानभोजनाचा कार्यक्रम उरकावा. दिवसांतून एकदां कां होईना पण असें वेळेवर चांगलें भोजन झालें म्हणजे प्रकृति सहसा बिघडत नाहीं. (१९) प्रवासांत दुकानांतून मिळणारे तेलकट, तिखट, आंबट घाणेरडे पदार्थ वाटेंत घेण्याचा व वेळीं अवेळीं खात राहाण्याचा मोह होतो तो टाळावा. (२०) शक्य तों एकभुक्त रहावें म्हणजे प्रकृति निकोप रहाते. (२१) अनोळखी माणसानें कितीही आदरानें वा प्रेमानें कांहींही खाण्यास दिलें–अगदीं देवाचा प्रसाद म्हणून–तरी तें शक्य तों टाळावें. (२२) ज्या बाजूचा प्रवास असेल त्या बाजूच्या प्रवासाच्या वेळचें हवामान लक्षांत घेऊन त्याप्रमाणें सोबत गरम वा हलके कपडे घ्यावेत. कपडे अगदीं जरूरीपेक्षां फार असूं नयेत; नाहींतर संभाळण्याला व ओझ्याला त्रासदायक होतात. (२३) प्रवासांत ठिकठिकाणीं हवापाणी बदलणार या दृष्टीनें प्रकृतीमानांत किंचित का होईना फरक होण्याचा संभव असतो. त्याकरितां प्रथमोचाराचीं कांहीं तयार औषधें जवळ बाळगावींत. (२४) एकंदरींत प्रवासांत जिथेंतिथें अत्यंत सावधानतेनें वागावें; नाहींतर सर्वस्वीं नागविलें जाण्याचा संभव असतो आणि दुर्दैवानें असा प्रसंग ओढावलाच तर निदान कनवटीला तरी २-३ रुपये जरूर असावेत.

आतांपर्यंत सर्वसाधारण यात्रा या विषयासंबंधी व तदनुषंगिक जे विषय येतात त्यासंबंधीं उहापोह केला. पूर्वीच्या कालांतील पदयात्रा किंवा बैलगाडी यात्रा आणि हल्लींच्या यांत्रिक युगांतील आधुनिक गतिमान वाहनांतील यात्रा यांत जमीन अस्मानाचें अंतर सर्वच दृष्टीनें आहे. त्यामुळें

वरील सर्वच वर्णन हल्लींच्या प्रवासाला लागू पडेलच असें नसलें तरी पूर्वीच्या काय किंवा हल्लींच्या काय प्रवासांत कांहीं बाबी सामान्य असतातच व त्या कोणत्याही काळीं राहाणारच; यादृष्टीनें जरूर तो फरक करावा इतकेंच. कारण आतां सरकारनेंही प्रवासी लोकांच्या सुखसोयीकडे लक्ष देण्याचें ठरविलें असल्यानें, शिवाय निरनिराळ्या यात्रा व प्रवासी कंपन्याही निघाल्या असून त्या आपल्याकडून प्रवासीलोकांचा प्रवास शक्य तों अधिकाधिक सुखकर व्हावा म्हणून झटत असल्यानें, आतां प्रवास पूर्वीइतका त्रासदायक राहिला नाहीं.

हें सर्वसामान्य विवेचन झाल्यावर आतां आपल्या मुख्य विषयाकडे वळूं. वर सांगितलेंच आहे कीं आपल्या शास्त्रकारांनीं अनेक देवदेवतांच्या महात्म्यानुसार ठिकठिकाणीं क्षेत्रांची योजना केली आहे. बारा ज्योतिर्लिंगें, सप्तपुऱ्या, देवीचीं साडेतीन पीठें, अष्टविनायक, त्रिस्थळी, चार धाम, पंच महासरोवरें, पंच केदार, पंच बदरी, पंच प्रयाग, पंच महातत्त्वें, चतुरायुध क्षेत्रें, दत्तक्षेत्रें इत्यादी अनेक क्षेत्रें आहेत.

बारा ज्योतिर्लिंगें:—सोमनाथ (वेरावळ बंदर—सौराष्ट्र), मल्लिकार्जुन (कृष्णा स्टेशन—हैदराबाद राज्य), महांकाळेश्वर (उज्जैन), ओंकार अमलेश्वर व ओंकारमांधाता (मोरटक्का स्टेशन—माळवा), परळी वैजनाथ (परभणी स्टेशन—हैदराबाद राज्य), भीमाशंकर (जुन्नर—पुणें जिल्हा), रामेश्वर (मद्रास प्रांत), औंढ्या नागनाथ (चौडी स्टेशन—हैदराबाद राज्य), विश्वनाथ (काशी—उत्तर प्रदेश), त्र्यंबकेश्वर (नाशीक—मुंबई राज्य), केदारेश्वर (गढवाल जिल्हा—हिमाचल प्रदेश), घृष्णेश्वर (औरंगाबाद स्टेशन—हैदराबाद राज्य).

सप्तपुऱ्या:—अयोध्या (उत्तर प्रदेश), मथुरा (उत्तर प्रदेश), हरिद्वार (उत्तर प्रदेश), काशी (उत्तर प्रदेश) कांचीवरं (मद्रास राज्य), उज्जैन (मध्यभारत), द्वारका (द्वारका स्टेशन—सौराष्ट्र).

देवीची साडेतीन पीठें:—तुळजापूर (सोलापूर), करवीर (कोल्हापूर), माहूर (दारव्हा—मध्य प्रदेश), सप्तशृंग (नाशीक—मुंबई राज्य).

अष्टविनायक:—गणनायक (मोरगांव—जेजुरीजवळ—पुणें जिल्हा), सिद्धीविनायक (सिद्धटेक—बोरीवेल स्टेशन—नगर जिल्हा), बल्लाळेश्वर

(पाली–कुलाबा जिल्हा), विनायक (मढ–डोलवली स्टेशन–कुलाबा जिल्हा), चिंतामणी (थेऊर–पुणें जिल्हा), गिरीजात्मक (लेण्याद्री–जुन्नरजवळ–पुणें जिल्हा), विघ्नेश्वर (ओझर–खेडजवळ, पुणें जिल्हा), गणपति (रांजणगांव–शिरूरजवळ, पुणें जिल्हा).

त्रिस्थळी:—प्रयाग (अलाहाबाद–उत्तर प्रदेश), काशी (बनारस–उत्तर प्रदेश), गया (बिहार प्रदेश).

चार धाम:—बदरीनारायण (हिमालय), द्वारका, रामेश्वर, जगन्नाथ (ओरिसा).

पंचमहासरोवरें:—बिंदु (सिद्धपूर–सौराष्ट्र), नारायण (कच्छ मांडवी–काठेवाड), पंपा (हॉसपेट स्टेशन–मुंबई राज्य), पुष्कर (अजमीर स्टेशन–सौराष्ट्र), मानस (हिमालय).

पंचकेदार:—केदार, ममद, तुंग, रुद व कोदाद हीं पांच बदरी रस्त्यावर (हिमालय) आहेत.

पंचबदरी:—योग, राज, आदि, वृद्ध व ध्यानबदरी या पांच बदरीनारायणाचे (हिमालय) रस्त्यावर आहेत.

पंचप्रयाग:—नंद, देव, रुद्र, विष्णु व कर्ण हे सर्व बदरी-नारायणाचे रस्त्यावर आहेत.

पंचमहातत्त्वें:—पृथ्वी–कांची (मद्रास राज्य), आप–जंबुकेश्वर (श्रीरंगम रोड स्टेशन–मद्रास राज्य), तेज–अरुणाचल (तिरुवन्ना–मालाय स्टेशन–मद्रास राज्य), वायु–कालहस्ती (गुडूर स्टेशन–मद्रास राज्य), आकाश–चिदांबर (मद्रास राज्य).

चतुरायुध क्षेत्रें:—शंख–जगन्नाथ, चक्र–भुवनेश्वर, गदा (वैतरणी रोड स्टेशन), पद्म–मैत्रावन. हीं पांची जगन्नाथाच्या परीसरांत आहेत (ओरीसा राज्य).

दत्त क्षेत्रें:—गाणगापूर, नरसोबावाडी (जयसिंगपूर स्टेशन) व औदुंबर (भिलवडी स्टेशन) हीं तीनही मुंबई राज्यांत आहेत.

मुख्य क्षेत्रांची त्रोटक यादी

गोकर्ण महाबळेश्वर, वाई, धावडशी, महाबळेश्वर, नाशीक, देहू, आळंदी, सज्जनगड, परशुराम, पुळें, पंढरपूर, बार्शी, गाणगापूर, औदुंबर, नरसोबावाडी, जेजुरी, माहूर, तुळजापूर, त्र्यंबकेश्वर, पैठण, केडगांव, चिंचवड, कनकेश्वर, पारसनाथ, महालक्ष्मी, शृंगेरी, सिद्धेश्वर, सोमेश्वर, हरेश्वर, वीरेश्वर, चित्रकूट, गिरीबालाजी, मदुरा—मिनाक्षी, पक्षीतीर्थ, मलंगड, हंपी-विरुपाक्ष, रामेश्वर, धनुष्यकोटी, कार्तिकस्वामी, हरीहर, सुदामपुरी, डाकूर, मातुगया, गिरनार, उज्जैन, वज्राबाई, जोगाईअंबा, कुरुक्षेत्र, इंद्रप्रस्थ, मथुरा, पुष्करतीर्थ, कनकादित्य, ज्वालामुखी, महाकाली, पशुपतेश्वर, महासरस्वती, हरिद्वार, ऋषिकेश, गंगोत्री, जम्नोत्री, गुप्तकाशी, त्रिजुगीनारायण, उखीमठ, जोतिर्मठ, अमरनाथ इत्यादी. यादी द्यावी तेवढी थोडी आहे.

ठळक ठळक क्षेत्रांचीं नांवें वर दिलीं आहेत. यांशिवाय बारीकसारीक सर्व क्षेत्रांची यादी केली तर. सहस्रांचे वर जाईल. स्थानमहात्म्याप्रमाणें प्रत्येक गांवांत, जिल्ह्यांत, प्रांतांत, राज्यांत अगर अखिल भारतांत त्याची प्रसिद्धी असते. यावरून आपल्या पूर्वजांनीं हीं धार्मिक स्थानें किती दूर-दृष्टीनें निर्माण केलीं आहेत याची कल्पना येते. सबंध देशाचा प्रवास घडतो. वास्तविक देव जळीं, स्थळीं, काष्ठीं, ब्रह्मांडीं, पाषाणीं सर्व ठिकाणीं आहेच. बसल्या जागींसुद्धां तो आहेच. मग या क्षेत्रांची जरूरीच काय? पण त्यांतही अर्थ आहे. त्यांना महत्त्व आहे. दत्त, राम, कृष्ण, हनुमान, शंकर, विष्णु, ब्रह्मा, या अनेक रुपांनीं देवाचें अस्तित्व सर्वत्र आहे. पण देव येथूनतेथून एकच. यामुळें 'आकाशात् पतितं तोयं । यथागच्छति सागरं' याप्रमाणें कोणत्याहि देवाची भक्ति एका देवालाच—केशवाला—पोंचते. त्यामुळें बसल्या जागीं देवाचें पूजन होऊं शकते, त्याला प्रवासाची जरूरी नाहीं. पण तसें देवस्थानचें नाहीं. अनेक देवांचीं अनेक स्थानें हीं भिन्न भिन्न असून भिन्न भिन्न ठिकाणीं असतात. त्यांचें दर्शन व आनंद विविध असणार. तो बसल्या जागीं मिळणार नाहीं. म्हणून त्याला प्रवासाची आवश्यकता आहेच. शिवाय 'कलौ स्थानानि पूजयेत्' कलि-युगांत देवापेक्षां स्थानाचेंच महात्म्य आहे.

मुख्य मुख्य प्रसिद्ध व महत्त्वाचीं पण बरीचशीं क्षेत्रें यांची माहिती पुस्तक रूपानें एकत्रित करण्याचें ठरविलें आहे. हा उपक्रम सर्वांस पसंत पडेल या हेतूनेंच हे श्रम घेण्याचें ठरविलें आहे बहुतेक शक्यतों सर्व क्षेत्रांची माहिती यावी असा विचार आहे पण त्याला श्रमही फार लागतील. शिवाय तितकी अधिकृत माहितीहि मिळाली पाहिजे. तशी ती मिळाल्यास त्याचा उपयोग करूंच. ही माहिती 'यात्रा वर्णन माला' या सदराखालीं एकत्रित करण्याचा विचार आहे. या योजनेनुसार या यात्रांपैकीं **त्रिस्थळी** यात्रेचें वर्णन पुष्प १ लें म्हणून देण्याचें ठरविलें आहे. हें वर्णन किंवा पुढील अन्य क्षेत्रांचीं वर्णनें देतांना माझा दृष्टीकोन काय आहे, त्याचें थोडेसें दिग्दर्शन करतों. यात्रांचीं वा क्षेत्रांचीं वर्णनें पुष्कळांनीं आजपर्यंत केलीं आहेत पण त्यांमध्यें व या वर्णनांत थोडासा फरक राहणार आहे. इतर ठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या वर्णनांत प्रत्यक्ष प्रवास करतांना आलेले अनेक अनुभव, अडचणी, बारीकसारीक गोष्टी, ओळखी, त्यांचे पत्ते, प्रत्यक्ष ओढवलेले विचित्र प्रसंग असें प्रवासात्मक चटकदार वर्णन असतें, परंतु या योजलेल्या वर्णनांत तशी ती दृष्टि नसून फक्त आवश्यक ती माहितीच देण्याचें ठरविलें आहे. वर्णनच करावयाचें तर तें अनेक दृष्टीनें करतां येतें. उदाहरणार्थ---एखाद्या क्षेत्राच वर्णन द्यावयाचें तर त्यांत त्याची प्राचीन पूर्वपीठिका, स्थापना कोणी केली, केव्हां केली, त्या राजाचा काळ, त्या राज्याचें वर्णन, त्याची शासन व्यवस्था, त्याच्या लढाया-स्वाऱ्या, त्यामुळें झालेले परिणाम, तेथील लोकांची भाषा, सामाजिक चालीरीति, सण, पोषाख, समजुती, त्यांतील स्थित्यंतरें वगैरेचा आढावा घेत घेत आज त्याची स्थिती काय आहे, अशी कां झाली व पुढें त्यांत काय काय बदल होत आहेत वगैरे अनेक विषय येतात. इतक्या सर्वांचा परामर्श जरी थोडक्यांत घेतों म्हटलें तरी त्याचें एक छोटेसें स्वतंत्र पुस्तकच होईल. सर्वसाधारण माणसाला काय पाहिजे व काय जरूर आहे याचा विचार करतां हें सर्व अनवश्यक ठरतें. फक्त महत्त्वाची माहिती कळण्याकडेच त्याची प्रवृत्ति असते आणि ती तशी पुरविण्याचीच दृष्टि या वर्णनांत ठेवली आहे. इतका खुलासा करून त्रिस्थळीपैकीं प्रयाग या क्षेत्राचें वर्णन पुढें देत आहे.

प्र या ग ती र्थ

तीर्थानां परमं तीर्थं नदीनां परमा नदी ।
मोक्षदा सर्वभूतानां महापातकिनामपि ॥
गंगाद्वारे प्रयागेच गंगासागरसंगमे ।
तत्रस्नात्वा दिवं याति येमृताऽस्ते पुनर्भवाः ॥

—मत्स्यपुराण.

आपल्या धर्मशास्त्रांत जीं कांहीं क्षेत्रें मोक्षसाधनें म्हणून दिलीं आहेत, त्यांपैकीं सर्व तीर्थांत प्रमुख असें, नद्यांमध्यें सर्वश्रेष्ठ अशा गंगा-नदीच्या तिरीं असलेलें; गंगा, यमुना सरस्वती यांच्या संगमामुळें पवित्र झालेलें व महापातकांचाहि नाश करून मोक्ष प्राप्त करून देणारें; असें जें पवित्र ठिकाण प्रयाग तीर्थ, त्याला "तीर्थराज" म्हणून म्हटलें आहे.

प्रयाग, काशी व गया या तीन स्थळांची यात्रा म्हणजे त्रिस्थळी यात्रा. सर्व क्षेत्रांत व यात्रांत त्रिस्थळी यात्रा ही भाविक हिंदूंच्या दृष्टीनें फार महत्त्वाची आहे. पूर्वापार अशी समजूत होऊन बसली आहे कीं, नुसतीच त्रिस्थळी यात्रा न घडतां आपल्याला काशींत मरण यावें व आपल्या अस्थि गंगेंत पडाव्या. या हेतूस्तव कित्येक भाविक वृद्धपणीं शेष आयुष्य काशीला घालवीत तर कित्येकजण प्रयागच्या संगमांत किंवा काशिच्या ज्ञानवापींत जलसमाधि घेत. अशा या त्रिस्थळीची यात्रा प्रथम

प्रय.ग, नंतर काशी व नंतर गया याप्रमाणें पुरी होते. अशा यात्रा पूर्वी पायीं, पालखीनें किंवा बैलगाडीनें करीत असत आणि त्याला वर्ष-सहा महिने लागत. पूर्वी जितके महिने लागत असत, तेथें आतां तितके दिवस लागतात; इतका प्रवास आतां सोयीचा झालेला आहे.

प्रवासाचा काल

साधारणतः प्रयाग, काशी, गया ह्या त्रिस्थळी यात्रेचा प्रवास-काल म्हणजे माघ महिना. हा सर्व दृष्टीनें सोयीस्कर असतो. उत्तर भारतांमध्यें उन्हाळ्यांत उन्हाळा भरपूर, थंडीच्या मोसमांत थंडीहि भरपूर व पावसाळ्यांत पाऊसहि मोठ्या प्रमाणांत असतो; त्यामुळें माघ महिना म्हणजे थंडीच्या मोसमाचा शेवट व उन्हाळ्यास नुकतीच सुरुवात असल्यामुळें आपल्या इकडील मंडळींना त्रिस्थळी यात्रेस हीच वेळ हवामानाच्या दृष्टीनें योग्य असते. प्रयागची मुख्य यात्रा म्हणजे "माघी–मेळा" हाहि याच वेळीं भरत असतो.

त्रिस्थळी यात्रेचा खर्च

साधारणतः मध्यमवर्गीय मनुष्यास या त्रिस्थळी यात्रेचा कमींत कमी अंदाजें रेल्वे-मोटार इत्यादि प्रवास खर्च व प्रयाग, काशी, गया या त्रिस्थळींच्या ठिकाणीं करावा लागणारा धार्मिक विधींचा खर्च, हा सर्व विचारांत घेतल्यास रुपये २०० पर्यंत येईल. पति-पत्नि मिळून यात्रा केल्यास प्रयाग मुक्कामीं कराव्या लागणाऱ्या अधिक विधींचा खर्च विचारांत घेतां तो उभयतांचा मिळून अंदाजें रु. ५०० येईल.

मुदत

त्रिस्थळी यात्रा करण्यासाठीं पुण्याहून निघावयाचें म्हटल्यास प्रवासास जातां-येतांचे ६ दिवस लागतात: तिन्ही क्षेत्रांचीं धार्मिक कृत्यें थोडक्यांत आटोपून प्रत्येक क्षेत्राचीं दर्शनीय स्थानें व प्रेक्षणीय स्थळें पहावयाचीं म्हटल्यास प्रयागला ३ दिवस, काशीक्षेत्रीं ५ दिवस व गयेला ३ दिवस तरी वास करणें आवश्यक आहे. असे एकूण १७ दिवस ह्या यात्रेस कमींत कमी पाहिजेत.

त्रिस्थळी यात्रेचा मार्ग

ह्या यात्रेसाठीं पुण्याहून निघावयाचें ठरविल्यास पुण्याहून कल्याण-मार्गें जाणें अधिक सोयीस्कर आहे. गाडींत चांगली जागा मिळण्यासाठीं



ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम....६०५४६..... दिः .....६-१२-८१.....

कल्याणऐवजीं मुंबईस जाऊन गाडींत बसणें अधिक चांगलें. पुण्याहून जी गाडी रात्रीं १० वाजतां मनमाड पॅसेंजर म्हणून सुटते, ती मुंबईस पहाटें ४ वाजतां पोहोंचते. मुंबईहून काशी एक्सप्रेस नांवाची गाडी सकाळीं ६–२५ ला सुटते, ती कल्याणला एक तासानें म्हणजे सकाळीं ७–२५ ला येते. ही गाडी त्रिस्थळी यात्रेकरूंकरितां रेल्वे कंपनीनें मुद्दाम ठेवली आहे. कारण ह्या गाड़ीनें नाशिक, भुसावळ, इटारसी, जबलपूर मार्गें अलाहाबाद (प्रयाग) क्षेत्रीं दुसरे दिवशीं सकाळीं ७–१५ वाजतां यात्रिक पोहोंचूं शकतो. गाडी कोठेंहि बदलावी लागत नसल्यामुळें सुरुवातीसच मुंबईस योग्य अशी जागा मिळवून बसणें अधिक सुखावह होतें. तसेंच ह्या यात्रेहून परततांनाहि गयेहून मोगलसराई स्टेशनवर आल्यावर हीच गाडी परतीच्या प्रवासास योजावी; कारण ही गाडी मोगलसराई या जंक्शनवरूनच सायंकाळीं ३ वाजतां सुटते व ती कल्याणला दुसरे दिवशीं रात्रीं ९ वाजतां व मुंबईस रात्रीं १० वाजतां पोहोंचते. मुंबईहून ११-२० ला जी गाडी आहे ती पुण्यास पहाटें ४।।। वाजतां पोहोंचते. सोबतच्या नकाशावरून या त्रिस्थळी यात्रेच्या मार्गाची आपणांस बरोबर कल्पना येईल.

मार्गांतील कांहीं प्रमुख स्थळें

त्रिस्थळी यात्रेस जातांना व यात्रा करून परत येतांना शक्य असल्यास कांहीं प्रमुख स्थळेंहि पहातां येतील, नाशिक, त्र्यंबकेश्वर, भुसावळ, ओंकार-मांधाता, इटारसी, जबलपूर हीं स्थळें वाटेंत आहेत. प्रत्येक स्थळीं काय काय पहाण्यासारखें आहे तें आतां आपण पाहूं.

नाशिक--हें क्षेत्र नाशिक रोड स्टेशनपासून ५ मैलांवर आहे. बाराहि महिने हें क्षेत्र पुण्यदायक समजलें गेलें आहे. बारा वर्षांतून एकदां जेव्हां गुरु सिंहराशींत येतो, तेव्हां एक वर्ष सिंहस्थ मानला जातो. ह्या वेळीं गोदावरी नदीचें स्नान फारच पुण्यदायक मानलें जातें. नाशिक येथें सुंदरनारायण, गोराराम, काळाराम, कपिलेश्वर, नारोशंकर, बालाजी इत्यादि ३० मंदिरें असून सीतागुंफाहि दर्शनीय आहे. तसेंच रामकुंड, लक्ष्मणकुंड सीताकुंड, अहिल्याकुंड, धनुष्यकुंड इ. अनेक कुंडें गोदावरी नदीच्या पात्रांत आहेत.

ग्रं. भां. ... २५ प्रत

त्र्यंबकेश्वर—हें क्षेत्र नाशिक रोड स्टेशनपासून २४ मैलांवर आहे. येथील त्र्यंबकेश्वराचें मंदिर बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. येथें कुशावर्तांचें स्नान पवित्र मानलें जातें. जवळ ब्रह्मगिरी म्हणून पर्वत असून तेथूनच गोदावरी नदी उगम पावते, त्यासच गंगाद्वार म्हणून संबोधतात. संताशिरोमणि श्रीज्ञानेश्वर महाराज यांचे ज्येष्ठ बंधु श्रीनिवृत्तिनाथ यांची समाधीहि तेथेंच आहे.

भुसावळ—हें सेंट्रल रेल्वेचें मोठें जंक्शन असून येथून एक मार्ग इटारसीला जातो व दुसरा मार्ग नागपुरास जातो.

ओंकारमांधाता—हें क्षेत्र खांडवा स्टेशनपासून ९० मैलांवर असून स्टेशनवर मोटारी मिळतात. हें अगदीं नर्मदेच्या तीरावर असून तेथील ओंकारममलेश्वर जोतिर्लिंग बारा जोतिर्लिंगांपैकीं एक आहे.

इटारसी—हेंहि सेंट्रल रेल्वेचें मोठें जंक्शन आहे. येथून दोन मार्ग फुटतात. एक दिल्लीकडे जातो व दुसरा प्रयागकडे जातो.

जबलपूर—हें ऐतिहासिक प्रसिद्ध शहर आहे. येथील नर्मदा नदीचा धबधबा व नदीकांठचे संगमरवरी खडक यांचें दृश्य खरोखरीच विलोभनीय असेंच आहे. नर्मदेश्वराचें मंदिरहि दर्शनीय आहे.

प्रयाग स्टेशन (अलाहाबाद)

चौकी जंक्शनपासूनच प्रयागचे पंडे चौकशीला आलेले दिसतात. येथें नैनी जंक्शनवर कित्येक यात्रेकरू उतरतात व येथूनच प्रयागला जातात. नैनी हा भाग यमुनेच्या दक्षिण तीरावर आहे. येथें पुण्याच्या येरवड्यासारखा मोठा तुरूंग आहे. राष्ट्रीय चळवळींत तो थोर पुढाऱ्यांच्या वास्तव्यामुळें पुनीत झाला आहे. नैनीला यमुनेवर रेल्वेचा लांबलचक मोठा पूल आहे. या पुलाची मजा अशी कीं हा दुमजली आहे. खालून मोटारी, बैलगाड्या वगैरे जातात तर वरून रेल्वे जाते. यमुना ओलांडतांच प्रयाग दिसूं लागतें. प्रयाग हें इकडील प्रांतांत मोठें जंक्शन आहे, रेल्वेचे अनेक फाटे येथें आहेत म्हणण्यापेक्षां रेल्वे रस्त्यांचें जाळेंच येथें आहे. असें म्हणणें शोभेल.

प्रवासाला निघाल्यानंतर साधारणतः जबलपूरपर्यंत मराठी भाषा ऐकायला येते, मराठी जेवण जेवायला मिळतें. अलाहाबाद स्टेशनापूर्वी

अगोदर यमुनेचें दर्शन होतें. स्टेशनवर उतरतांच सर्व क्षेत्रांचे ठिकाणा-प्रमाणें येथेंही वाईट अनुभव येतो. विशेषतः या उत्तर हिंदुस्थानी प्रवासांत यात्रेकरूंच्या गैरमाहितीचा फायदा घेऊन त्यांना लुटण्याऱ्या रेल्वेच्या नोकरांपासून तों हमाल, पोलीस, गाडीवाले, पंडे आदि सर्वांच्या वागणुकीचा हाच प्रत्यय येतो. तेव्हां सावधतेनें व्यवहार करावे. येथील टांगे रथासारखे असतात. एक मोठी फळी, त्याला चार खुंट व वर घुमट असतें. चाकें फार लहान असतात. या वाहनास तिकडे एक्का म्हणतात. स्टेशन-वर पंड्यांच्या तावडींतून सुटल्यानंतर हमालाकरवीं आणलेलें सामान प्रथम खालीं उतरून घेऊन दारागंजचा टांगा ठरवावा. अलाहाबाद स्टेशनपासून दारागंज हा भाग ४ ते ४॥ मैल दूर आहे. येथें महाराष्ट्रीय वस्ती अधिक असल्यामुळें तसेंच त्रिवेणी संगम अत्यंत जवळ असल्यामुळें हा भाग आपल्या महाराष्ट्रीय मंडळींना उतरण्यास फारच सोयीस्कर आहे. बरोबर सामान अधिक नसेल तर अलाहाबाद स्टेशन ते दारागंज अशी बसहि मिळूं शकते. स्टेशनवर उतरल्यानंतर टांगेवाले, हमाल व पंडे यांचा त्रास वांचवावयाचा असेल तर महाराष्ट्र मंडळ, दारागंज, (अलाहाबाद) यांचेशीं पत्रव्यवहार करून त्यांचा एखादा प्रतिनिधि अलाहाबाद स्टेशन-वर बोलवावा.

प्रयाग शहराचें वर्णन

अलाहाबाद स्टेशनवरून दारागंजला जातांना ' चौक ' नांवाचा शहरांतील प्रमुख भाग लागतो. हा भाग मुंबईच्या एखाद्या विभागासारखा सुधारलेला दिसतो. अलाहाबाद याचा अर्थ अल्लाह म्हणजे देव व आबाद म्हणजे शहर म्हणून ' देवाचें शहर ' असा आहे. यांचें नांव पूर्वी 'वारणा-वत' असें होतें. हरवलेले चारी वेद परत मिळाल्यावर प्रजापतीनें येथें यज्ञ केला म्हणून या क्षेत्राला प्रयाग असें नांव पडलें.

'दारागंज' हा भाग फार दाट वस्तीचा असून रस्ते अरुंद व त्यांतील बरेचसे फरसबंदी आहेत. महाराष्ट्रीयांची वस्ती याच भागांत आहे. प्रयागला फारसे घाट नाहींत, कारण नद्यांचे कांठ मृण्मय असल्यानें घाट बांधण्यालायक घट्ट जमीन नाहीं.

प्रयाग हें शहर गंगा व यमुना या नद्यांच्या संगमावर पण नद्यांच्या दुबेळक्यांत अत्यंत सपाट, सुपीक, पांढुरक्या भूमीवर वसलें आहे. याचा विस्तारही अफाट आहे. याच्या उलट पूर्व व दाक्षिण या तीनही बाजू नद्यांनीं वेढलेल्या आहेत. उत्तर-पूर्व बाजूनें गंगा व दाक्षिण बाजूनें यमुना अशा या दोघी वहात येऊन अग्नेय टोंकास एकमेकींस भेटतात, हाच संगम. शहराचा जुना भाग रेल्वे रस्ता व यमुना यांचेमध्यें आहे. रेल्वे-पुलाच्या उत्तरेस व गंगेच्या पश्चिमेस नवीन वस्ती आहे. त्याला 'दारागंज' म्हणतात. याचे पश्चिमेस कँटोनमेंट, अलाहाबाद स्टेशनसमोर सिव्हील स्टेशन व पूर्व बाजूस गव्हर्नमेंट हाऊस. पुढें याचे उत्तरेस विश्वविद्यालय, रेसकोर्स वगैरे. किल्ल्याजवळचें फोर्ट स्टेशन व दारागंज हीं शहरांतील दोन्ही स्टेशनें संगमाजवळ आहेत. हें शहर साधारणतः चौकोनी असून त्याची पूर्व—पश्चिम व दाक्षिणोत्तर लांबी सुमारें ६-७ मैल आहे. शहरांतून ग्रँट ट्रंक रोड नांवाचा मोठा प्रशस्त रस्ता पश्चिम टोंकापासून पूर्व टोंकापर्यंत जातो. हाच रस्ता पुढें काशीला जातो. नव्या वस्तींत कीन्स रोडवर पोस्ट, बँक, म्युनिसिपालटी व सरकारी कचेऱ्या आहेत. कॅनींग रोडवर हायकोर्ट आहे. या शहराचें वैशिष्ठ्य असें कीं, शहरांत आणि शहराच्या आसपास अतोनात झाडी आहे. कट्रा विभागांत विश्वविद्यालयाचे पूर्वेस राष्ट्रसभेची मुख्य इमारत आहे, हिला आनंदभवन म्हणतात. ही राजवाड्यासारखी इमारत, आपले लोकप्रिय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या मालकीची होती, ती त्यांनीं राष्ट्रसभेला दिली. याच भागांत प्रख्यात कायदेपंडित सप्रू व पंतप्रधान नेहरु यांचे बंगले आहेत.

गंगामातेचा महिमा

येथील मुंडन विधीचा (क्षौर) रोजचा व्यवहार इतका मोठा असतो कीं, त्याचा भारा गाडीभर तरी होतोच. एवढे केस गंगेत येथें पडत असूनही स्नान करतांना किंवा गंगोदकांत एखादा तरी केस औषधाला सांपडेल तर शपथ; उलट पाणी अगदीं निर्मळ असतें. एवढेंच नव्हें तर भौतिक शास्त्र सांगतें कीं, केस पाण्यावर तरंगतो पण येथें चमत्कार असा दृष्टीस पडतो कीं, टाकलेले केस तरंगत नाहींत. केवढा हा येथील महिमा. या ठिकाणीं क्षौर हा अशुभ नाहींच. इतर ठिकाणीं क्षौर करून स्नान

केल्यानें कांहीं जणांना तरी बाधतें पण येथील गंगामाता मात्र याला अपवाद आहे. तिच्या कुशींत कोणीही केव्हांही यावें व कितीही वेळ बागडावें, त्याला कधीं बाधा व्हावयाची नाहीं.

येथील गंगा स्नानाचें महत्त्व विशेष आहे. रामचद्रांनीं अयोध्येला परत जातांना वाटेंत सीतेला निरनिराळ्या ठिकाणचें वर्णन सांगतांना येथील गंगेच्या स्नानाची महती सांगितली आहे. इतर ठिकाणीं ज्ञानाशिवाय मोक्ष नाहीं पण येथें नुसत्या स्नानानें मोक्ष मिळतो असें सांगितलें आहे.

गंगा कुठेंही सदा निर्मळ, तिचें पाणीं कधींच बिघडत नाहीं. नाहींतर गंगेच्या कांठीं प्रचंड शहरें व त्यांचे व्यवहार एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालत असतां किती घाण पडत असेल याची कल्पनाच करावी. हा प्रकार दुसऱ्या कोणत्याही नदीवर एवढ्या मोठ्या प्रमाणांत होत राहीला तर तिचें पाणी हमखास बिघडलें असतें पण गंगामातेनें हें सर्व पचवून टाकून येईल त्याला पवित्र करण्याचें एकच कार्य चालू ठेवलें आहे ! हें केवढें आश्चर्य व हा तिचा केवढा माहिमा आहे ! आणि अशी ही पवित्र नदी आपल्या भारताला लाभली आहे, हें आपल्या देशाचें व आम्हां भारतवासीयांचें केवढें भाग्य ! सर्व विश्वांत असा भाग्यवान देश नाहीं कीं, या बाबतींत सर्व जगानें ज्याचा हेवा करावा ! परमेश्वराची भारतावर ही केवढी कृपा आहे ! याचें महत्त्व अजूनही आपल्यांतील कांहींना उमजत नाहीं किंवा उमजूनही पटत नाहीं; असे आम्ही करंटे व आळशी. याला कारण ' अति परिचयात् अवज्ञा ' हेंही असूं शकेल. अमेरिकेंत एखादा असा चमत्कार आढळला तर आपण त्याचें हिरीरीनें कौतुक करतों, पण आपला देश किती भाग्यवान आहे याचा विचारही कधीं करीत नाहीं. आम्हांला ईशकृपें हें भाग्य असूनही आम्ही उदास, तर ज्यांना हें ईश्वरी देणें नाहीं असे अन्य मात्र हळहळतात !

प्रयागचे तीर्थविधि

त्रिस्थळी यात्रेंतील ' प्रयाग ' हें पहिलें क्षेत्र आहे. येथील तीर्थविधि साधारणतः तीन दिवसांत आटोपला जातो पहिल्या दिवशीं गंगाभेट, पूर्वांग व उत्तरांग प्रायश्चित, सचैल व सक्षौर स्नान आणि उपोषण; दुसरें

दिवशीं तीर्थश्राद्ध करून पिंडदान, गोप्रदान व सुफल; आणि तिसरे दिवशीं सौभाग्यवायन, वेणीदान, सुवासिनी व ब्राह्मण भोजन; असे क्रमवार विधि आपल्या शास्त्रांत सांगितले आहेत. बहुतेक विधि तेथील जो आपला उपाध्या असेल तो आपणांकडून करवून घेतो, पण सुरुवातीचा 'गंगा-भेटीचा' विधी तेथील हक्कदार पंड्याकरवींच करावा लागतो, त्याला 'गंगापुत्र' असें म्हणतात.

क्षौर विधी

श्रुतिः प्रमाणं स्मृतयः प्रमाणं । पुराणमप्यत्र परं प्रमाणं ॥
यात्रैव गंगा यमुना सरस्वती । सतीर्थ राजो जयति प्रयागः ॥

वर श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें श्रुति, स्मृति व पुराण यांना प्रमाणभूत व गंगा–यमुना–सरस्वती यांच्या संगमामुळें पवित्र झालेलें हें ठिकाण म्हणजे सर्व तीर्थांत प्रमुख; म्हणूनच याला 'तीर्थराज' म्हटलें आहे. अशा या ठिकाणीं मुख्य विधी क्षौराचा आहे. शास्त्रांत म्हटलेंच आहे– 'प्रयागे मुंडनं, काश्या धुंडनं, गयायां च पिंडदानं'. तेव्हां 'प्रयागे वपनं कुर्यात्'. त्रिवेणीवर क्षौर केलाच पाहिजे. जिवंत पितृकाला इतर क्षेत्रीं क्षौर विधी नाहीं पण येथें बाप, मुलगा, नातू, सर्वांचा क्षौर एकदम होतो. शास्त्रांत राजाला क्षौर कोठेंच नसतो तो येथें मात्र आहे; इतकेंच काय पण आपल्या सर्वसाधारण समजुतीला धक्का देईल असा म्हणजे सुवासिनींना सुद्धां येथें हा विधी आहे. इतकें या मुंडनाचें महत्त्व आहे. अर्थात स्त्रियांच्या वपनांत प्रांतानुसार भिन्नभिन्न चालीप्रमाणें प्रकार आहेत इतकेंच. या स्त्रियांच्या या विधीला 'वेणीदान' म्हणतात. हें वेणीदान द्राविडांत पूर्णपणें वपन करून करतात तर दाक्षिणी लोकांत वेणीचें टोंक चार बोटें कापून करतात.

वेणीदान समारंभ

सुप्रभातीं सुगंधी द्रव्यें लावून जोडप्यानें स्नान करावयाचें. नंतर शुभ्र वस्त्रें नेसून पुण्याहवाचनास बसावयाचें. त्या वेळीं पत्नीला फुलांची मुंडावळ जाळी बांधतात तर नवऱ्याला फक्त मुंडावळच बांधतात. पुण्याहवाचन झाल्यावर उपाध्याच्या पत्नीस सौभाग्यवायन द्यावयाचें. या वायनांत लुगडें,

चोळी, जोडवी, विरवल्या, मणी-मंगळसूत्र, नाकांतलें सुंकलें, कानांतलीं सुंकलीं, डोक्यांत घालण्यासारखें लहानसें सोन्याचें फूल इतक्या जिनसा असतात. त्या एका सुपलींत घालून वर दुसरी सुपली आच्छादन घालून हें वायन देतात. वायन दिल्यावर पत्नीचें मळवट भरून याच थाटांत वाजत-गाजत जाऊन संगमावर वेणीदान करायचें. नावेंत बसल्यावर उपाध्या मंत्र-घोष सुरू करतात. याच वेळीं नवऱ्यानें पत्नीची वेणी घालावयाची व शेवटीं टोंकांत एक लहानसें सोन्याचें फूल ओंवायचें. नंतर पतीनें पत्नीला आपल्या मांडीवर बसवावयाचें. उपाध्या कातरी मंतरून देतात. तिची पूजा झाल्यावर त्या कातरीनें पत्नीच्या वेणीच्या टोंकाकडील सोन्याच्या फुलासह सुमारें चार बोटें वेणी नवऱ्यानें कातरावयाची व ही कातरलेली वेणी पत्नीच्या ओंजळींत टाकावयाची. मग पत्नीनें मंत्रोक्त ती त्या अलंकारा-सह नदींत सोडावयाची. इतकें झालें म्हणजे वेणीदान झालें.

प्रयागांतील दर्शनीय स्थळें

त्रिवेणी माधवं सोमं भारद्वाजं च वासुकीं ।
वंदे अक्षयवटं शेषं प्रयागं तीर्थनामकं ॥

त्रिवेणी

यांपैकीं सर्वांत महत्त्वाचें व प्रेक्षणीय म्हणजे त्रिवेणीचें दर्शन. त्रिवेणी म्हणजे गंगा-यमुना सरस्वती या तिघींचा संगम. येथें मौज अशी कीं, तिन्ही नद्यांचें पाणी एकत्र येऊन एक प्रवाह जरी बनला आहे तरी त्यांचा एक-जीव मात्र झालेला नाहीं. सरस्वती तर दोघींच्या खालून गुप्त रीतीनें वाहते, पण गंगा व यमुना मात्र दोघींच्या भिन्नभिन्न रंगामुळें ओळखूं येतात. गंगा शुभ्र तर यमुना काळी. गंगा डाव्या बाजूनें तर यमुना उजव्या बाजूनें वाहते, पण एकत्र आल्यावर वेणीचे पेड जसे वरून खालीं व खालून वर आलेले दिसतात, तशा वेणी पद्धतीनें या येथें एकमेकींत मिसळतात आणि हें दृश्य या दोघींच्या भिन्न रंगांमुळें ओळखूं येतें व मजेदार दिसतें. जणूं काय भूमातेनें वेणीच घातली आहे आणि त्यांत सरस्वतीनेंही आपला पेड

गोंवला आहे, मात्र ती आपलें अस्तित्व बुडबुड्याच्या रूपानें दाखविते. म्हणजे यमुनेच्या काळ्या पाण्यांत गंगेचे शुभ्र बुडबुडे दिसतात तर गंगेच्या शुभ्र पाण्यांत यमुनेचे काळे बुडबुडे दिसतात. होडींतून हा प्रकार दोन्ही बाजूला प्रवाहांत दिसतो; आणि त्यामुळें पांढऱ्या पाण्यांत काळीं कमळें व काळ्या पाण्यांत पांढरीं कमळें उमलल्याचा भास होतो. हे बुडबुडे निर्माण होण्याला कारण सरस्वती. ती खालून या दोन्ही प्रवाहास ढकलते व

(त्रिवेणी संगमावरील दृश्य)

या बुडबुड्यांच्या रूपानें आपलें अस्तित्व प्रगट करते. असें हें दृश्य जगांत कोठेंही आढळत नाहीं. हें सर्व विलोभनीय दृश्य फक्त या संगमाच्या टांपूतच दिसतें. त्यानंतर सोमेश्वराचे पुढें त्या एकजीव होऊन एकच प्रवाह वाहात असल्यानें हें दृश्य पुढें कोठेंही दिसत नाहीं. या तिघींनीं आपापल्या वेडांची एकत्र वेणी गुंफल्यानें या स्थानाला ' त्रिवेणी ' हें नांव सार्थ ठरतें आणि म्हणूनच स्त्रिया आपलाही पेड ' वेणीदान ' करून या भक्तीभावांत मिसळवितात.

संगम

गंगारोड संगमाकडे जातो. संगम शहराच्या अग्नेय दिशेस आहे. नदीचा प्रवाह लागण्यापूर्वी दोन मैलांचे पांढऱ्या वाळवंटांत कुंभमेळ्याच्या वेळीं यात्रेकरूंच्या हजारों झोंपड्या उभारलेल्या असतात. प्रथम यमुनेचा प्रवाह लागतो. कडेला होड्याच होड्या दिसतात. सरासरी दोन हजारांचे वर होड्या असतात. प्रत्येक होडीला म्युनिसिपालटीचा १४ रुपये कर आहे. या होडींतून यमुनेंतून जाऊन संगमाचे ठिकाणीं स्नान करतात. दोन्ही नद्या ज्या ठिकाणीं एकमेकीला भेटतात, तेथें दोन्ही प्रवाहांची वालू जमते; त्यामुळें तेथें पाणी खोल नसतें. मार्च माहिन्यांत कमरेपर्यंत तर डिसेंबर महिन्यांत छातीपर्यंत इतकेंच पाणी येथें संगमावर असतें. पाणी इतकें कमी असूनही दोघींच्या पाण्यांतील रंग पांढरा व काळसर असे अगदीं स्पष्ट वेगवेगळे दिसतात. दोन्ही प्रवाह संथपणें वाहात वाहात संगमाच्या ठिकाणीं स्थिर होतात व एकत्र होऊन पुन्हां वाहाण्यास लागतात. पाण्यांत उभें राहीलें तर पायाखालची वालू सारखी घसरत असते; त्यामुळें थोडी भीति वाटते पण येथें पाणी जास्त नसल्यामुळें व जोरानें वहात नसल्यामुळें स्नान करणें धोक्याचें नाहीं. येथील दोन नद्यांचा संगम आणि सेतु रामेश्वरचा दोन समुद्रांचा म्हणजे सिंधुसागर (अरबी समुद्र) व गंगासागर (बंगाल समुद्र) यांचा संगम यांची तुलना मोठी मजेशीर आहे. शुभ्र गंगा व सावळी यमुना यांचें जसें येथें मीलन होतें तसेंच सेतु रामेश्वरला निळा सिंधुसागर व हिरवा गंगासागर यांचें मीलन होतें. प्रयाग-संगमाचे ठिकाणीं पाणी संथ असतें, त्यामुळें स्नानास भीति वाटत नाहीं; तर रामेश्वरला प्रचंड लाटांचा थयथयाट असतो, त्यामुळें स्नानास भीति वाटते. तेथेंही पायाखालची वालू सरकत असते. प्रयागला पाण्यांत बुडी मारावी लागते तर तेथें गुडघाभर पाण्यांत बसलें कीं समुद्राची लाट आपल्या डोकीवरून जाते. प्रयाग-संगम शांत व मनोहर तर सेतुसंगम भव्य व भीतिदायक. रामेश्वराहून आणलेला सेतु (नारळाच्या करवंटींतून आणलेली समुद्रावरची वालू) येथें प्रयाग-संगमांत टाकतात. गंगा व यमुना यांना भिन्नभिन्न वेळीं पूर येत असल्यानें संगमाचें स्थानही वारंवार बदलत असतें.

दशाश्वमेध घाट

येथें दशाश्वमेध घाटावर गंगेच्या पूजेचा रोज उत्सव होत असतो व तो प्रेक्षणीय असतो पण त्याहून प्रेक्षणीय असा दशहाराचे वेळीं असतो. या घाटावर ब्रह्मदेवानें १० अश्वमेध केले म्हणून याला दशाश्वमेध म्हणतात.

वेणीमाधव

त्रिवेणी झाल्यावर माधव हें प्रयागांतील मुख्य दैवत. याच्या देवालयांत दोन मूर्ती जवळ जवळ असतात. एक वेणी व दुसरी माधव, म्हणून याला नुसतें माधव न म्हणतां ' वेणीमाधव ' म्हणतात वेणी माधवाचीं देवळें प्रयागांत ७-८ आहेत. पण दारागंज भागांतिल देऊळ मुख्य मानतात.

सोमेश्वर

सोमेश्वर हें स्थान संगमाच्या पलीकडे आहे. तेथें होडीनें संगमांतून १ मैल जावें लागतें. जातांना या तिघींनीं घातलेल्या वेणीचा सुंदर देखावा स्पष्ट दिसतो. सोमेश्वर या ठिकाणीं ब्रह्मदेवानें दहा यज्ञ करून सोमेश्वराच्या लिंगाची स्थापना केली. हें देऊळ नदी किनाऱ्यापासून अर्ध्या मैलावर आहे. देऊळ लहानच पण पूर्ण दगडी आहे. जवळच काळभैरव, मारुति व देवी असून अहोरात्र धुमसत असलेलें अग्निकुंड आहे.

भारद्वाज

दारागंजपासून साधारणतः एक मैल गेल्यावर गंगा-यमुना या नद्यांचा जो पृष्ठभाग आहे तेथें भारद्वाज ऋषींचा आश्रम आहे. त्याच्याच शेजारीं सीतागुंफा, वाल्मिक ऋषि, मारुती, देवी, गणपती इत्यादि देवतांचीं लहानमोठीं बरींच मंदिरें आहेत. जवळच गोसावी लोकांची वस्ती बरीच आहे. भगवान श्रीरामप्रभू वनवासांत दाक्षिणेला जात असतां भारद्वाज ऋषींच्या आश्रमांत आलेले होते आणि या मुनींनीं त्यांचा सत्कार केला होता, असा श्रीरामविजय ग्रंथांत उल्लेख आहे.

वासुकी

वेणी माधवाच्या देवळापासून सुमारें पाऊण मैलावर नदी किनारीं नागाचें (वासुकीचें) देऊळ आहे. हें देऊळ एकजात तांबूस रंगाच्या दगडांचें आहे. यांत तीन फूट उंचीची वेटोळें घालून बसलेली व पंचफडा उभारलेली अशी शेषाची मूर्ति आहे.

अक्षयवट

मूळ अक्षयवट किल्ल्यांत होता. आतां अक्षयवट प्रयाग, काशी व गया या तिनही ठिकाणीं आहे, पण त्याची पूजा मात्र भिन्नभिन्न आहे. प्रयागला बुंध्याची, काशीला खोडाची व गयेला शेंड्याची पूजा करतात. अक्षय-वटाचा बुंधा येथें किल्ल्यांत एका तळघरांत (भुयारांत) आहे. या भुयाराला पाताळपुरी म्हणतात. हें भुयार फार मोठें आहे; त्यांत अक्षयवटाच्या जोडीला अनेक ऋषींच्या व देवतांच्या मूर्ति आहेत. मूळ अक्षयवट येथें किल्ल्यांतच होता परंतु मारूतिरायांनीं हा वृक्ष मोडून त्याचे भाग वर सांगितल्याप्रमाणें तीन ठिकाणीं स्थापन केले व प्रयागास येऊन विश्रांती घेतली. या विशालदेही मारूतीची मूर्ति येथें आहे.

हा वट जिवंत असतां संगमाच्या कांठावर होता. यावरून याच जागीं पूर्वी संगम असावा परंतु किल्ला बांधला गेल्यामुळें हें ठिकाण किल्ल्यांच्या आवारांत आलें व संगम दुरावला. या अक्षयवटावरून संगमांत उडी मारून जलसमाधि घेतली म्हणजे मोक्ष मिळतो, या समजुतीनें कित्येक अशा प्रकारें येथें जलसमाधि घेत. पण किल्ला झाल्यापासून ही अमानुष चाल बंद पडली.

खुसरु बाग

सिटी रोडवर प्रय्यात खुसरु बाग आहे. दिल्लीचा बादशहा जहांगीर याच्या खुसरु नांवाच्या मुलाचें नांवानें हें स्मारक केलें आहे. पण दुर्दैव असें, या राजपुत्राला बापाविरुद्ध बंड केल्याचे आरोपावरून मरेपर्यंत कैदेंत रहावें लागलें आणि ही शोचनीय अवस्था पाहून त्याच्या आईनेंही आत्महत्या केली! या दोघांच्या कबरी येथें आहेत.

किल्ला

येथील प्रसिद्ध किल्ला १५८४ मध्यें अकबरानें बांधला. नंतरच्या काळांत त्यांत बरेच फेरबदल केले गेले. किल्ल्यांत प्रवेश करतांच प्रथम **अशोक स्तंभ** दृष्टीस पडतो. दोनहजार दोनशें वर्षांपूर्वी उभारलेला हा स्तंभ अजून जशाच्या तसा आहे; वर सिंहाची प्रतिमा फक्त तेवढी नाहीं. हा अखंड दगडाचा वाटोळा स्तंभ ४० फूट उंचीचा आहे. इतक्या जुन्या

काळीं या अखंड दगडाचें कोरीव काम कसें केलें असेल व एवढा प्रचंड स्तंभ यांत्रिक साधनाभावी जाग्यावर आणून जोत्यावर बसवून कसा उभा केला असेल, याचा विचार येऊन मति गुंग होते.

येथील अकबराचा राजवाडाही मोठा प्रेक्षणीय आहे. आंतील दिवाणखाना तांबड्या दगडांचा असून चाळीस खांबी आहे. बांधणी व नक्षीकाम पहाण्यालायक आहे.

प्रयागविषयीं प्राचीन माहिती

सितासिते यंत्र तरङ्गचामरे । नद्यौ विभाते मुनि भानुकन्यके ।।
नीलात पत्रं वट एव साक्षात । स तीर्थराजो जयति प्रयागः ॥

गंगा-यमुनेचें हें संगमस्थान आर्यांना फार पवित्र वाटत होतें. जेथें भारद्वाज ऋषींचा आश्रम आहे, त्याच भागांत सध्यां येथील विश्वविद्यालय आहे. काय योगायोग पहा. जेथें भारद्वाज ऋषींकडून हजारों विद्यार्थी ज्ञानदान घेत होते, त्याच जागीं आज विश्वविद्यालयाकडून हजारों विद्यार्थी ज्ञान घेत आहेत. येथील संगमांत स्नान केल्यानें पावन होऊन मोक्ष मिळत असल्याची समजूत असल्यानें आजही हिंदूंना हें स्थान फार पवित्र वाटतें.

बुद्धधर्मी लोकांनासुद्धां हें स्थान पवित्र वाटतें. कारण गौतमबुद्धाच्या आगमनानें हें स्थान पावन झालें आहे. त्रिस्थळी यात्रेचीं प्रयाग-काशी-गया हीं तीनही ठिकाणें हिंदूंप्रमाणेंच बुद्धधर्मीयांना प्रिय आहेत; कारण गौतमबुद्धाच्या आयुष्यांतील महत्त्वाचे प्रसंग येथें घडून आले असून बौद्धधर्माचा उदय व प्रवर्तन या स्थळीं झालेलें आहे आणि म्हणूनच जेथंजेथें सध्यां बौद्धधर्म प्रचलित आहे, तेथील बुद्धधर्मीय लोक या स्थळांची यात्रा करतात.

कुंभमेळा

अगदीं प्राचीन कालांत देव-दैत्यांनीं समुद्रमंथन केलें. त्यांतून १४ रत्नें बाहेर पडलीं. पैकीं अमृतासाठीं देव-दैत्यांत युद्ध झालें. हें अमृत ज्या ज्या ठिकाणीं सांडलें अशी स्थानें यात्रेचीं क्षेत्रें बनलीं. हीं स्थानें म्हणजे हरिद्वार, प्रयाग, उज्जैन आणि नाशिक. प्रतिवर्षीं माघमासांत

माघमेळा, दर सहा वर्षांनीं अर्ध कुंभमेळा व बारा वर्षांनीं पूर्ण कुंभमेळा प्रयागला भरत असतो. पूर्ण कुंभमेळा सर्वांत मोठा व महत्त्वाचा.

वर सांगितल्याप्रमाणें देवांनीं हें अमृतकुंभ हस्तगत केलें. तें स्वर्गांत नेतांना प्रयाग येथें हा कुंभ ठेवला होता. त्यामुळें या स्थानाला महात्म्य प्राप्त झालें. हा कुंभ ज्या ज्या ठिकाणीं ठेवला गेला त्या त्या स्थानीं गुरु ज्या राशींत होता त्या कालांत कुंभमेळा भरतो. त्यानुसार गुरु कुंभ राशींत असतां हरिद्वार येथें, वृषभ राशींत असतां प्रयाग येथें, सिंह राशींत असतां त्र्यंबकेश्वर येथें व सिंह राशींतच पण मेषेचा सूर्य असतां उज्जैन येथें याप्रमाणें त्या त्या काळांत त्या त्या ठिकाणीं हा मेळा भरतो. गुरु या प्रत्येक राशींमध्यें १२ वर्षांनीं येत असल्यानें प्रत्येक ठिकाणचा मेळा १२ वर्षांनीं येतो. याप्रमाणें सन १९५५–५६ सालीं नाशिक-त्र्यबकेश्वर व उज्जैन येथें सिंहस्थांत कुंभमेळा भरला. कुंभमेळ्यामध्यें सिंहस्थ पर्वणीचें महात्म्य श्रेष्ठ, पौर्णिमा, चंद्रग्रहण, सोमवार, व्यतिपात, स्वातिनक्षत्र, मेषेचा रवि आणि सिंहेचा गुरु अशा योगाला महायोग म्हणतात. असा योग क्वचितच येतो पण सन १९५५–५६ सुदैवानें उज्जैनला तो लाभला.

या मेळ्याचे वेळीं निरनिराळ्या प्रांतांचें साधू, संन्यासी, तपस्वी आणि संतमहंत येतात. धर्मचर्चा होते. तत्त्वज्ञान वगैरे विषय चर्चिले जातात. हजारों यात्रेकरूंची वस्ती वाळवंटांतून झालेली असते. दुकानदारांची सामान देण्याची गर्दी व पंड्यांची संकल्प सांगण्याची गर्दी उसळलेली असते. कोणी स्नान करीत आहेत, कोणी पाण्यांत सुरळ्या टाकीत आहेत. कोणाची पूजा चालली आहे, कोणी ध्यानस्थ बसले आहेत, गंगेंत फुलें व कापराच्या ज्योति तरंगत आहेत. कोठें होडीमध्यें वाजत-गाजत वेणीदान चाललें आहे, नदींत श्रीफलादी पडणाऱ्या वस्तु मिळ. विण्यासाठीं नावाडी बुड्या मारीत आहेत. सर्व देशांतून आलेले भाविक यात्रेकरू, त्यांचे विविध तऱ्हेचे व रंगीबेरंगी पोषाख, त्यांच्या विविध चाली-रीती, या सर्व दृश्याच्या नुसत्या वर्णनावरून कल्पना येणें कठीण. हें विलोभनीय दृश्य समक्षच पहाणें अधिक बरें.

आद्य शंकराचार्यांच्या प्रयत्नामुळेंच या मेळ्याला व प्रयाग क्षेत्राला असामान्य महत्त्व प्राप्त झालें तें कसें, याची कथा पुढें देत आहें.

श्रीशंकराचार्यांची कामगिरी

या आपल्या भारतांत वैदिक धर्माचा वैभवकाल संपून जेव्हां त्याच्यांत शिथिलता निर्माण झाली; त्याच वेळीं म्हणजे अंदाजें अडीच हजार वर्षांपूर्वीं भगवान गौतम बुद्धांनीं बौद्धधर्माची स्थापना केली व तेथून पुढें या भारतांत बौद्धधर्माचा फार मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला व त्याच प्रमाणांत वैदिकधर्माची पीछेहाट झाली. पुढें कालांतरानें बौद्धधर्माचाही वैभवकाल संपून त्याच्यांत शिथिलता उत्पन्न झाली. तेव्हां बौद्धधर्माच्या ऱ्हासाच्या कालाचा फायदा घेऊन पुन्हां वैदिकधर्माची पताका विजयानें फडकवावी या हेतूनें एक महात्मा पुढें सरसावला, त्याचें नांव कुमारील भट्ट. हा आचारनिष्ठ ब्राह्मण तेजःपुंज व मीमांसाशास्त्रांत महान पंडित होता. हा प्रयाग येथें रहात असे.

एके दिवशीं गंगेवर पहांटे स्नानास जात असतां 'किं करोमि क्व गच्छामि को वेदानुद्धरिष्यति' असा विलापध्वनि त्याचे कानांवर पडला! त्याला अचंबा वाटला. व्यक्ती तर दिसत नाहीं व शब्द मात्र सारखे ऐकूं येतात. "मी काय करूं? कुठें जाऊं! वेदांचा उद्धार कोण करील? कोण त्यांचा त्राता?" हे उच्चारणारी कोण बरें स्त्री ही? वेदांची एवढी पोटतिडीक कोणाला? बौद्धधर्मानें ग्रासलेल्या या नगरींत, गंगानदीच्या तीरावर कोणत्या माऊलीचा हा विलाप? याचें गूढ कांहीं त्याला उकलेना. या शब्दांनीं तो कळवळून गेला. अखेर 'ही वैदिक संस्कृतीच आपल्या पुत्रांना हांक मारीत आहे' असा निर्णय त्यानें आपल्या मनाशीं करून ज्या दिशेकडून हांक ऐकूं येत होती, त्या दिशेकडे तोंड करून तो खणखणीत शब्दांत म्हणाला, 'आई, दुःख करूं नकोस. वेदांचा उद्धार मी करीन, न साधल्यास देहत्याग करीन.'

प्रथम त्यानें बौद्ध व जैन धर्माचा सांगोपांग अभ्यास केला. नंतर त्यानें अनेक ठिकाणीं बौद्ध पंडितांच्या सभा जिंकल्या. सुधन्वा राजाच्या दरबारांतहि त्यानें वैदिक धर्माचें श्रेष्ठत्व सिद्ध केलें व राजाला म्हटलें, 'आतां तूं आपल्या प्रजेसह वैदिक धर्माचा स्वीकार कर.' राजा म्हणाला, 'धर्माचा निर्णय केवळ वादावर ठरवणं बरं नाहीं. त्याला दैवी साक्षात्कार पाहिजे. वैदिक धर्म श्रेष्ठ असेल तर तूं समोरच्या डोंगरावरून उडी मार. जिवंत राहीलास तर मी वेदमार्ग अनुसरीन.' भट्टपादानें ताबडतोब 'जर वेद प्रमाण असतील तर मी जगेन' असें म्हणून उडी मारली! आणि

आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्याला कांहींही इजा झाली नाहीं. राजानें ताबडतोब आपलें वचन पुरें केलें.

एवढ्यांत माघ महिना आला. माघांतल्या संक्रातीला प्रयाग येथें मोठा मेळा भरणार होता. त्या वेळीं बौद्ध धर्माची परिषद भरणार होती. हें धर्ममहामंडळ जिंकलें कीं, भरतखंड जिंकण्यासारखें होतें. या परिषदेला हजर राहून भट्टपादानें ही परिषद जिंकली. बौद्ध पंडित निरुत्तर झाले, पण सरळ पराभव कबूल करणें त्यांचे जिवावर आलें. अखेर 'शेषं कोपेन पूरयेत' याचा आधार त्यांनीं घेतला. सभेंत हुल्लड माजवून सभा उधळून दिली व भट्टपादाला मारहाण केली. शिविगाळ व अभद्र भाषण यांच्यापुढें त्याची विद्वता कुचकामाची ठरली ! भट्टपादाच्या मनाला ही गोष्ट फार लागली. वैदिक धर्माला उजाळा देण्याचें कार्य केवळ सभा जिंकण्यानें वा विद्वत्तेनें होणार नाहीं, त्याला दिव्यच केलें पाहिजे, असा विचार करून त्यानें 'अग्निदिव्य' करण्याचें ठरविलें. गंगेच्या तीरावर कोंड्याचा मोठा ढीग करून त्यांत त्यानें स्वतःला पुरून घेतलें व त्याला अग्नि चेतविला ! ही बातमी विजेसारखी सर्वत्र पसरली. हजारों नागरिक तें दृश्य पहाण्यास जमले. त्यांतच एक तरूण संन्यासी होता. त्याचें नांव शंकर. बालपणींच सर्व शास्त्रांत पारंगत होऊन त्यानें 'आचार्य' ही पदवी मिळविली होती. दैवी अंशच त्याच्या रूपानें अवतरला होता. एवढा मोठा सत्त्वधीर वेदवेत्ता पुरुष नष्ट व्हावा हें त्याला सहन झालें नाहीं म्हणून त्याचें बलीदान थांबविण्यासाठीं तो तेथें आला. लोकांनीं त्याला ओळखलें.

चहूंबाजूंनीं आग प्रज्वलीत झाली होती; तरी तो धिरोदात्त महामेरू डोळ्यांत एकहि अश्रू न आणतां व त्रासिकपणाचें चिन्ह न दाखवितां अग्निदिव्य करीत होता. आचार्य पुढें झाले व त्याला म्हणाले, 'भट्टपाद बाहेर या. आत्मघात करूं नका. तुमच्या विद्वत्तेची, अधिकाराची भारताला गरज आहे.' भट्टपाद म्हणाला, 'तरूण यतिवर्या, माझं कार्य संपलं. माझी करुणा करूं नकोस. करुणा करायचीच तर वैदिक संस्कृतीची कर. तिनं विलाप मांडला आहे. तिच्या हांकेला ओ दे. तिचा उद्धार कर.'

इतकें तो बोलत आहे तोंच चितेनें भट्टपादाला ग्रासून घेतलें. वैदिक संस्कृतीसाठीं झालेलें बलीदान पाहून शंकराचार्य भावविवश झाले आणि कुमारील भट्टाच्या जळत्या आत्म्याला स्मरून त्याच क्षणीं त्यानीं प्रतिज्ञा

केली कीं, 'भट्टपाद, तुमचं अपुरं कार्य मी पूर्ण करीन!' प्रतिज्ञेप्रमाणें आचार्यांनीं कार्याला सुरुवात केली. त्यांनीं अनेक थोर थोर विद्वान पंडितांच्या गांठी भेटी घेऊन त्यांची एक संघटना निर्माण केली. प्रयाग येथेंच एक धर्म-परिषद बोलाविली. या परिषदेला भारताच्या कानाकोपऱ्यांतून धर्माचार्य जमले. त्यांत वैदिक पंडित होते तसे बौद्धांचेहि आचार्य आणि मठपति होते.

ही परिषद निर्णायक मत म्हणून बोलाविली गेली होती. सुधन्वा राजा या परिषदेचा अध्यक्ष होता. या परिषदेंत असें ठरलें कीं, 'जो पक्ष हरेल त्यानें दुसऱ्या पक्षाचें मत स्वीकारावें.' याप्रमाणें प्राथमिक तयारी झाल्यावर चर्चेला सुरुवात झाली. आपलाच जय होणार असा अहंकार बौद्धांना होता. खंडन मंडन चालूं झालें. कितीतरी दिवस ही चर्चा चालूं होती. आचार्यांच्या अमोघ कोटीक्रमापुढें अखेर बौद्धांना हार खावी लागली. त्यामुळें चिडून जाऊन भट्टपादाच्या वेळेप्रमाणें याही प्रसंगीं त्यांनीं सभा उधळण्याचा प्रयत्न केला. पण या वेळीं राजानें आपल्या सैनिकांकडून त्यांचा बंदोबस्त केला व बौद्ध पंडितांना बजावलें कीं, 'तुमचा पराजय झाला आहे. तुम्हांला आतां वैदिक धर्माचा स्वीकार करणें भाग आहे.'

आचार्यांची विजयपताका फडकली. आचार्यांनीं सर्व भारतभर संचार करून भारताला पुनश्च वैदिक संस्कृतीच्या ओटींत घातलें. वैदिक धर्माची पुनर्रचना केली. बौद्ध संस्कृतींतील चांगल्या गोष्टींचा वैदिक संस्कृतींत समावेश केला व कुमारील भट्टाच्या आत्म्याला समाधान दिलें.

या परिषदेच्या वेळीं आचार्यांनीं संदेश दिला तो असा—

"चारी धामाच्या यात्रा करा. शक्य न झाल्यास आकांक्षा धरा. भारतभूमीसाठीं जगा व भारतभूमीसाठींच मरा. दर बारा वर्षांनीं मकर राशीला गुरु येतो, त्या वेळीं वैदिक धर्माची परिषद बोलवा. त्यांत चर्चा करून प्रगतीला आवश्यक असतील त्या गोष्टींचा स्वीकार करा व अयोग्य ठरतील त्यांचा त्याग करा. या यात्रेला कुंभपर्व नांव द्या. या यात्रेमुळें धर्माचें चिंतन, त्रिवेणी संगमांत स्नान, साधुसंत व विद्वानांचा समागम असें त्रिविध फळ प्राप्त होईल."

या दिवसापासून प्रयागाचें आणि कुंभमेळ्याचें महात्म्य वाढलें, तें अद्यापि भारतीयांच्या अंतःकरणांत कायम आहे.

चौकीं मागें एक फाटा कलकत्त्यास जातो. या मार्गानें जावयाचें म्हटल्यास अलाहाबाद स्टेशनवर गाडींत बसून मोगलसराईमार्गे बनारस कँट म्हणजे बनारस छावणी ह्या स्टेशनवर उतरावयाचें. येथून काशी शहरास जाण्यास टांगे, रिक्षा मिळतात. (२) प्रयागच्या पूर्वेस असलेल्या गंगेच्या पुलावरून मिटर गेज रस्ता, हा दुसरा मार्ग. (३) प्रयागच्या उत्तरेस असलेल्या गंगेच्या कर्झन पुलावरून जाणारा. याच मार्गावर फक्त प्रयाग स्टेशन असून सर्वांत जवळचा मार्ग हाच आहे. प्रयाग ते काशी या दरम्यान एकहि टेकडी नाहीं अथवा निसर्ग सौन्दर्याचें दृष्टीनें कांहींहि पहाण्यासारखें नाहीं. सर्वत्र पांढुरकी व सपाट जमीन. काशीचे 'बनारस छावणी' हें स्टेशन जसजसें जवळ येऊं लागतें तसतशी काशीच्या पंड्यांची गाडींत गर्दी होऊं लागते. पण या पंड्यांचा प्रयागप्रमाणें त्रास होत नाहीं. काशीस महाराष्ट्रीय उपाध्यायांचीं वस्ती बरींच आहे. त्यांपैकीं एखाद्या उपाध्यायांची माहिती प्रयाग मुक्कामींच काढून त्यांना आगाऊ पत्र पाठवून स्टेशनवर बोलावल्यास अधिक चांगलें; म्हणजे हमाल, टांगा, तसेंच तेथील इतर पंडे लोकांकडून होणारा त्रास वाचेल.

काशी शहराचें वर्णन

काशी हें शहर उत्तरवाहिनी गंगेच्या पश्चिम तीरावर फार प्राचीन काळापासून वसलें आहे. या क्षेत्राची मर्यादा गंगेला ज्या ठिकाणीं आसी व वरुणा या नद्या मिळतात त्यांच्या मधला जो प्रदेश आहे तेवढीच होती, पण गेल्या २०–२५ वर्षांत ह्या शहराची फार मोठी भरभराट झाली आहे. आतां हें शहर दाक्षिणोत्तर ६ मैल व पूर्व-पश्चिम ४ मैल पसरलेलें आहे. इतर शहराप्रमाणें काशीचेहि दोन भाग पडतात. जुनी वस्ती व नवी वस्ती. जुन्या वस्तींत मोठे रस्ते नाहींतच. अरुंद व नागमोडी रस्त्यांचें बोळ (गल्ल्या) आहेत आणि हे बोळसुद्धां इतके अरुंद आहेत कीं, गाडी वा टांगा इतकेंच काय रिक्षाहि जाऊं शकत नाहींत. त्यामुळें चौकांत उतरून बरोबरचें सामान हमालाच्या डोक्यावर देऊन ठिकाणावर पायींच जावें लागतें; ही एक मोठी अडचण आहे व त्यामुळें ती त्रासदायक व खर्चीक होते. ही जुनी वस्ती फार प्राचीन काळापासूनची आहे आणि ती गंगेच्या पश्चिम तीरावर कांठाकांठानें पसरली आहे. पूर्वी ही वस्ती इतर

श्रीक्षेत्र काशी

काशी कांची च मायाख्यात्वयोध्या द्वारावत्यपि
मथुरावन्तिका चैताः सप्तपुर्योऽत्र मोक्षदाः ॥

अर्थ—काशी, कांची, हरद्वार, अयोध्या, द्वारका, मथुरा, उज्जयिनी ह्या सप्तपुऱ्या मोक्षदायक स्थानें आहेत.

वरील सप्तकांत मुख्य स्थानीं श्रीक्षेत्र काशी ही नगरी आहे, अर्थात ह्या सात नगरींमध्यें मुख्य मोक्षपुरी श्रीक्षेत्र काशीस प्रथम स्थान आहे. काशी क्षेत्राची महति हजारों भाविकांनीं वर्णिलेली आहे. 'काशी खंड' नांवाचा जो पौराणिक ग्रंथ आहे तो तर फक्त काशींतील देवदेवतांच्या स्तवनानें भरलेला आहे. प्रयाग, काशी, गया ह्या त्रिस्थळी यात्रेंत श्रीक्षेत्र काशी हें प्रमुख क्षेत्र समजलें जातें. कित्येक भाविक हिंदूंना असें वाटतें कीं, आपलें शेष आयुष्य काशी येथें घालवावें व आपल्यास काशींतच मरण येऊन आपल्या अस्थि गंगेंत पडाव्या. कित्येक तर काशी येथील ज्ञानवापीमध्यें जलसमाधि घेत असत.

रेल्वे मार्ग

प्रयाग तीर्थ आटोपल्यानंतर तेथून श्रीक्षेत्र काशीस यावें लागतें. प्रयागहून काशीला जाण्यास तीन मार्ग आहेत. (१) जबलपूरहून नैनी

प्राचीन शहरांप्रमाणेंच होती. म्हणजे धुळीचे रस्ते, अरुंद वोळांतून पसरलेली मोडकी-तोडकी फरशी, ठिकठिकाणीं अस्वच्छता, अशा प्रकारची होती. परंतु अलिकडे हें स्वरूप पार बदलून गेलें आहे. डांबरी व सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते, उत्तम फरशीचें रुंद बोळ, स्वच्छता राखलेली व आधुनिक सुधारणांनीं युक्त अशी ही बनली आहे. जुन्या वस्तीच्या पश्चिमेस, नवी वस्ती म्हणजे कॅन्टोन्मेंट. प्रयागहून येतांना प्रथम डाव्या हाताला कॅन्टोन्मेंट भाग व कॅन्टोन्मेंट स्टेशन लागतें; नंतर उजव्या हाताला काशी शहराचा भाग व काशी स्टेशन लागतें. हें स्टेशन डफरीन पुलाजवळ व शहराच्या उत्तर टोंकास आहे.

कॅन्टोन्मेंट भाग सुधारलेला आहे. सर्व आधुनिक सुखसोयींनीं युक्त, स्वच्छ, हवेशीर व विरळ वस्तीचा आहे. तेथें सरकारी कचेऱ्या, बडे अधिकारी व श्रीमंत लोकांचे बंगले तसेंच लष्करी शिपायांच्या बराकी आहेत.

गंगा मातेचें महात्म्य

काशीला गंगेचा आकार धनुष्याकृति आहे. येथील गंगेचा देखावा अवर्णनीय आहे. लिहून लिहून कल्पना तरी किती देणार व येणार. प्रत्यक्ष पाहूनच नेत्रसुख अनुभविलें पाहिजे. येथें गंगा अगदीं संथ वहाते. तिचा संथ प्रवाह, कांठावरील उंच उंच इमारती, अनंत उतरते स्नान घाट. त्यावरील प्रचंड स्त्री–पुरुषांचा जमाव, कोणी संध्या करीत आहेत, कोणी जप करीत आहेत, कोणी ध्यानस्थ बसले आहेत, कोणी स्नान करीत आहेत, कोणी बुड्या मारीत आहेत, कुठें पूजा चालली आहे, कुठें आरती चालली आहे, वेदघोष चालला आहे. हरगंगे, जयगंगे, जयमाताजी असे घोष निनादत आहेत. माणसांनीं गजबजलेल्या नावा इतस्ततः फिरत आहेत, मंजूळ वाद्यें वाजत आहेत, सर्वांची निरनिराळ्या व्यवसायी लोकांची धावपळ, जो तो आपापल्या कार्यांत निमग्न; अशा तऱ्हेचें हें सर्व दृश्य किती विलोभनीय आहे, हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय समजणार नाहीं. काशीच्या दक्षिणेला दुर्गामंदिराजवळ आसी नदी जेथें गंगेला मिळते, त्या संगमापासून गंगेचे घाट सुरू होतात. हे घाट तीन मैलपर्यंत पसरलेले आहेत.

एवढ्या अंतरांत ८४ घाट आहेत. त्यांमध्यें हरिश्चंद्र घाट, अहिल्याबाई घाट, दशाश्वमेध घाट, मणिकर्णिका घाट, शिंदे घाट, पंचगंगा घाट, तुळसी घाट आदि अनेक प्रसिद्ध आहेत. गंगेमध्यें होड्यांची गर्दी असते. या होड्या भाड्यांनीं मिळतात. होडींत बसून गंगेचा फेरफटका केल्यास दोन्ही तीरावरील अपूर्व शोभा दिसते व हें दृश्य पाहून देहभान हरपलें जातें.

मोठमोठ्या नद्या जिच्या पासंगालाही पुरणार नाहींत अशी आपली साऱ्यांची माता गंगा ही एका विशिष्ट त्याग–संस्कृतीचा, श्रम–यज्ञ–संस्कृतीचा आदेश आपणांस सातत्यानें देत आलेली आहे.

अवघ्या १५०० मैलांचा हिचा प्रवाह, नगाधिराज हिमालयांतील गंगोत्रीपासून हुगळीपर्यंतचा प्रवाह, एका छोट्या प्रांतांतून वाहात पण विशाल राष्ट्रजीवनावर हजारों लाखों वर्षें परिणाम करीत आला आहे. या जलौघाची स्मृति हा आमच्या जीवनाचा आदि आणि अंत आहे.

'राष्ट्राचा उद्धार' ही एकच धारणा पूर्वजांचें रूपानें करून सगरपुत्र भगीरथाच्या महान् वैयक्तिक मनःसामर्थ्याची आणि त्याच्या राष्ट्राच्या दीर्घोद्योगाची स्वच्छ निशाणी काठच्या कठीण फत्तरांना असणाऱ्या आघात खुणांनीं गंगा पाहाते आहे. आपल्या उगमापासून ते काशीपर्यंत भिन्न भिन्न पंथांचें माहात्म्य, तपस्या आणि हौतात्म्य या पावनसरितेनें पाहिलेलें आहे. हिच्या प्रवाहाचा छोटेपणा परिणामाच्या दृष्टीनें पाहतां मोठा होतो. २००० मैलावरच्या रामेश्वरास आपल्या पाण्याची कावड पाठवून भूप्रदेशाचे एकत्व, अखंडत्व आणि थोर सत्त्व या नदीनें पारखलें आहे. ५० हजार चौरस मैल टापूमध्यें प्रत्येक मरणसन्मुख माणूस घोट, नाहीं एक थेंब मागण्याच्या आर्त मनःस्थितींत आहे हें ही नदी जाणते आहे. धर्मातीत राज्य, सहिष्णुतेचा अतिरेक, त्यागाची सर्व सीमा ओलांडलेला एक विशुद्ध मानवी समाज आपल्यासभोंवार आहे. त्याचे अविरत तपःस्वाध्यायेश्वरप्राणिधानानी व्यवहार चालत आहेतच हेंहि गंगामाता जाणते आहे. पुनः पुनरपि तिह्न्यमाताः अशा आचारधर्माचा पाठ या अर्धा लाख चौरस मैलांतून कणाकणानें या जलमातेनें दिला आहे. तिची जन्मकथाहि अशीच विरोधांतून उभी आहे. अर्थात् जगद्धिताय, जगत्सुखाय आमचे आंतर्राष्ट्रीय

बहुवचनाचें धारिष्ट या जलप्राशनानें आम्हीं उभे केलेंच पाहिजे. साऱ्या जगांतली शांति, पावित्र्य अन मांगल्य या पाण्यांत आहे. गंगामातेची संस्कृति हीच उद्यांच्या जगाची संस्कृति आहे.

क्षेत्राचें महत्त्व

काशी हें सर्व क्षेत्रांचें आदीपीठ आहे. तसेंच तें धार्मीक शास्त्र, वेदविद्यादिकांचें आदीपीठ आहे. प्राचीन विद्या, कला व ज्ञान यांचें भांडार येथें असून विद्वान व संत-सत्पुरुषांचें हें निवासस्थान आहे. येथें मंदिरें तर इतकीं आहेत कीं या 'क्षेत्राला मंदिरनगरींच' म्हणणें अधिक शोभेल.



गंगामाता, घाट व मंदिरांचें दृश्य

'काशीस जावें नित्य वदावें' यानुसार बहुतेक सर्व भरत-खंडांतून एकमात्र हिंदू एकदां तरी या क्षेत्राला भेट देतोच. विद्येचें आदीपीठ असल्यानें तेथील शास्त्र-निर्णय अखिल भरतखंडांत मानला जातो.

अखिल हिंदूंचें हें मुख्य पूजास्थान असल्यानें या नगरीच्या वाढींत व शोभेंत अनेक धनिकांनीं व राजांनीं भाग घेतल्यामुळें तेथें देवालयें, घाट, राजमंदिरें, अन्नछत्रें, विद्यापीठें यांची गर्दी आहे. नुसतीं अन्नसत्रेंच चारशेंच्या

वर आहेत ! आजकालच्या महागाईंत व कठीण दिवसांतहि श्रीकाशी-विश्वेश्वराच्या सान्निध्यांतील हीं अन्नसत्रें आजहि अखंड चालू आहेत; हें पाहून हिंदूंच्या आपल्या धर्माबद्दलच्या व या पूज्य स्थानाबद्दलच्या भक्तीभावाची कल्पना येते. 'नान्नोदकं समं दानं' हीच भावना या बुडाशीं असावी असें वाटतें.

काशीस इहलोकींचीं व परलोकींचीं सुखसाधनें संपूर्ण भरलीं आहेत. नेहमीं येथें कोणत्या ना कोणत्या तरी देवतेचे उत्सव चालूं असतात. तीर्थवास करणारास यासारखें सोयीचें स्थळ नाहीं. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास या चार आश्रमांची सोय येथें आहे. मथुरा-वृंदावना-प्रमाणें काशीमध्यें लहानमोठीं चारपांच हजार तरी देवळें आहेत. सर्वसाधारण यात्रिक मुख्य मुख्य तेवढ्या देवळांना भेटी देतात व यात्रा पुरी करतात.

हिंदू धर्माचा जिवंत चिवटपणा पहायचा असेल तर त्यानें काशी जरूर पहावी. येथें देवळें इतकीं आहेत कीं, दर देवळापुढें तांदळाचे चार चार दाणे ठेवायचे म्हटलें तरी दोन मण तांदूळ लागतील. अन्नछत्रें इतकीं आहेत कीं, एका अन्नछत्रांत आज जेवल्यानंतर पुन्हां त्याच अन्नछत्रांत जेवण्याचा प्रसंग एक वर्षानें यायचा. ही अतिशयोक्ती नाहीं. येथील एक वैशिष्ट्य असें कीं, काशी विश्वेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक असूनहि येथें सोवळ्या ओवळ्याचें विशेष बंड नाहीं. इतकेंच काय पण अखिल हिंदूंच्या या मुख्य देवाजवळ जातीभेदहि नाहीं. सोवळ्यापासून ओवळ्या-पर्यंत, ब्राह्मणापासून शूद्रापर्यंत, अस्पृश्यापासून स्पृश्यापर्यंत कोणीहि शुचिर्भूत होऊन महादेवास स्पर्श करून पूजन करावें. भेद नाहीं, प्रत्यवाय नाहीं. अखिल हिंदूंच्या एकतेच्या दृष्टीनें हें केवढें आदरणीय उदाहरण आहे.

वेदकाळापासून काशी हें अखिल हिंदूंचें यात्रास्थान बनलें. तेव्हां-पासून म्हणजे सरासरी तीन हजारांचेंवर वर्षांपासून हिंदुधर्मामध्यें या स्थानाला जें महत्त्व प्राप्त झालें आहे, तें आजहि कायम आहे. याप्रमाणें हिंदुधर्म व बौद्धधर्म या दोन्ही धर्माचें हें पवित्रस्थान बनलें आहे.

गौतमबुद्धाप्रमाणेंच कुमारीलभट्ट, वल्लभाचार्य, रामानुजाचार्य, कबीर, शीख धर्माचा गुरुनानक, भक्तिपंथ प्रस्थापक चैतन्य, तुळसीदास, आदि प्राचीन पंथ व संप्रदाय प्रचारकांनीं या आद्यपीठासमोर आपली हजेरी दिली आहे. संत तुळसीदास मूळचा अयोध्येचा पण त्यानें आपलें प्रसिद्ध रामायण काशीसच रचिलें. याचें स्मारक तुळशीघाट या नांवानें काशीस आहे. याप्रमाणें प्राचीनच काय पण अर्वाचीन कालांतील पंथप्रवर्तकांनाही आपल्या मतास मान्यता मिळविण्यासाठीं काशीस यावें लागलें आहे. आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद, रामकृष्ण पंथाचे विवेकानंद, थिऑसॉफी पंथाच्या ॲनी बेझंट आदि व भागवत संप्रदायाचे, ज्ञानेश्वर, नामदेव, रामदास आदि अनेक काशीस येऊन गेले. इतकेंच काय पण औरंगजेबाचा भाऊ दारा हा संस्कृत भाषेचा व उपनिषद् तत्त्वज्ञानाचा चहाता असल्यामुळें येथें येऊन राहिला होता. इतकें विद्याविषयक व धर्मशास्त्रविषयक काशीस महत्त्व पुरातन कालापासून आजतागायत आहे.

प्राचीन माहिती

प्रारंभीं श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें काशी हें क्षेत्र सप्त मोक्षदायक स्थानांपैकीं असून श्रीविष्णूच्या नासिकास्थानीं आहे. ज्याप्रमाणें भीमेला पंढरपूरला चंद्रभागा हें नामाभिधान प्राप्त झालें आहे; त्याप्रमाणें गंगामातेला भागीरथी हें नामाभिधान येथें प्राप्त झालें आहे. भागीरथीला आशी व वारणा अशा दोन लहान नद्या येथें भेटतात. या दोघींच्या पट्ट्यांत या क्षेत्राची वस्ती आहे. सर्व क्षेत्रांत हें आदि क्षेत्र आहे. प्राचीन विद्येचें माहेरघर व सत्पुरुषांचें निवासस्थान म्हणून याची फार प्राचीन कालापासून ख्याति आहे.

याचें पुरातन नांव 'वाराणशी' असें आहे. 'वाराणशी' हें नांव विस्तारवाचक असून तें काशी शहराचा विस्तार दाखवितें. प्रयागला गंगा-यमुना एकरूप झाल्यानंतर जी गंगा काशीला येते. ती काशीला चन्द्रकोरी बनते. या कोरीच्या उत्तर टोंकाला 'वारणा' व दक्षिण टोंकाला 'आशी' अशा नद्या गंगेला मिळतात आणि या दोन नद्यांच्या मधील

विस्तार हा काशीचा असल्यामुळें काशी नगरीला ' वाराणशी ' म्हणतात. ' काशी ' हें नांव गुणवाचक आहे. ' काशी ' शब्दाचा अर्थ चकाकणारें—प्रकाशणारें असा आहे, यामुळें हें नांव अगदीं सार्थ वाटतें. कारण हिंदु-धर्माचा व संस्कृतीचा प्रकाश काशीहूनच सर्वत्र फैलावला आहे व या नगरीचा हा लौकिक पुरातन कालापासून आजतागायत कायम आहे; म्हणूनच या नगरीला ' काशी ' म्हणतात.

ब्रह्मापासून सगुण ब्रह्म, प्रकृति इत्यादि अंगें प्रगट झालीं म्हणून याला काशी हें नांव मिळालें; पण वरील उपपत्तीच खरी वाटते. गंगेच्या आगमनापूर्वीपासून काशीचें वास्तव्य आहे. ' बनारस ' हें वाराणशीचें अपभ्रष्ट रूप आहे. फार प्राचीन कालीं बनार नांवाच्या राजानें या शहराची सुधारणा केली म्हणून तेव्हांपासून हें बनारस म्हणून प्रसिद्ध आहे. थोडक्यांत म्हणजे पौराणिक कालांत ' वाराणशी, ' धार्मिक वाङ्मयांत ' काशी ' व आधुनिक व्यवहारांत ' बनारस ' अशा या तीन नांवांनीं हें प्रसिद्ध आहे.

हिमालयाचे पलीकडून आर्य येऊन काश्मीरांत प्रथम स्थायीक झाले. तेथून त्यांच्या वसाहती पुढें वाढत गेल्या. याप्रमाणें पंजाब प्रांतांतून ते पुढें गंगेच्या खोऱ्यांत सपाट मैदानावर उतरले आणि या सुपीक प्रांतांत त्यांनीं वसाहती स्थापिल्या व त्यांत काशी नगराची स्थापना केली. त्यामुळें तें आर्य विद्यांचें, आर्य संस्कृतीचें व आर्य धर्माचें आद्यस्थान बनलें. काशी हें आद्यपीठ असल्यानें हिंदु धर्माचे व समाजाचे मोठमोठे सुधारक व पंथसंस्थापक, यांना आपलें नवमत प्रस्थापित करण्यासाठीं काशीस जाणें भागच पडे. याला अनुसरून गौतमबुद्धाला आपल्या नव्या धर्माची घोषणा करण्याकरितां काशीस यावें लागलें व काशीपासून पांच मैलांवर असलेल्या ' सारनाथ ' याठिकाणीं संघ स्थापावा लागला; म्हणूनच काशी व सारनाथ हीं स्थानें बौद्धधर्मीयांना फार पवित्र वाटतात व या स्थानांचें दर्शन घेण्यासाठीं चीनसारख्या दूर दूर देशांहूनहि बुद्ध प्रवासी येत असतात.

काशी शहराची स्थापना आर्यांच्या वसाहती स्थापन झाल्या वेळे-पासूनची आहे, याचा उल्लेख महाभारतांतहि सांपडतो. हें शहर पुरातन

कालीं अनेक राजांच्या व सम्राटांच्या ताब्यांत होतें. नंतर कालांतरानें तें कोसल, मौर्य, गुप्त, हर्ष अशा अनेक साम्राज्यांत समाविष्ट झालें. नंतर रजपूतांचे ताब्यांत गेलें. रजपूतांच्या ताब्यांत गेल्यावर रजपूत राजांपैकीं बनार नांवाच्या राजानें तें विस्तृत विस्तारलें. या राजानें संगमावर राजघाट नांवाचा किल्ला बांधला होता. त्याचे फक्त अवशेष राहिलेले आजहि दिसतात.

अर्वाचीन माहिती

प्रयागला भारद्वाज ऋषींनीं जसें ज्ञानदान केलें व आजही त्याच जागीं आधुनिक विद्यादान होत आहे, तद्वतच काशी हें पुराणकालापासून

काशी येथील श्रीविश्वेश्वराचें मंदिर

विद्येचें माहेरघर असल्यानें आजहि तें तितकेंच प्राचीन व त्याचबरोबर अर्वाचीन विद्यादानाबद्दल प्रसिद्ध आहे. यांचें गमक म्हणजे आपल्या भारताचे परमश्रेष्ठ पुढारी व हिंदु संस्कृतीचे कट्टर अभिमानी कै. पंडित मदनमोहन मालवीय यांनीं स्थापिलेलें विशाल व भव्य 'हिंदु विद्यापीठ'.

महासाधु कबीर यांचा जन्म व मृत्यु काशींतच झाला. गयेला बौद्धधर्माचा प्रचार सुरू होतांच त्याचा परिणाम काशीवरहि झाला होता. पण नंतर पुन्हां श्रीशंकराचार्यांच्या प्रयत्नानें वैदिक धर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापीत झालें. परकीय संस्कृतीच्या सत्तेमध्यें इतर क्षेत्रांप्रमाणें काशी क्षेत्रालाहि मुसलमान सत्ताधिशांच्या धर्मवेडाची झळ लागलीच. त्यामुळें तेथील देवळें वगैरेंचा नाश झाला व शहराचीहि धूळदाण उडाली. या सातशें वर्षांच्या मुसलमानी अमदानींत फक्त अकबराच्या वेळीं तेवढें या शहराच्या नशिबीं चांगले दिवस आले. त्यामुळें या कालांत पुन्हां देवळें बांधलीं गेलीं. त्याच वेळीं मानमंदिर, मानमंदिर घाट व वेधशाळा बांधण्यांत आली. पण पुढें लवकरच औरंगजेबाचें ग्रहण या नगरीस लागलें आणि अकबराच्या वेळेपासून मिळालेल्या स्वास्थ्यावर त्यानें बोळा फिरविला. त्यानें पवित्र व प्रख्यात विश्वनाथाचें देवालय व विष्णूचें देवालय (बिंदू माधव) हीं मंदिरें पाडून त्यावर मशिदी उभारल्या. त्या अजूनहि प्रत्येक हिंदु यात्रेकरूला त्याच्या हिंदुधर्मछलाची साक्ष देतात व हिंदूंच्या दुर्बलतेबद्दल लाज वाटावयास लावतात. या देवळांप्रमाणेंच आणखीहि अनेक देवालयांचा त्यानें नाश केला.

औरंगजेबाला तर असें वाटत होतें कीं हिंदुधर्म, हिंदु समाज व हिंदु संस्कृति नष्ट करण्याकरितां काय करूं नी काय नाहीं ! देवळें मोडणें, मूर्ति फोडणें, विहिरी–तलाव अपवित्र करणें, हिंदूंना बाटविणें, हिंदु वाङमय-कला नष्ट करणें; एवढ्यानेंहि भागणार नाहीं म्हणून त्यावर मशिदी बांधणें, उर्दूची सक्ती करणें, हिंदू म्हणून जगणारावर जुलमी कर लादणें व मुसलमान धर्माचा प्रसार करणें अशा अनेक खटपटी त्यानें करून पाहिल्या. काशी हें क्षेत्र तर हिंदूंचें मुख्य क्षेत्र. तेथें याची झळ न लागती तरच नवल होतें. खुद्द काशीविश्वेश्वराच्या मूळ स्थानावरच त्यानें मशीद बांधली व ती आजहि पहावयास मिळते; इतकेंच नव्हें तर काशी नगराचें नांवहि बदलून 'महमदाबाद' ठेवलें. नाशिकचेंहि नांव असेंच बदलून 'गुलछनाबाद' ठेवलें होतें. प्रगायचेंहि नांव अलाहाबाद झालें. परंतु तीं पुरातन पवित्र नांवें अद्याप चालू राहिलींच व पुढेंहि रहाणार. हिंदुधर्म, संस्कृति व क्षेत्रें तर नष्ट झालीं नाहींतच, पण त्याला मात्र निराशावस्थेंत मरून जावें लागलें. काशी क्षेत्र

तर नष्ट झालें नाहींच, उलट तें प्राचीनतेप्रमाणें आजहि तितक्याच श्रेष्ठतेनें व तेजानें तळपत आहे. यांचें रहस्य हिंदु धर्माच्या चिवटपणांत व अमर तत्त्वांत आहे. त्यांपैकींच परधर्मसहिष्णुता हें हिंदुधर्माचें उच्च तत्त्व किती श्रेष्ठ दर्जाचें आहे याचें उत्तम प्रतिक म्हणजे विश्वेश्वराचे देवळाजवळील मशिदीचें वास्तव्य ! औरंगजेबाच्याच पाउलावर पाऊल टाकून हिंदुराजे वागते तर ही मशीद आज या ठिकाणीं दिसती ना !

हिंदुधर्माचें वैशिष्ट्य

कोणताहि धर्म, संस्कृति असो तिच्या उच्चपणाचें गमक एकच कीं तीमध्यें परधर्म, परमत, परविचार, परआचार या सर्वांविषयीं सहिष्णुता असली पाहिजे तरच तो धर्म किंवा ती संस्कृति श्रेष्ठ ठरते. आणि अशी सहिष्णुता या महान हिंदुधर्मांतच, आहे ही गोष्ट वादातीत आहे. आततायीपणा, अत्याचार, जुलूम, जबरदस्ती हे धर्माचे खरे मार्गच नव्हत. हे सुसंस्कृत मानवाला न शोभणारे मार्ग आहेत, किंबहुना मानवतेला काळीमा फासणारे आहेत. कोणीहि सुबुद्ध, विचारी, पंडित, विद्वान या मार्गांचें समर्थन करूं शकणार नाहींत. हें तत्त्व प्राचीन कालापासून हिंदु संस्कृतीनें, थोर थोर महात्म्यांनीं, साधूंनीं व संतांनीं वेळोवेळीं शिकविलें. आपले पूज्य नेते महात्मा गांधीहि हेंच सांगून गेले व आज आपले लोकप्रिय पंतप्रधान नेहरू तेंच सांगत आहेत; नुसते सांगत नाहींत तर तें आचरणांत आणीत आहेत. कोणी कसेंहि वर्णन करो, अखेर काल हा सूड उगवितोच. 'सत्यमेव जयते' हेंच खरें.

हिंदुधर्माचें रहस्य मूर्तींत, देवळांत, एखादा लहानसा जलाशय अशा अशाश्वत वस्तूंमध्यें नसून शाश्वत तत्त्वांमध्यें आहे. याचें एकच उदाहरण म्हणजे कोणतीहि वस्तू नष्ट किंवा भ्रष्ट झाली असेल तर तिचा उद्धार तिची शुद्धता गंगोदक, गोमूत्र व मंत्र यांनीं करतां येतो. जोपर्यंत ही त्रयी नष्ट होत नाहीं व होणें शक्यहि नाहीं तोंपर्यंत हा धर्म अमरच रहाणार; हें त्रिकालाबाधीत सत्य आहे. याला पुष्टीदायक असा एक ढळढळीत पुरावाच सादर करतो.

कै. लोकमान्यांच्या वेळीं अखिल भारताच्या परिचयाचें झालेले पाश्चात्य विद्वान पंडित ख्रिस्तवासी सर व्हॅलेंटाईन चिरोल हिंदूंच्या पवित्र धर्माबद्दल काय म्हणतात पहा. " हिंदु धर्मांतिल आर्यसंस्कृतीचे अनेक सद्गुण फारच प्रशंसनीय व सर्वांत श्रेष्ठ आहेत. हा धर्म जसा बुद्धाच्या कोटीक्रमाला भुलला नाहीं, तसाच महंमदीयांच्या समशेरीलाहि हरला नाहीं. इंग्रजांच्या सुधारणांनीं जसा मोहून गेला नाहीं, तसाच ख्रिस्ती धर्माच्या जाळ्यांतही सांपडला नाहीं ! याचा चिवटपणा कांहीं अवर्णनीय आहे. "

हिंदुधर्माचा चिवटपणा

हिंदु धर्मावर गेल्या साडेतीन हजार वर्षांत अनेक परधर्मीय संस्कृतींचें आक्रमण झालें पण एकाहि संस्कृतीला या धर्मावर विजय मिळवितां आला नाहीं. बुद्धधर्माचा बौद्धिक हल्ला, मुसलमान धर्माचा लष्करी व सामाजिक हल्ला, ख्रिश्चन धर्माचा बौद्धिक व आर्थिक हल्ला या सर्व हल्ल्यांना तोंड देऊन हिंदुधर्म आजतागायत त्याच विजिगीषु वृत्तीनें टिकला आहे. बौद्धधर्माच्या पाठीशीं ,बुद्धासारखा महात्मा व राजाश्रय असतांहि हिंदुधर्मानें त्याला पचवून टाकलें. मुसलमानधर्माला लष्करी सामर्थ्य व राजाश्रय होताच. त्याच्या जोरावर या धर्मानें अनेक देशांतील संस्कृतीची व तेथील धर्मांचीं पाळेमुळें खणून काढून फडशा पाडला. इतकेंच काय पण त्याची खूणहि राहूं नये म्हणून त्यांच्या धर्मग्रंथांचाहि नाश केला. तोच प्रयोग त्यानें हिंदुधर्मावरही केला पण येथें मात्र त्याला हात टेकावे लागले. वेदासारख्या आद्य ग्रंथांचा त्याला नाश करतां आला नाहीं कारण वेद हे निव्वळ ग्रंथांत न रहातां मुखोद्गत होते, म्हणूनच ते रक्षिले गेले. आपल्या पाशवी पद्धतीनें या धर्मानें अनेक देश मुसलमानमय करून टाकले पण भारतावर सातशें वर्षें सत्ता टिकूनहि एवढ्या मोठ्या दीर्घकालावधींत त्याला भारत मुसलमानमय करतां आला नाहीं. इतकेंच नव्हे तर या प्रचंड प्रदेशांत या धर्माचे अनुयायी १।४ पेक्षांही अधिक नसावेत हें आश्चर्य नव्हे काय ? तीच गती ख्रिश्चनधर्माची. गोव्यासारखा चिमु-

कला प्रदेश जेथें संपूर्ण ख्रिस्तमय करतां आला नाहीं, तेथें संपूर्ण भारताची तर गोष्टच वेगळी. गोव्यांत सुद्धां पांचशें वर्षे सत्ता असूनहि आज देखील हिंदूंपेक्षां ख्रिस्ती कमीच आहेत.

या तीनही संस्कृतीच्या पाठीशीं जबरदस्त सत्ता, अलोट सामर्थ्य व अपार साधनें होतीं तर उलट हिंदु संस्कृतीला कोणीहि जबरदस्त त्राता नव्हता. फक्त दुबळी, अज्ञ, भोळी व गरीब जनता तेवढी होती. अशा स्थितींतहीं या देशांत मुसलमान पुरते १० टक्के व ख्रिस्ती २ टक्केही नाहींत, हा केवढा चमत्कार आहे ! हिंदुधर्मांत अशी काय अद्भुत शक्ती आहे ? कशामुळें हिंदुधर्माचें सातत्य टिकून राहिलें त्याहे ? हिंदुत्वाच्या या अद्भूत चिवटपणाचें रहस्य कशांत आहे ?

हिंदुधर्म-ग्रंथाचा आदर्श

यांचें उत्तर एकच. हा धर्म फार लवचीक आहे. प्राप्त परिस्थितीनुसार मुरड घालून प्रगतीपथावर जाणारा आहे. याच्या धर्मग्रंथांत म्हणजे वेदांत त्रिकालाबाधींत तत्वें ग्रथित केलेलीं आहेत आणि त्यांतून विजिगीषु वृत्ति ओसंडत असते. वेदांतील उच्च आदर्श हिंदु जनता शतकानुशतकें आचरीत आली आहे व आचरीत आहे. वेदांत जीवनाचे आणि नीतीचे जेवढे उच्च आदर्श आहेत, तेवढे पृथ्वीच्या पाठीवरील दुसऱ्या कोठल्याहि ग्रंथांत सांपडावयाचे नाहींत. वेद मुखोद्गत करून, गेले साडेतीन हजार वर्षें त्यांचें रक्षण करण्यांत आलें; या चमत्काराला व गेलीं हजारों वर्षें अनेक राजकीय आणि सामाजिक उलाढाली होऊन आणि परकीयांचे हल्ले होऊनहि वैदिक धर्माचें सातत्य टिकून राहिलें; या सामर्थ्याला मानवजातीच्या इतिहासांत दुसरी तोड नाहीं ! विस्कळीत अशा सध्यांच्या वैदिक धर्मांत जर एवढें सामर्थ्य आहे तर तो संघटित झाला तर मानवजातीवर केवढे उपकार होतील ?

श्रीक्षेत्र काशी येथील दर्शनीय स्थळें

विश्वेशं माधवं धुंडीं दंडपाणींच भैरवं ।
वंदे काशीं गुहां गंगां भवानीं मणिकर्णिकां ॥

श्री काशी विश्वेश्वर

फार पुरातन कालापासून अस्तित्वांत असलेल्या व ह्लींच्या अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि धर्मापेक्षां अत्यंत प्राचीन, ज्येष्ठ व श्रेष्ठ व ज्याचे अनुयायी ३० कोटींच्यावर आहेत अशा या धर्माचें व संस्कृतीचें जें आदीपीठ काशी तेथील मुख्य देव जो काशी विश्वेश्वर त्याचें देऊळ अत्यंत लहान पाहून एकप्रकारें मनाला खेद व विस्मय वाटतो वास्तविक या प्रचंड अनुयायी असलेल्या व पुरातन कालापासून प्रसिद्ध असलेल्या धर्माचें व संस्कृतीचें हें मुख्य मंदिर अति भव्य, विविध कलाकुसरीयुक्त व सौंदर्ययुक्त, प्रेक्षणीय, शांत, रम्य, आकार व प्राकारानें मोठ्या प्रमाणावर असेल अशीच कोणाचीहि सहज व स्वाभाविक कल्पना असेल पण वस्तुस्थिति अगदीं उलट आहे हें पाहून मन कसेंसेंच होतें. प्राचीन कालीं कदाचित् या कल्पनेला साजेसें तें असेलहि पण त्यानंतर घडलेल्या विपरीत घडामोडींमुळें ही सध्यांची अवस्था झालेली आहे. आतां आपलें स्वराज्य आलें आहे; तरी हें राहिलेलें कार्य या आपल्या स्वराज्यांत पुरें होईल काय? हें वैगुण्य दूर करण्याकडे आपल्या हिंदु धर्मीयांचें लक्ष जावें व काशीविश्वेश्वरानें त्यांना तशी बुद्धी द्यावी हीच त्याचे चरणीं प्रार्थना.

श्रीकाशीविश्वेश्वर मंदिराचा सुवर्ण कळस

औरंगजेबानें पूर्वीचें देऊळ नाश केल्यानंतर देवी अहिल्याबाई होळकर हिनें हें सध्यांचें देऊळ बांधलें व कळसाला सोन्याचा मुलामा सुप्रसिद्ध पंजाब सिंह राजा रणजितसिंग यानें दिला. देवळाच्या पटांगणांत लाल दगडाचा नंदी आहे. याचें तोंड ज्या दिशेस आहे त्या बाजूस पूर्वीचें देऊळ होतें. मुसलमानी अमलांत तें भ्रष्ट झालें व तेथें मशीद उभारली गेली !

परधर्मीयांच्या हल्ल्यामध्यें या स्थानाचा नाश झाल्यानंतर फिरून मूर्तीची व देवालयाची स्थापना कशी करावी या विवंचनेंत भक्तजन असतां मुख्य पुजाऱ्याच्या स्वप्नांत येऊन देवानें सांगितलें कीं, ' माझें मणिकर्णिकेंत वास्तव्य आहे, तेथून मला काढा, शुभदिवशीं देवालयाचे स्थानावर सर्वत्र कापूर पसरा, जेथील कापूर अगोदर पेटेल त्याच जागीं माझी स्थापना करा. ' या दृष्टांताप्रमाणें हल्लींच्या विश्वेश्वराची त्या काळचे विद्वान तपस्वी ब्राह्मण नारायणभट यांचे हस्तें त्या ठिकाणीं विधीपूर्वक स्थापना करण्यांत आली. इतर सर्वत्र कोठेंहि महादेवाच्या देवालयांत पिंडी गाभाऱ्यांत मधोमध असते; पण येथें या देवळांत ती गाभाऱ्यांतील एका कोपऱ्याजवळ आहे याचें कारण हेंच. पिंडी सोन्या-चांदीनें मढविलेली असून आंतील शिवलिंग दोन वीत उंचीचें आहे. आवारांत व गाभाऱ्यांत दर्शनेच्छूंचा प्रचंड जमाव; त्यांत भारतांतील सर्व दर्जाचे, सर्व तऱ्हेचे, सर्व प्रांतांचे, विविध वेषांचे, विविध भाषांचे, आचार-विचारांचे, लहानमोठे, स्त्री-पुरुष-मुलें असा समुदाय; केशरमिश्रित सुगंधि चंदन, सुवासिक फुलें, बेल, अगर-बत्त्या, धूप, दीप, कापूर या सर्वांच्या सुगंधानें गाभारा दरवळून गेलेला;

श्रीकाशीविश्वेश्वर

ग्रंथ संग्रहालय
दा क्र. ५१

जो तो पिंडीवर फुलें, बेल वहात आहे; सर्व पिंडी पाण्यानें, पंचामृतानें, बेलानें भरून गेली आहे; मंत्रांचे घोष चाललेले आहेत; घंटांचा नाद, शंखांचा 'भम् भम्' नाद, चौघड्यांचे सूर, भक्तांचें नामस्मरण असा सर्व सोहळा नेहमीं अखंड चाललेला असतो.

श्रीबिंदुमाधव

श्रीबिंदुमाधव

याहि प्राचीन देवालयाचा नाश केला गेला असून त्या जागीं मशीद बांधलेली आहे ! हल्लींचें देऊळ पुन्हां नवीन बांधलेलें आहे व तें मशिदीशेजारींच आहे. या देवालयांत सतत मंत्रजागर, वेदघोष चालू असतो. वेद ऐकणाराला हें स्थान महत्त्वाचें आहे.

श्रीधुंडीराज

काशी विश्वेश्वराच्या मंदिराच्या अलिकडेच धुंडीराजाचें मंदिर आहे. कोणी यांस ढुंढीराज असें म्हणतात. धुंडीराज म्हणजे श्रीकाशीक्षेत्राचें आदिदैवत गणपतीचें स्थान आहे. श्रीकाशी क्षेत्रीं पोहोंचल्यावर प्रथम यांचें दर्शन घेऊन काशी-यात्रेस प्रारंभ करावा लागतो.

श्रीदंडपाणि व श्रीकाळभैरव

काशीनगरीचे रक्षणकर्ते दंडपाणि व काळभैरव हीं दोन दैवतें आहेत. काळभैरव हा काशी-विश्वेश्वराचा मुख्य पराक्रमी दूत आहे. त्याचें प्रसिद्ध मंदिर असून श्रीकाळभैरवाची मूर्ति उग्र आहे. या मंदिराचा नाश करण्याकरितां जेव्हां विधर्मीय लोक आंत शिरले, त्या वेळीं त्यांना

परतविण्यासाठीं मंदिरांतून मोठमोठे भुंगे उत्पन्न होऊन त्यांच्यावर तुटून पडले, त्यामुळें हें मंदिर वाचलें. हें दैवत जागृत आहे असें मानलें जातें. काळ-भैरवाष्टक, काळभैरवाचे गंडे विकत घेणें हा तेथील यात्राविधि आहे. गंडे विकणारे लोक यात्रिकाच्या हातांत गंडा बांधतात व हिंदीमध्यें " काळ-भैरवाच्या दर्शनानें यात्रा सफळ झाली " असा काहींतरी मंत्र म्हणून यात्रिकाच्या पाठीवर लहानसा सोटा तीन वेळां मारतात.

श्रीवंदेकाशी

हें स्थान काशीपासून ९ ते ६ मैल दूर आहे. देवीची मूर्ति कमरेपासून वर उभी असून बाकी जमिनींत आहे. ही देवी पंचक्रोशीच्या रस्त्यावर आहे.

श्रीगुहागंगा

वंन्देकाशीपासून पंचक्रोशीच्या वाटेवर दोन मैलांवर गुहागंगा हें स्थान आहे. तेथें डोंगरांतील गुहेंतून गंगेचा प्रवाह निघतो.

श्रीभवानी तथा अन्नपूर्णादेवी

श्रीभवानी म्हणजे अन्नपूर्णादेवी. श्रीकाशीविश्वेश्वराच्या मंदिरांतून बाहेर पडलें कीं, जवळच जगन्माता अन्नपूर्णादेवीचें मंदिर आहे. देवीच्या मंदिराचा सभामंडप बराच मोठा आहे. देवीचा मुखवटा सुवर्णमय आहे. देवीच्या मंडपांत यात्रेकरूं जे डाळ व तांदूळ आपल्या शक्तीप्रमाणें आणून देतात, त्यास " अन्नकूट " असें म्हणतात. हा एक येथील दानविधीचा प्रकार आहे.

मणिकर्णिका तीर्थ

श्री विष्णूनीं आपल्या चक्रानें याची उत्पत्ती केली म्हणून याला ' चक्रपुष्करिणी ' म्हणतात. पण या तीर्थाची निर्मिती होतांच महा-देवाला अतिशय आनंद झाला. त्या आनंदाच्या भरांत त्यानें येथें तांडव-नृत्य केलें. तें करीत असतां त्याच्या कानांतील एक मणी या तीर्थांत

पडला; म्हणून हें ' मणिकर्णिका ' या नांवानें प्रसिद्ध पावलें. आजहि याच नांवानें तें ओळखलें जातें.

हीं काशींतील मुख्य मुख्य दैवतें आहेत. ह्या मंदिरांशिवाय श्रीकाशी क्षेत्रीं अनेक मंदिरें व दैवतें आहेत, त्यांतील प्रमुख आतां आपण पाहूं.

ज्ञानवापी

कृतयुगांत जटिलवान योग्यानें त्रिशूळ मारून विश्वेश्वराजवळ एक कूप निर्माण केला; यालाच ' ज्ञानवापी ' म्हणतात. यांत स्नान केल्यानें मनुष्य ज्ञानसंपन्न होऊन मोक्षप्रत जातो. सध्यां ही विहीर बंद आहे. फक्त त्यांतील पोहऱ्यानें पाणी काढून मार्जनास देण्यांत येतें.

कौदेवीचें स्थान

काशीचें पश्चिमेस हिचें देवालय आहे. येथें गंगेंतून होडीनें जावें लागतें. यात्रेमध्यें हिच्या दर्शनाला महत्त्व दिलेलें आहे. हिच्या दर्शनानें यात्रा पूर्ण होते. हिचें वैशिष्ट्य असें कीं हिला कवडी वाहण्याची प्रथा आहे. पै–पैसा, नाणें हिला टेवीत नाहींत. कवडीलाच महत्त्व आहे. हें आश्चर्य नव्हे काय ?

श्रीक्षेत्र काशी येथील श्रीधन्वंतरीची मूर्ति

पिशाच्च मोचनी

पिशाचमोचनी हें दैवत भयानक आहे. मूर्ती अक्राळ-विक्राळ असून काळ्या पथ्थराची, छाती इतकी उंच असून भेसूर आहे. मूर्तीचा जबडा उघडा असून दांत पुढें आलेले व हात डोक्यावर उपडे ठेवलेले आहेत. मंदिराच्या जवळच एक तळें असून मंदिरांत प्रवेश करण्यापूर्वीं

ल्या तळ्यांत हातपाय धुवून जावें लागतें. ज्याला पैशाचिक बाधा झाली असेल तो तळ्यांत उतरतच नाहीं. देवापुढें खिचडीचा शिधा ठेवावा लागतो.

याशिवाय महिषासुरमर्दिनी मंदिर, कुबेरदेव, गभस्तेश्वर, मातृपितृ-भक्त कुक्कुट ऋषि, साक्षीविनायक, संकटविमोचन हनुमान, व्यासेश्वर इ. अनेक मंदिरें आहेत. त्या मंदिरांचें वर्णन द्यावयाचें म्हटल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होईल.

हरिश्चंद्र घाट

येथील अनेक घाटांपैकीं हा घाट प्रसिद्ध असून पुण्यप्रद मानला गेला आहे. आसी घाटापासून हा घाट सतरावा आहे. या घाटाजवळच हरिश्चंद्राचें स्मशान आहे. काशींतील मृतांकरितां अनेक स्मशानें आहेत, पण या हरिश्चंद्राच्या स्मशानांतील जागा परम पवित्र मानली गेल्यानें तेथें जागा मिळणें परमपावन समजतात. या स्मशानाजवळ ज्या डोंबानें हरिश्चंद्राला विकत घेतलें त्याचें घर आहे.

पौराणिक कालांत सत्यवचनी असा राजा हरिश्चंद्र अयोध्या येथें राज्य करीत असतां, त्याची सत्त्वपरिक्षा विश्वामित्र ऋषीनें घेतली. ब्राह्मणाच्या रूपानें त्याच्या स्वप्नांत येऊन राज्यदान मागीतलें व राजानें तें दिलें. स्वप्नांत दिलेलें वचन जागृतावस्थेंत पुरें करण्याचा राजानें प्रयत्न केला. राज्य गेलें, सर्व कांहीं गेलें. अखेर त्या वचनपूर्तीसाठीं त्यानें पत्नी व पुत्रालाहि विकलें व एवढ्यानेंहि भागेना तेव्हां शेवटीं स्वत:लाहि विकून घेतलें आणि त्याला वर उल्लेखिलेल्या डोंबानें विकत घेतलें. याच स्मशानांत डोंबानें राजाला प्रेतव्यवस्थेवर नेमलें होतें आणि याच स्मशानांत अखेर दुर्दैवानें राजावर आपल्या पत्नीचा स्वत:च्या हातानें अंत करण्याचा बांका प्रसंग आला ! तरीहि राजा न डगमगतां कर्तव्यरत झाला ! धन्य तो राजा आणि धन्य ती आर्यसंस्कृति कीं, जी असे थोर थोर राजे निर्माण करूं शकते.

या हरिश्चंद्र घाटाचें स्मशान डोंबाच्या मालकीचें आहे आणि हा मालकी हक्क त्या कालापासून आजतागायत पिढ्यान्‌पिढ्या वंशपरंपरा त्याच्या घराण्यांत चालू आहे. जशी व्यक्तीची आर्थिक परिस्थिती असेल त्या प्रमाणांत त्या त्या प्रेताचे अग्निसंस्कार करण्याच्या जागेचें भाडें त्याला मिळतें. काशीसारख्या ठिकाणीं मृतांची संख्या नेहमीच जास्त. कारण 'काश्यां मरणान्मुक्तिः' काशींत मरण यावें या भाविक समजुतीमुळें अनेकजण या क्षेत्रीं देह ठेवण्याकरितां मुद्दाम येतात आणि याच स्मशानांत शक्य तों आपला अखेरचा संस्कार व्हावा ही प्रत्येकाची इच्छा. यामुळें उत्पन्नाला तोटा नाहींच. अखंड संपत्ति चालू. यामुळें हें घराणें पिढीजाद श्रीमंत बनलें आहे, तें अद्याप तसेंच आहे !

बनारस हिंदु विश्वविद्यालय

येथील अनेक सुंदर प्रेक्षणीय व अविस्मरणीय स्थलांपैकीं हें एक आहे. हें काशीपासून दक्षिणेस ६ मैल दूर आहे. शहरभाग संपल्यानंतर दुर्गादेवीचें मंदिर व दुर्गातलाव लागतो. त्यानंतर वाटेंत लंका नांवाची वस्ती ओलांडल्यावर या विश्वविद्यालयाचें भव्य व प्रशस्त प्रवेशद्वार लागतें. या विश्वविद्यालयाला स्थापन होऊन ९० वर्षें झालीं. याचा विस्तार फार प्रचंड आहे. आवारच तेराशें एकरांच्या वर आहे. हें एक स्वतंत्र नगरच वसलें आहे. या वस्तींत मधोमध सरस्वती मंदिर आहे व भोवतालीं एकानंतर दुसरें, तिसरें, चौथें अशीं वर्तुळें आहेत व अशी एकूण नगररचना वर्तुळाकार केली आहे. मधून रस्ते आहेत. इमारती प्रचंड व भव्य आहेत. प्रत्येक इमारती सभोंवार प्रशस्त खुली जागा व वृक्षराजी आहेत. सर्व रस्त्यांवर वृक्ष लावलेले आहेत. शेंकडों इमारती असूनहि खेंचाखेंच गर्दी नाहीं. अगदीं मोकळी व हवेशीर भरपूर जागा प्रत्येक इमारतीभोवतीं असून सर्व इमारती हिंदुशिल्पकला पद्धतीच्या बांधलेल्या आहेत. हें त्या इमारतींचें वैशिष्ठ्य आहे. विद्यार्थ्यांचीं वसतीगृहें, प्रचंड ग्रंथसंग्रहालय, पाहुण्यांना उतण्याची सोय, शिक्षकांच्या रहाण्याच्या इमारती, प्रत्येक शास्त्राच्या शिक्षणाच्या व प्रयोगाच्या इमारती, दवाखाना अशा अनेक शेंकडों इमारती आहेत. प्रथम दर्शनींच कै. पूज्य पं. मालवीयजी यांचेकरितां बांधलेला बंगला आहे.

येथें सर्व शास्त्रांचें व शाखांचें शिक्षण मिळतें. इतर विश्वविद्यालयांपेक्षां येथील वैशिष्ठ्य हेंच कीं, येथें धर्मशास्त्र, हिंदुधर्मशास्त्र व षड्दर्शनें यांचा स्वतंत्र अभ्यासक्रम आहे. हिंदुधर्मशास्त्र, धातुशास्त्र, खाणीशास्त्र, औद्योगिक रसायन शास्त्र, आयुर्वेद व शस्त्रक्रिया शास्त्र, संगीतशास्त्र, लष्करी व शारीरिक शिक्षण, स्थापत्यशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रांचें ज्ञान व विज्ञानाचें शिक्षण मिळतें. असली व एवढी व्यापक प्रमाणावर असलेली व विविध साहित्यांनीं युक्त असलेली सोय भारतांत इतरत्र कोठेंच नाहीं. नुसतें एक ग्रंथालयच घेतलें तर त्यांमध्यें विविध विषयांवरील लाखों ग्रंथ असून एका वेळीं हजार विद्यार्थ्यांना एकत्र वाचतां येतें.

या प्रचंड विश्वविद्यालयाचा फायदा अखिल भारतांतील सर्व प्रांतांतील विद्यार्थी घेत असतात. येथें तीन हजारांचेवर विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असतात व एवढ्या सर्वांची येथें रहाण्याचीहि सोय आहे. या प्रचंड संस्थेला आतांपर्यंत दोन कोटींचेवर खर्च लागला आहे आणि हा सर्व पैसा देणगीरूपानें राजेरजवाडे, श्रीमंत व्यापारी व नागरिक यांचेकडून मिळालेला आहे. हा निधी जमण्याचें व प्रचंड संस्था स्थापन होऊन या स्वरूपाप्रत पोंचण्याचें सर्व श्रेय एका महान् व्यक्तीला आहे आणि ती व्यक्ति म्हणजे या संस्थेचे संस्थापक, चालक व प्रवर्तक आदि सर्व कांहीं असलेले, थोडक्यांत म्हणजे संस्थेचे प्राण असलेले थोर वंदनीय पुढारी कैलासवासी पूज्य पंडित मदन मोहन मालवीयजी ही होय. ही संस्था म्हणजे त्यांचें स्मारकच होय.

या संस्थेचें वर्णन कितीहि केलें तरी तें अपुरेंच होईल, एवढी ती प्रचंड आहे. संस्थेच्या आवारांतील रस्तेच २० मैलांचेवर आहेत. त्यांत हजारों वृक्ष आहेत. अशा गर्द छायेंत हें विश्वविद्यालय वसलें आहे. याच्या व्यापाची व विस्ताराची कल्पना प्रत्यक्ष पाहिल्यावाचून येणें शक्य नाहीं; हेंच खरें.

दुर्गादेवी व दुर्गातलाव

हें स्थळ शहराच्या दक्षिण टोंकाला आहे. तलाव तांबड्या दगडांनीं

बांधून काढलेला असून त्याला चारी बाजूंनीं पायऱ्या आहेत. जवळच आसीचा संगम आहे. या संगमापासूनच गंगेचे घाट सुरू होतात.

गंगातटाकीवरील घाट

गंगेच्या तीरावर राजेरजवाड्यांनीं अनेक घाट बांधले आहेत. नावेंत बसून ह्या घाटांची व त्यावरील इमारतींची व मंदिरांची शोभा पहाण्यासारखी आहे. आपण त्यांतले प्रमुख घाट घेऊं.

पहिला घाट हा येथील आसीचा घाट आहे, नंतर तुळशी घाट लागतो. या घाटावर बसून संत तुळसीदासानें प्रसिद्ध तुळसी रामायण ग्रंथ रचिला. त्याचें हें स्मारक आहे. यानंतर अनेक घाट लागतात.

प्रल्हाद घाट—हा अतिप्राचीन घाट आहे. यानंतर **नयाघाट** आहे. **त्रिलोचनघाट**—त्रिलोचनेश्वराचें मंदिर आहे. **गायघाट**—ग्वाल्हेर येथील

दशाश्वमेध घाट

कै. बाळाबाईनें बांधला. याच्यानंतर **लालघाट**, नंतर **शीतळा घाट**, **ब्रह्माघाट**—ब्रह्मेश्वराचें व श्रीदत्तात्रयाचें मंदिर आहे. **दुर्गाघाट**—श्रीविठ्ठल मंदिर व श्रीदुर्गामंदिर. **बिंदुमाधव घाट**—श्रीमंत औंधकर प्रतिनिधि यांचें श्रीबिंदुमाधवाचें मंदिर. **पेशवे घाट**—श्रीबालाजीचें मंदिर, **मंगळागौरी घाट**—श्रीमंगळागौरी व गभस्तीश्वर यांचीं मंदिरें, **जठार घाट**—लक्ष्मीनारायणाचें मंदिर, **रामघाट**—रामनवमी उत्सव, **अग्नेश्वर घाट**—गणेश मंदिर, **भोंसला**

घाट–श्रीमंत नागपुरकर भोसले यांचा घाट, **संकटा घाट**–संकटादेवी व सिद्धेश्वर देवीचें मंदिर, **चक्रपुष्करिणी घाट**–तारकेश्वराचें मंदिर, **स्मशान घाट**–येथें दूर ठिकाणाहून दहनाकरितां प्रेतें आणतात. **ललिता घाट**–ललिता देवीचें मंदिर, **मानमंदिर घाट**–ज्योतिषाचीं चक्रें, **दशाश्वमेध घाट**, याचे जवळच **अहिल्यादेवी घाट** असून वरती मंदिर आहे. **मुनशी घाट**–नागपूरकरांचे दिवाण यांचा वाडा, **राणामहल घाट**–महाराजा उदेपूर यांचा वाडा, **चौसष्टी घाट**–चतुःषष्टी देवीचें मंदिर, **पांडे घाट**–श्रीमंत अमृतराव पेशवे यांचा, **राजघाट**–पेशव्यांचा वाडा, **नारद घाट**–या घाटानंतर **मानसरोवर घाट**–मानसरोवरचें कुंड, **क्षेमेश्वर घाट**–कुमारस्वामीचें छत्र आहे. **केदारघाट**–श्रीकेदारेश्वराचें मंदिर, **हरिश्चंद्र घाट**–या घाटावरच राजा हरिश्चंद्र डोंबाकडे राहात होता. **हनुमान घाट**–हनुमानाचें मंदिर, **शिवाले घाट**, यानंतर पुढें **तुळशी घाट**–तुलसीदास यांचा मठ, **लल्लामिश्रि घाट**–रिवा महाराजांचा वाडा.

व्यास काशी

हे घाट पहात नावेंतून सुमारें चार मैल गेल्यानंतर तेथें गंगेच्या तीरावर उतरून थोडें चालून गेल्यानंतर व्यासो नारायणाचे मंदिरांत आपण



व्यास काशीजवळील घाटाचें दृश्य

पोहोंचतों. त्या ठिकाणीं व्यासांची लिंगात्मक शाळुंका असून जवळच त्यांचे सच्छिष्य श्रीशुकदेव यांचीहि शाळुंका आहे. तेथून कांहीं अंतर

चालून गेल्यावर आपण एका भव्य प्रासादाच्या महाद्वाराशीं येतो. तो इतिहासप्रसिद्ध काशीचा राजा चेतसिंग याचा राजवाडा असून सध्यां त्याचे वंशज तेथें वास्तव्य करीत असतात. राजवाड्याची शोभा व राजैश्वर्य सध्यांच्या कालींहि दृष्टोत्पत्तीस पडतें.

सारनाथ

काशी शहराच्या उत्तरेस ५ मैलांवर ' सारनाथ ' म्हणून बौद्ध-धर्मीयांचें पवित्र स्थान आहे. बौद्ध कालांत या स्थानाची फार भरभराट होती. सुमारें हजार दीड हजार वर्षें अस्तित्वांत असलेलें व वैभवानें तळपत असलेलें हें स्थान परधर्मीय धर्मवेड्यांच्या जाळपोळींत नामशेष झालें ! याला आज आठशें वर्षें झालीं. पुराणवस्तु संशोधन खात्यानें उत्खनन करून यांत सांपडलेल्या वस्तु एक संग्रहालय बांधून त्यांत ठेवल्या आहेत. चार हजारांच्यावर वस्तु यांत आहेत.

यांतील कांहीं कलाकृति तर अप्रतिम आहेत. अशोक स्तंभ व त्याचे माथ्यावरील सिंहांची चौकडी, बुद्धानें साक्षात्कार झाल्यावर प्रथम उपदेश केला त्याचें चित्र, बुद्धाचा साक्षात्कारापूर्वीचा उभा प्रचंड पुतळा इत्यादि अनेक आहेत. स्तंभाचे दगड तर इतके गुळगुळीत केलेले आहेत कीं, अशाप्रमाणें इतक्या दीर्घ कालानंतरही हा गुळगुळीतपणा जशाचा तसा टिकून आहे यांचें नवल वाटतें. इतका प्रेक्षणीय व कलाकुसरीनें युक्त असा स्तंभ मूळ चबुतऱ्यावर असतांना किती मनोहर व चित्तार्कषक दिसत असेल याची कल्पनासुद्धां करणें कठीण आहे. अशा या कलाकृतीचा धर्मवेडानें नायनाट व्हावा हें पाहून फार दुःख होतें. येथें सभेच्या वतीनें एक सुंदर तांबड्या दगडांचें बुद्ध मंदिर बांधण्यांत आलें आहे. या मंदिराकरितां बुद्ध धर्मप्रेमी इंग्रज बाईकडून देणगी मिळाली हें विशेष आहे.

सारनाथ हें नांव अर्वाचीन आहे. सारंगनाथ (मृगांचा मुख्य) या नांवाचें हें अपभ्रंश आहे. यांचीं मूळचीं नांवें ऋषिपतन व मृगवन हीं होतीं. या भूमींत एका ऋषीचें देहावसान झालें होतें म्हणून हें ऋषिपतन झालें. सारंगनाथ व मृगवन हीं एकाच अर्थाची आहेत. पूर्वी हें वन होतें.

स्यांत मृगांचे कळप होते. काशीचा राजा मृगयेकरितां या वनांत येई, येथिल मृगांत बुद्ध आपल्या पूर्व जन्मीं हरीणरूपानें होता. त्याच्या वास्तव्यानें राजाला उपरती झाली व त्यानें मृगया बंद केली व ही भूमि मृगांकरितां राखून ठेवली म्हणून हें मृगवन झालें. पुढें मानवी रूपांत बुद्ध येथें अवतरला तेव्हां राजानें ही भूमि त्याला अर्पण केली. याच भूमींत बुद्धानें आपल्या उपदेशास प्रथम सुरुवात केली. बुद्ध भिक्षु येथें राहूं लागले. प्रथम ते झोपड्यांत रहात पण पुढें अशोकानें त्यांचेकरितां स्तूप व विहार बांधले. कालांतरानें हिंदु व जैनांनहिं आपापलीं मंदिरें बांधलीं, पण त्यांनीं बौध्द विहारांचा नाश केला नाहीं; हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पण तमोगुणी मुस्लीम संस्कृतीनें या सुंदर स्थानाचा पुढें नाश केला. त्यामुळें हें सुंदर व पवित्र स्थान मातीच्या ढिगाऱ्यांत अनंतकाल पडून होतें. पण पुन्हां त्याचा उदयकाल आला. गुणी इंग्रजांच्या प्रयत्नामुळें पुन्हां त्याचें दर्शन घडूं शकलें व आज हें स्थान प्रेक्षणीय म्हणून ठरलें आहे.

श्रीक्षेत्र काशीयात्रा विधि

सर्व पंचक्रोशी मिळून चोवीस यात्रा आहेत. या सर्व यात्रा करण्यास सात दिवस लागतात व २५।३० मैलांचा प्रवास करावा लागतो. त्या त्या ठिकाणीं श्राद्धें करावीं लागतात. या यात्रांचे मार्गावर धर्मशाळा पाण्याच्या विहीरींची सोय आहे. तसेंच श्राध्दास लागणारें सामानही त्या त्या जागीं मिळण्याची सोय आहे. यात्रा कोणी गाडी करून करतात, पण शक्य तों पायीं कराव्या हें चांगलें. या सर्व यात्रा मिळून काशीयात्रा पूर्ण होते. या संपूर्ण यात्रेस **काशीचें धुंडण** म्हणतात. या सर्वांत **पंचतीर्थी** यात्रा सुलभ व सहज होणारी आहे. ही एका दिवसांत आटपते. आसी नदीचा गंगेशीं संगम येथें होतो तें स्थळ या पंचतीर्थांतील पहिलें तीर्थ, दशाश्वमेध घाट हें दुसरें तीर्थ. मनकर्णिकाघाट हें तिसरें तीर्थ. पंचगंगाघाट हें चौथें तीर्थ व वारणा नदीचा गंगेशीं संगम जेथें होतो तें शेवटचें म्हणजे पांचवें तीर्थ. याप्रमाणें या पांचही स्थानांवर स्नान, देवदर्शनादि विधी केले म्हणजे ही पंचतीर्थ यात्रा पुरी होते.

काशींतील बहुतेक विधी पुरूषांचा आहे. स्त्रियांना स्नान, दान व दर्शन एवढाच आहे. पुरुषांना मात्र क्षौर व श्राद्धें करावीं लागतात. तीर्थांचें पाहिलें श्राद्ध, पंचक्रोशीचीं पांच श्राद्धें, पंचतीर्थांची पांच श्राद्धें व पिशाच्च मोचन हें शेवटचें श्राध्द अशीं बारा श्राध्दें आहेत. हीं श्राध्दें झाल्यावर काळभैरवाष्टक व त्याचें ब्राह्मण–भोजन, काशीविश्वेश्वरास रुद्राभिषेक, ब्राह्मण-सुवासिनी भोजन, मंत्रजागर, महापूजा, लघुरुद्र याप्रमाणें धर्मकृत्यें आहेत.

या क्षेत्रांतील पहिला विधी ' गंगादर्शन '. या ठिकाणीं गंगापुत्रांना नारळ, दक्षिणा देतात. मणकार्णिका तीर्थ हें येथील मुख्य तीर्थ. यालाच चक्रपुष्कारिणी म्हणतात. विष्णूनें चक्र मारून हें तीर्थ निर्माण केलें म्हणून याला चक्रपुष्करिणी म्हणतात व यांत नृत्य करीत असतां शंकराचे कानांतील मणी पडला म्हणून याला मणिकर्णिका म्हणतात. या तीर्थांतून प्रवाह निघतो ती माणिकार्णिका नदी. ही गंगेला मिळते त्या भागांतील

मणिकर्णिका घाट

गंगेला मणिकार्णिका म्हणतात व तेथील घाटाला मणिकर्णिका घाट म्हणतात येथें प्रथम स्नान करून देवाचें दर्शनास जावयाचें.

...लय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम...४०:७४४... दि: ...१९...
...

महाराष्ट्रीय उपाध्ये

प्रयागप्रमाणें श्रीकाशी क्षेत्रींहि अनेक महाराष्ट्रीय उपाध्ये आहेत. यापैकीं कांहीं उपाध्यायांना बौद्धमतानुयायी अनंगपाल महाराज यांनीं ताम्रपट दिलेला आहे आणि बादशहा अकबर व शाहअलम यांनीं सनदा दिलेल्या आहेत. त्याअन्वयें तेथील तीर्थविधि करून देण्याचा अधिकार फक्त त्या उपाध्यायांनाच आहे. पंडित रामाचार्य पुराणिक, वे. परशुराम-शास्त्री लेले, वे. गंगाधरशास्त्री शिधोरे, वे. सदाशिवशास्त्री गोडबोले, वे.वेणीमाधव दीक्षित जोशी, हे उपाध्ये दुर्गाघाटावर राहतात, वे. करमरकर शास्त्री ब्रह्माघाटावर, वे. रामडोहकरशास्त्री रामघाटावर रहातात. यापैकीं कोणालाहि आगाऊ पत्र पाठवून स्टेशनवर बोलाविल्यास ते उतरून घेण्या-साठीं स्टेशनवर येतात. तसेंच त्रिस्थळी महाराष्ट्र भवनसंघाचें काशी महाराष्ट्र भवन म्हणून कपिलेश्वर गल्लींत आहे. त्यांच्या चालकांना पत्र लिहिल्यास त्यांच्याकडूनहि योग्य ती व्यवस्था होऊं शकते.

द्वादश ज्योतिर्लिंगें

आपल्या भरतखंडांत श्रीशंकराची बारा ज्योतिर्लिंगें सुप्रसिद्ध आहेत. त्यापैकीं श्रीक्षेत्र काशी येथील श्रीविश्वेश्वर हें एक प्रमुख ज्योतिर्लिंग आहे. या शिवलिंगांचा महिमा महाभारतांत, स्कंदपुराणांत, काशीखंडांतून आणि अलिकडील शिवलीलामृतांत विस्तारपूर्वक वर्णिला आहे. श्रीविश्वेश्वराच्या सान्निध्यामुळेंच काशीक्षेत्रास महात्म्य प्राप्त झालें आहे. यात्रिक मंडळींना योग्य मार्गदर्शन होईल अशी अनुभवपूर्ण माहिती येथें देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.

प्राचीन काळीं शिवभक्तांनीं ज्या ज्या स्थळीं तपश्चर्या करून श्रीशंकराचा साक्षात्कार घेतला त्या त्या स्थळीं ज्योतिर्लिंगांची स्थापना झाली. शिवभक्तांनीं त्या स्थळांना तीर्थक्षेत्रांत गणना केली व शिवपुराणांत हीं तीर्थक्षेत्रें द्वादश ज्योतिर्लिंगें म्हणून मानलीं गेलीं. ह्यांचें सविस्तर वर्णन " द्वादश ज्योतिर्लिंग यात्रा " ह्या स्वतंत्र लेखांत येईलच तरीपण येथेंहि त्रोटक माहिती देत आहों.

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनं ।
उज्जयिन्यां महाकालमोंकार ममलेश्वरम् ॥
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरं ।
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमी तटे ।
हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये ।

(१) **सोमनाथ ज्योतिर्लिंग**—हें स्थान सौराष्ट्रांत असून येथील पुरातन मंदिराचा विध्वंस झाल्यानंतर महाराणी अहिल्याबाईनीं दुसरें मंदिर बांधलें व पहिल्या विध्वंस स्थानावर भारत सरकारनें नवीनच मंदिर बांधलें आहे.

(२) **मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग**—हें स्थान शैल पर्वतावर आहे. हें क्षेत्र दक्षिणेंतील कैलास म्हणून मानलें जाते. शिवरात्रीस येथें फार मोठी यात्रा भरते.

(३) **महाकाळेश्वर ज्योतिर्लिंग**—मध्यभारतांत उज्जयिनीस हें स्थान क्षिप्रा नदीचे कांठावर आहे.

(४) **ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग**—खांडवा–इंदूर रस्त्यावर नर्मदा नदीच्या तिरावर हें स्थान आहे. मंदिर ब्रह्मपुरींत आहे.

(५) **वैजनाथ ज्योतिर्लिंग**—हैद्राबाद राज्यांत परळी ह्या गांवीं हें स्थान आहे. ह्यांस परळी–वैजनाथ असें म्हणतात.

(६) **भीमाशंकर ज्योतिर्लिंग**—पुणें येथून अंदाजें ७९ मैलावर ३४९० फूट उंचीच्या पहाडावरून भीमानदी उगम पावते, तेथें हें स्थान अत्यंत रमणीय असें आहे.

(७) **रामेश्वर ज्योतिर्लिंग**—दक्षिण भारतांत अगदीं समुद्राच्या काठीं हें स्थान आहे. यांस सेतुबंध रामेश्वर असेंहि म्हणतात.

(८) **नागेश्वर ज्योतिर्लिंग**—हैद्राबाद राज्यांत औंढा नामक गांवीं हें स्थान आहे. यांस औंढा नागनाथ असें म्हणतात.

(९) **विश्वनाथ ज्योतिर्लिंग**—श्रीक्षेत्र काशी येथें गंगेच्या काठीं हें स्थान आहे. यांस काशी-विश्वेश्वर असें म्हणतात.

(१०) **त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग**—नाशिकपासून १८ मैलावर गोदावरी नदीच्या उगमाजवळ हें स्थान आहे.

(११) **केदारेश्वर ज्योतिर्लिंग**––हें हिमालयांत आहे. केदारेश्वराचें मंदिर ११९८० फूट उंचावर आहे. येथूनच मंदाकिनी नदी उगम पावते. यांस बदरिकेदार असें म्हणतात.

(१२) **घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग**––हैद्राबाद राज्यांतील दौलताबाद गांवापासून १२ मैलावर वेरूळ नांवाचें गांव आहे. येथें हें मंदिर आहे.

काशीक्षेत्रीं मिळणाऱ्या वस्तु

श्रीकाशी क्षेत्र हें रेशमी व जरी कापडांविषयीं पुरातन कालापासून प्रसिध्द आहे. तेथें कद, पितांबर, पैठण्या, बनारसी खण, इत्यादि रेशमी वस्त्रें मिळतात. शिवाय रुद्राक्ष, स्फाटिक, नानाप्रकारचीं शिवलिंगें व इतर देवतांच्या मूर्ति मिळतात. नारळाचे पोहे व उंसाच्या गंड्यांचा मुरंबा हे कोठेंहि न मिळणारे पदार्थ येथें मिळतात. काशीस कांहीं महाराष्ट्रीय मंडळींची रेशमी व भरजरी कापडाचीं दुकानें आहेत. त्यांत प्रमुखतः दामले कंपनी, सोहोनी कं, यांचीं दुकानें ब्रह्मघाट विभागांत आहेत. सुगंधी अत्तरें, सोन्या चांदीचे दागिने, हिरे माणकें, पितळेचीं भांडीं, लाकडी खेळणी याविषयीं या क्षेत्राची प्रसिध्दी आहे.

काशीहून निघतांना

प्रयाग, काशी, गया या तीन क्षेत्रांची यात्रा म्हणजेच "त्रिस्थळी याला" हें नांव सार्थ आहे, तरी पण या त्रिस्थळी यात्रेसच "काशी यात्रा" या नांवानें संबोधतात. द्वादश ज्योतिर्लिंग स्तोत्रांत श्रीमज्जदगुरू शंकराचार्यांनीं श्रीक्षेत्र काशीस "आनंदवन" नांव दिलें आहे. महानुभावी ग्रंथांत तर या क्षेत्रास 'ऋध्दिपूर' हें नांव दिलेलें आढळतें, तरी पण अनादिकालापासून 'काशी' हें नांव प्रचलित आहे. प्रयाग क्षेत्र सोडतांना तेथील उपाध्ये प्रयागचा प्रसाद म्हणून तांदूळ, नारळ व शुद्ध गंगेनें भरलेलें छोटेसें लोटीसारखें भांडें देतात. त्याचप्रमाणें काशीक्षेत्राहून निघतांना श्रीकाशी विश्वेश्वराचा अंगारा व चीताभस्म, काळभैरवाचा गंडा, तांदूळ, खारका, साखरफुटाणें, अन्नपूर्णा देवीची मूर्ति इ. देतात. आपणहि आपल्या आप्तस्वकीयांना काशीयात्रेचा प्रसाद म्हणून जरूरीप्रमाणें प्रयाग येथील गंगेच्या लोट्या, काशीची मिठाई, साखरफुटाणें, अंगारा, गळ्यांतील व हातांतील गंडे, अन्नपूर्णा देवीच्या मूर्ती, स्त्रियाकरितां कुंकू, बांगड्या व चोळीचे खण, इ. प्रसाद म्हणून जिनसा घ्याव्यात.

श्रीक्षेत्र गया

पंचक्रोशं गयाक्षेत्रं क्रोशमेकं गया शिरः ।
यत्र यत्र स्मरेन्नित्यं पितृणां दत्तमक्षयं ॥
मगधेषु गया पुण्या नदी पुण्या पुनःपुना ।
च्यवनस्थाश्रमः पुण्यः पुण्यं राजगृहं स्मृतं ॥

अर्थ—गया हें क्षेत्र पांच कोस असून त्यांत एक कोस गयाशिर आहे. पितृऋणांतून जीव मुक्त होण्यासाठीं गयाशिरावर श्राद्ध करावें—गयाशिर म्हणजेच हल्लींची श्राद्धभूमि आहे–मगध देशांत गया पुण्यभूमि असून पुनःपुना नदी ही विशेष पुण्यदायक आहे. त्या नदीच्या कांठीं असलेला च्यवन भार्गवाचा आश्रम असून राजगृह म्हणजे जरासंधाची राजधानी हीं पुण्यकारक स्थानें आहेत.

भौगोलिक वर्णन

गया हें त्रिस्थळी यात्रेंतील शेवटचें स्थळ. हें बिहार प्रांतांत आहे. हें ठिकाण काशीच्या थेट पूर्वेस काशीपासून सुमारें १२५ मैल आहे.

आमचे माहितीप्रमाणें गयेला श्री. रामचंद्र कृष्णराव पेंढरकर यांच्याकडे उत्तम व्यवस्था होते. त्यांना आगाऊ पत्र लिहिलें म्हणजे ते स्टेशनवरून उतरवून घेऊन व पुढील सर्व विधी वगैरेची सोय करतात. त्यांच्याकडे जागा उत्तम व मोठीं असून पाणी, वीज वगैरेच्या सर्व आधुनिक सोयींनीं युक्त आहे. त्यांचा पत्ताः—श्री. राजाराम निवास, घ. नं. ८१, देवघाट, गया. (बिहार).

तिसऱ्या वर्गाचें भाडें अंदाजें ३॥ रुपये पडते. हा सर्व भाग सपाट व सफेत आहे. या भागांत माडाच्या व सिंदीच्या झाडांच्या राईच राई लागतात. या सर्व भागाला दक्षिणोत्तर असा उतार आहे. त्यामुळें गंगेला मिळणाऱ्या सर्व नद्या उत्तरवाहिन्या आहेत. यांपैकीं शोण नदी वास्तविक नर्मदेप्रमाणें अमरकंटक पर्वतामधून निघालेली ही नदी सिंधुसागराला मिळावयाला पाहिजे, पण ती पूर्ववाहिनी होऊन गंगेला मिळते. शोण नदीचें पात्र पांढऱ्या शुभ्र वाळूनीं भरलेलें आहे. असा देखावा पहात पहात आपण गयेला पोहोंचतों. येथें गयेचे दोन भाग आहेत. येथून ७ मैलांवर बुद्ध लोकाचें क्षेत्र आहे त्याला 'बुद्धगया' म्हणतात.

गंगा–यमुना कांठचा सर्वच सखल प्रदेश एका काळीं समुद्र होता असें म्हणतात. त्याचें प्रमाण म्हणजे सर्व नद्यांची पात्रें समुद्राच्या वाळवंटा-प्रमाणें असून नारळाचीं वगैरे झाडें येथें दिसतात. याचें प्रत्यंतर म्हणजे फल्गु नदी. हिला पाणी नाहींच. सर्व नदी वालुकामय समुद्र किनाराच भासतो. येथें अळवांचीं शेतेंच्या शेतें दिसतात.

गया शहराचें वर्णन

गया स्टेशन ईस्टर्न रेल्वेवरील मोठ्या लाईनवर असून हें जंक्शन आहे. मोंगलसराई, पाटणा, किऊल, असनसोल, गोमा आदी ठिकाणीं येथून फाटे गेले आहेत. गया स्टेशन शहराचे मध्यवर्ती ठिकाणीं आहे. येथें धर्मशाळाहि आहेत. कांहीं स्टेशनसमोर आहेत. चहूंबाजूंनीं हें शहर डोंगरांनीं वेढल्यामुळें खोल जागीं आहे असें वाटतें. हें शहर दक्षिणेकडे उंच असून उत्तरेकडे याचा उतार आहे. काशीप्रमाणेंच येथेंहि गल्ल्या फरसबंदी व लहान असल्यानें वाहनें गांवांत जात नाहींत. या प्रांतांत ऊस फार होत असल्यानें साखर कारखाने फार आहेत.

या क्षेत्रींहि गयावळांचा त्रास चुकविण्यासाठीं काशीहूनच आपल्या ठरलेल्या उपाध्यामार्फत सोय करून घ्यावी. स्टेशनवर सायकल–रिक्शा, टांगे, टॅक्सी वगैरे वाहनें असतात. रिक्शा सोयीस्कर. अंदाजी आठ आणे भाडें पडतें. इतर वाहनें चांदचौरा स्टँडवरच थांबतात, तेथून हमाल करावा लागतो.

गया हें जिल्ह्याचें ठिकाण असून वस्ती अंदाजें १॥ लाख आहे. या शहराचे दोन भाग आहेत. एक विष्णुगया व दुसरा साहेबगंज. पहिल्या भागांत क्षेत्राचा भाग येतो व दुसऱ्या भागांत कचेऱ्या, कोर्टें, शाळा वगैरे आहेत. हा भाग आधुनिक पद्धतीचा आहे. साहेबगंजला लागून एक टेकडी आहे. तिच्या पायथ्याशीं गयावळांची व भिक्षुकांची वस्ती आहे. स्टेशनला लागूनच सार्वजनिक इमारती आहेत. इकडील सर्व इमारतींची बांधणी मुसलमानी धाटणीची आहे. टेकडीवर मोठमोठे वाडे आहेत. हे सर्व गयावळांचे आहेत. यावरून त्यांची श्रीमंती दिसून येते.

प्राचीन माहिती

गया क्षेत्र हल्लीं ज्या ठिकाणीं आहे त्या प्रदेशाला प्राचीन काळीं 'मगध' देश म्हणत. कृष्णाच्या वेळचा प्रसिद्ध जरासंध हा या मगधाचा राजा. याची राजधानी 'राजगृह' या नांवानें प्रसिद्ध आहे. ही राजधानी सध्यांच्या गयेपासून पंचवीस कोसांवर आहे. गया क्षेत्रीं फल्गु नदीच्या कांठीं श्रीविष्णुपदीं पिंडदान केल्यानें पितृसंबंधीं ऋणांतून जीव मुक्त होतो; अशी फार प्राचीन कालापासून समजूत असल्यानें याला 'विष्णुगया' किंवा 'पितृगया' म्हणतात. पूर्वीं गयाक्षेत्र पांच कोस होतें व त्यांत एक कोस गयाशिर आहे. या गयाशिर भागांतच श्राद्धविधी करण्याचा प्रघात आहे.

अशा या देशांत गया, पुनःपुना नदी, फल्गु नदी, च्यवन भार्गवाचा आश्रम व राजगृह हीं पुण्यकारक मानलीं आहेत. पुनःपुना व फल्गु या नद्यांना कांठच्या भिन्न भिन्न स्थानांना गयागया, ब्रह्मगया, विष्णुगया, रुद्रगया, काशीविश्वेश्वरगया अशीं नांवें आहेत. गयागंज, गयादित्य, गायत्री, गदाधर, गया, गयाशिर अशीं येथील सहा स्थानें मोक्षदायक आहेत.

रामशिला, प्रेतशिला, ब्रह्मयोनी आदि पर्वतांच्या मध्यें हें क्षेत्र आहे. सर्व पर्वतांवर मंदिरें आहेत. महाराणी अहिल्यादेवी होळकर हिनें गयेमध्यें मंदिरें बांधणें व दानधर्म करणें यांत १६ लाख रुपयांचेवर पैसा खर्च केला आहे.

क्षेत्र महात्म्य

गयेला श्राद्धाचें महत्त्व फार आहे. मेष, कन्या, धन, कुंभ, मकर व मीन राशींतील सूर्यग्रहण, सोमवती अमावस्या व चंद्रग्रहण या दिवशींच्या पिंडदानाला फार महत्त्व आहे. गयासूर असुरानें येथें घोर तपश्चर्या आरंभून आपल्या दर्शनानें जीवांना मुक्ती मिळावी असा वर मागून घेतला. त्यामुळें यमराज व देव काळजींत पडले. त्यांचें निवारण कसें केलें गेलें त्याची कथा स्वतंत्र दिली आहेच. या सुराचे पाठिवर तो स्थिर रहावा म्हणून जी शीला ठेविली गेली. ती शीला म्हणजे मारीच ऋषि पत्नी होय. पतीसेवेमध्यें कुचराई केल्यामुळें मारिचानीं तिला शाप दिला होता. तेव्हां तिनें या शापापासून मुक्त होण्यासाठीं तप केलें व भगवान विष्णुच्या वरानें मुक्त झाली. ' गयासुराचे पाठिवर तुला ठेवलें म्हणजे तूं मुक्त होशील ' असा वर विष्णूनें दिला. ही शीला गयासुराचे पाठीवर ठेविली असतां प्रभास पर्वतानें तिला ढकलली, तेव्हां सूर्यनारायणानें तिची पुन्हां स्थापना केली म्हणून त्या स्थानाला प्रभास नांव पडलें. त्यामुळें तिचा भंग झाला व त्यांतून एक आंगठा निघाला, म्हणून याला ' प्रतिशीला ' म्हणतात.

ज्या ठिकाणीं रामचंद्रांनीं स्नान केलें त्या स्नानाला ' रामतीर्थ ' म्हणतात. रामचंद्रानंतर भरतानें रामेश्वराची स्थापना केली त्याला 'भरताश्रम' म्हणतात. येथें मतंगपद आहे. याच प्रभास पर्वतावर यमराजाचें वास्तव्य आहे. भरताश्रमाजवळ कुंडपर्वत आहे. येथें रुद्राचें चारी रूपानें वास्तव्य आहे. जवळच अगस्त्य ऋषीनीं उदयगिरी पर्वताची स्थापना केली आहे. या पर्वतावर नैमिषारण्य तीर्थ असून येथें गंधर्वांचें वास्तव्य आहे. जवळच मृतिष्टक कुंड आहे. प्रेतशिलेच्या बाजूलाच यमराजानें भस्मकूट पर्वताची स्थापना केली आहे. येथें वटेश्वर रूपानें ब्रह्मदेवाचें वास्तव्य आहे. जवळच रुक्मीना कुंड असून कपील नदीवर कपिलेश्वर आहे. येथें सोमवती अमावस्येला पिंडदान करतात. जवळच सारस्वत कुंड आहे; येथें शुक्राचार्याचें वास्तव्य आहे. जवळच गृद्धकूट पर्वत आहे. या पर्वतावर गृद्धेश्वर महादेवाचें स्थान आहे. आदिपात पर्वतावर गणेशाची स्थापना आहे. पदांकित कुंडावर महादेवीचें स्थान आहे. याशिवाय येथें च्यवन ऋषींचा

आश्रम, पुनःपुना नदी, शौनक ऋषींचा आश्रम आहे. क्रौंचपदावर स्नान, पिंडतर्पण केल्यानें २१ पिढ्यांचा उद्धार होतो.

दर्शनीय स्थळें

गदाधरं विष्णुपदं अष्टादश पदं रविं ।
वंदे अक्षयवटं फल्गुं लक्ष्मीं गौरीं गयेश्वरीं ॥

गदाधर

श्रीगदाधर (गया)

गदा नांवाच्या असुराच्या हाडापासून विश्वकर्मानें एक गदा बनविली होती. कालांतरानें जेव्हां ब्रह्माच्या कृपेनें होत नांवाचा असूर उत्पन्न झाला. त्यानें घोर तपश्चर्या करून देवांची कृपा संपादन केली. त्यामुळें त्यानें उन्मत्त होऊन इंद्राला जिंकले व धुमाकूळ माजविला. त्याचें निवारण भगवान् विष्णूनें या गदेनें केलें. त्याच्या रक्तानें माखलेली गदा ज्या जलाशयांत धुतली गेली त्या जलाशयाला 'गदालोलक' तीर्थ म्हणतात. आणि हीच गदा घेऊन विष्णु त्या शिलेवर स्थित झाले म्हणून त्याला 'गदाधर' नांव पडलें.

विष्णुपद मंदिर

या मंदिराला जाण्याकरितां मोठी सडक नाहीं. रामसागर नांवाची पायवाट आहे. हें मंदिर फल्गु नदीच्या तीरावर साहेबगंज भागाच्या जवळील टेकडीवर आहे. या मंदिराच्या दक्षिणेस स्मशान घाट म्हणून एक ठिकाण आहे. येथपर्यंतच गाड्या, मोटारी येऊं शकतात. मूळचें मंदिर इतर ठिकाणाप्रमाणें मुसलमानी अमदानींत उध्वस्त झालें. हल्लींचें मंदिर महाराणी अहिल्यादेवी होळकर हिनें १७६६ मध्यें बांधलें. मंदिर प्रचंड

असून पहाण्यालायक आहे. या देवळाचा दगड विशिष्ठ जातीचा असून सबंध देऊळ दगडी आहे. या मंदिरांत विष्णूची मूर्ती नाहीं; तर गाभाऱ्यांत चबुतऱ्यावर विष्णूचें पद आहे. रामेश्वरला गंधमादन पर्वतावरही रामाच्या मंदिरांत रामाची मूर्ती नसून पादुकाच आहेत. या मंदिराच्या पूर्वेस हनुमानाची विशाल मूर्ती आहे व उत्तरेस महाराणी अहिल्यादेवीचा पुतळा आहे.

या मंदिरांत एक चमत्कार आढळतो तो असा. मंदिराच्या सभा-मंडपांत दोन ठिकाणीं वरून थेंब थेंब पाणी सावकाश पडत असतें. खालीं

श्रीविष्णुपद मंदिर, गया

थेंब पडलेला वाजतो व दिसतो पण तो कोठून पडतो हें मात्र दिसत नाहीं. सभा मंडपाच्या छताची जागा जेथें थेंब पडतो तेथें वर कोठेंच ओली झालेली आढळत नाहीं. वैशिष्ठ्य हें कीं हा, फक्त पावसाळ्यांतच पडतो असें नाहीं, बाराही महिने पडत असतो. पडला कीं लगेच वाळून जातो व वाळेपर्यंत दुसरा थेंब पडत नाहीं. खालीं दगडी फरशी असल्यानें तेथें चिखलही नाहीं किंवा ओलही दिसत नाहीं. फक्त त्याचा डाग मात्र दिसतो. थेंब अशा कांहीं खुबीनें पडतो कीं बघत राहिलें तर नजरेला पडत नाहीं. नजर चुकवून पडतो. बरे थेंब कमी जास्तही होत नाहींत; परंतु आपली इच्छा असेल त्या तीर्थाचें नांव घेऊन आपण हात पुढें केला कीं, दोन थेंब हातावर पडतात असें म्हणतात. याला सतत पाण्याचा कोठून पुरवठा होतो समजत नाहीं.

गाभाऱ्यांत मध्यभागीं एक अष्टपैलू कुंड आहे. त्याची कड एक फूट उंचीची असून चांदीच्या पत्र्यांनीं मढविलेली आहे. या कुंडांतल्या शिळेवर सोळा अंगुलें लांब श्री विष्णूचें पदाचिन्ह उत्तरेकडे तोंड करून

उमटलें आहे. गयेंत श्राद्ध करून याच पदावर पिंडदान करावयाचें असतें.

श्रीविष्णुपद, गया

गाभाऱ्यांतील शिळेवरील पद हेंच मुख्य व तें अकृत्रिम आहे. मंदिराबाहेर दुसरी आणखी सतरा खडकांवर पदें आहेत पण तीं कृत्रिम आहेत.

सूर्यकुंड

विष्णूपद मंदिराच्या उत्तर पश्चिम दिशांच्यामध्ये एक मोठा तलाव आहे. या तलावाला चारी बाजूंनीं मोठी भिंत आहे. याच्या दक्षिणस मानस सरोवरमध्यें कनखल, उत्तरेस उरींची कुंड आहे. या कुंडाच्या समोर सूर्यनारायणाची मूर्ति आहे. येथें चैत्र व कार्तिक महिन्यांत षष्ठीला मेळा भरतो.

अक्षय वट

विष्णुपद व ब्रह्मयोनी यांच्यामध्यें अक्षयवट आहे. याच्या पश्चिमेस ऋक्मीणी तलाव आहे. या स्थानीं शेवटीं पिंड देतात. अशी आख्यायिका आहे कीं, हा वृक्ष त्रेतायुगापासून येथें आहे. सीतेनें याला सत्य कथनाबद्दल अक्षय वरदान दिलें म्हणून हा अक्षयवट आला.

फल्गु नदी

ही नदी म्हणजे जवळ जवळ वाळवंटच आहे पाणी फारसें दिसतच नाहीं. ह्या नदीचें वैशिष्ट्य हें कीं, नदीचा प्रवाह वाळू खालून वाहतो. वाळू थोडीशी बाजूस करून खड्डा केला कीं, त्यांत पाणी येतें. या नदींत मुंडनविधि करून श्राद्ध केलें म्हणजे पितर स्वर्गाला जातात, अशी समजूत असल्यामुळें तेथें तो विधि करतात.

मंगलागौरी

अक्षयवटाचे पूर्वेस आदिमाया मंगलागौरीचें मंदिर आहे. १२५ पायऱ्या चढून गेल्यावर देवीचें मंदिर लागतें. या मंदिराचे उत्तरेस जनार्दन भगवानचें मंदिर आहे.

ब्रह्मयोनी

विष्णुपद मंदिरापासून एक मैल हे स्थान पर्वतावर आहे. इंदूरच्या महाराजांनीं चढण्याकरितां ४२४ पायऱ्या बांधल्या आहेत. पर्वतावर मातृयोनि नांवाच्या दोन गुहा आहेत. आख्यायिका अशी आहे कीं, या गुहांमधून आरपार फक्त पुण्यवान मनुष्यच होऊं शकतो. पापी मनुष्य आरपार होऊं शकत नाहीं. गया क्षेत्रांत बुद्धधर्माचाहि प्राचीन काळीं फार प्रसार होता. त्या वेळीं सम्राट अशोकानें बुद्धाचें स्मारक म्हणून या पर्वतावर एक प्रचंड स्तूप उभारला होता, परंतु आज त्याचे अवशेषहि नाहींत.

रामशीला

दुःखहरिणी देवीच्या उत्तरेस असलेल्या रेल्वे पुलाखालून रामशीलेला रस्ता जातो. अंदाजें २ मैलभर अंतर, ३९७ पायऱ्या आहेत. रामशीला पर्वताची उंची ३७२ फूट आहे. या पर्वतावर चढण्याकरितां रेल्वे पूल संपताच काकवतीदेवीचें मंदिर लागतें. विष्णुपदापासून हें तीन मैल आहे. या पर्वतावर पातालेश्वर, राम–लक्ष्मण यांचीं मंदिरें आहेत.

प्रेतशीला

रामशीलापासून पश्चिमेकडे ६ मैलांवर हें स्थान आहे. पर्वताच्या पायथ्याशीं ब्रह्मकुंड तलाव आहे. येथें पिंड प्रथम देऊन नंतर रामशीलेवर पिंडदान करावयाचें. अपघातानें ज्या आप्तांचा मृत्यु झाला असेल त्यांचे नांवे पिंड येथें देतात. येथें धर्मशाळाहि आहे. पर्वतावर चढण्याकरितां ४०० पायऱ्या आहेत.

उत्तर मानस

शहराच्या साहेबगंज भागाजवळच उत्तरमानस आहे. सूर्यकुंडाच्या दक्षिणेस कृष्ण द्वारकेवरून ब्रह्मतलावावर रस्ता जातो. उत्तरेस उत्तर मानसच्या पुढें रामशिला पर्वताकडे रस्ता गेला आहे. सूर्यकुंडापासून हें स्थान एक मैल आहे.

सीताकुंड रामगया

विष्णुपद मंदिराच्या समोर फल्गु नदी आहे. तिच्या पैलतीरावर एक मंदिर आहे, त्यांत श्रीरामचंद्राच्या वाडिलांचा—दशरथाचा—हात आहे. हा काळ्या पाषाणाचा आहे. सीतेनें येथें पिंडदान केलें होतें.

कलेश्वरी देवी

गया जिल्ह्याच्या सीमेवर कौलेश्वरी पर्वत आहे. या पर्वतावर या देवीचें मंदिर आहे. याच स्थलीं फार प्राचीन कालीं प्रसिद्ध विराट नगरी होती. या नगरीच्या किल्ल्याचे तटाचे कांहीं अवशेष आजहि दिसतात. याच जागेवर विराट नृपति व कौरव यांच्यामध्यें युद्ध झालें होतें. याच भागांत पांडवांनीं आपला अज्ञातवासाचा काल घालविला होता. पर्वतावर अर्जुनानें बाण मारून पाणी निर्माण केलें, त्या स्थानावर कुंड आहे.

आणखी कांहीं पवित्र स्थानें

मुण्डपृष्ठा, प्रभात पर्वत, रामतीर्थ, भरताश्रम, मतंगपद, कुंडपर्वत, उद्यन्त व उदयगिरी पर्वत, नैमिषारण्य तीर्थ, मृतिष्टक कुंड, भस्मकूट पर्वत,



गदाधर घाट, गया

ऋक्मीना कुंड, कपील नदी, कापिलेश्वर, सारस्वत कुंड, गृद्धकूट पर्वत, गृद्धेश्वर महादेव, आदिपाल पर्वत, पंदाकित कुंड, महादेवी, च्यवनाश्रम, पुनपुन नदी, वैकुंठ लोक, दंड गृद्धकूट, शौनकाश्रम, क्रौंचपद, गदालोल

तीर्थ, उदीच्य तीर्थ, कनखल तीर्थ, दक्षिण मानस, मैनाक अलगतीर्थ, धर्माण्य तीर्थ, मतंग तीर्थ, बटेश्वर, गयाशीर, विष्णुपदादि एकवीस पदें, सावित्री तीर्थ, सरस्वती तीर्थ, यमद्वारावर वैतरणी नदी, बुद्धवट वृक्ष, ब्रह्म सरोवर, जिव्हालोल, गदाधर घाट, दुःखहानी देवी, ब्रह्मयोनी वगैरे.

आसमंतांतील कांहीं दर्शनीय स्थळें

अनेक दर्शनीय स्थळें आहेत. कांहीं येथेंच आहेत तर कांहीं फार दूर आहेत. बुद्धगया येथून सात मैलांवर आहे. याची हकीगत स्वतंत्र पुढें दिली आहे. ब्रह्मयोनी, रुद्रयोनी पर्वत १॥ मैल ४४० पायऱ्या. रामशीला ४ मैल ६०० पायऱ्या. प्रेतशीला ७ मैल ६०० पायऱ्या. वाघेश्वरी ३॥ मैल. सीताकुंड, दशरथाचा हात, रामगया पहाड नदीच्या पलीकडे, पीता महेश्वर महादेव १ मैल. प्रपिता महेश्वर १ मैल, वृद्ध प्रपिता महेश्वर विष्णुपद मंदिरांत. श्रीदत्तात्रेय, गणपती, सत्यनारायण, राम, गायत्री, शंकराचार्य इत्यादि देवतांचीं मंदिरें विष्णुपदाच्या मार्गावर आहेत.

राजगृह (जरासंधाची राजधानी) मोटारनें ३६ मैल व रेल्वेनें ४८ मैल. येथें गरम पाण्याचीं कुंडें आहेत. प्राचीन किल्ला पडक्या अवस्थेंत आहे. भीम-जरासंध यांची कुस्ती झाली तो आखाडा वगैरे स्थळें येथें आहेत. नालंदा विश्वविद्यालय येथून १५ मैलांवर आहे.

बाणासूर राक्षसानें स्थापन केलेला महादेव (बडाबडनाथ) मोटारनें २० मैल रेल्वेनें १४ मैल आहे. पायवाटेनें गेल्यास जवळ आहे. फक्त ६ मैल चालावें लागतें. त्यानंतर डोंगर चढावा लागतो. द्वापार युगांतलें सूर्य-मंदिर देव नांवानें प्रसिद्ध आहे. हें मोटारनें ५२ मैलांवर आहे. गयासुरानें तपश्चर्या केली तो कोलाहल पर्वत मोटारनें ४० मैलांवर आहे. पुढें पायीं डोंगर चढावा लागतो. द्वापार युगांत संढा मर्कट मुनींनीं स्थापन केलेला संढेश्वरनाथ महादेव रेल्वेनें २५ मैल असून पुढें पायवाट ६ मैल आहे.

गयाशिराची कथा

असुर म्हटलें कीं, दुर्गुणाचा अवतार ही सर्वसाधारण कल्पना. परंतु असुरामध्येंसुद्धां याला एक अपवाद होता. तो म्हणजे गयासुराचा.

हा शंकराचा मोठा भक्त. फल्गु नदीच्या तीरावर एक आश्रम बांधून तेथें तो तप करीत असे. 'ॐ नमः शिवाय' मंत्रानें तो शिवाची आराधना करीत असे. त्याचें तपःसामर्थ्य इतकें वाढलें कीं, अखेर शंकराला त्याला दर्शन देणें भाग पडलें. ज्याच्या दर्शनाची आस धरून आज कित्येक वर्षें देहाचें काष्ठ केलें तो शिवपरमेश्वर एकदाचा भेटला म्हणून त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. शिवानें त्याच्या मस्तकावर हात ठेवून म्हटलें, 'गयासुरा, इच्छा असेल तें मागून घे.' शंकराला वाटलें कीं तो मोठें साम्राज्य, पंचमहाभूतावर अधिकार, सप्तस्वर्गाची सत्ता अशांपैकीं कांहीं मागेल म्हणून. पण त्यानें मागितलें अगदीं वेगळेंच.

"देवा, मला स्वतःला कांहीं एक नको. मला फक्त एकच चिंता लागली आहे आणि ती या प्राकृत जनांची. यांचा उद्धार कसा होईल? कोण त्यांना जन्म-मरणाच्या यातनेंतून सोडवील? त्यांचेसाठीं माझा जीव तुटतो आहे. म्हणून देवा, मला अशी शक्ति दे, कीं जो कोणी मोक्षाच्या इच्छेनें मजकडे येईल त्याचा नुसत्या माझ्या दृष्टीनेंच उद्धार व्हावा!" शिवाला त्याचें कौतुक वाटलें आणि त्यानें 'तथास्तु' म्हटलें. ही वार्ता सगळीकडे पसरली. त्रिविध तापानें पोळणारीं माणसें त्याच्याकडे येऊं लागलीं. आणि केवळ त्याच्या दृष्टीनेंच त्यांचीं पापें भस्मसात होऊं लागलीं; व मृत्युनंतर ते सर्व वैकुंठवासी होऊं लागले.

याचा परिणाम असा झाला कीं, यमलोक ओस पडूं लागला. यम चिंतेंत पडला. काय करावें हें त्याला सुचेना, म्हणून तो ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवाहि त्याच विवंचनेंत होता. कारण त्याच्याहि सृष्टि उत्पत्तीच्या कार्यांत यामुळें विघ्न उत्पन्न झालें होतें. सर्व प्राणिमात्र याप्रमाणें जर मुक्त होऊं लागले तर पुनर्जन्म तरी द्यायचा कोणाला? ब्रह्मदेव म्हणाला, 'यमा, गयासुरावर माझा कांहीं इलाज चालण्यासारखा नाहीं. आपण भगवान विष्णूकडे जाऊं या.' असें म्हणून ते दोघे विष्णूकडे आले व म्हणाले, वैकूंठपते, पृथ्वीवर फार अनर्थ माजला आहे गयासूर मोक्षदानाचें सदावर्त उघडून बसला आहे. त्याच्या नुसत्या दृष्टीक्षेपानें मोक्ष मिळूं लागल्यानें मानवांनीं वेदाध्ययन बंद केलें. व्रतं, दानं, उद्यापनं टाकून दिलीं. कर्मकांड बंद झाल्यामुळें देवांना हविर्भाग मिळेनासा झाला. तेव्हां काय करावें?

"त्यावर श्रीविष्णु म्हणाले, त्याला महादेवाचा वर आहे. तेव्हां उघड कांहींच करतां येणार नाहीं. युक्तीनंच त्याला जिंकलं पाहिजे. चला आपण पृथ्वीतलावर जाऊन त्याची गांठ घेऊं."

विष्णु आणि ब्रह्मदेव ब्राह्मणांचीं रूपें घेऊन पृथ्वीवर आले. वाटेंत त्यांच्या कानावर 'केवळ लोकांच्या उद्धारासाठीं झटणारा असा दयाळू महात्मा चालू युगांत झाला नाहीं' अशा तऱ्हेचे त्याच्या स्तुतीचे पडसाद येऊं लागले. अखेर ते गयासुरापाशीं पोचले. गयासुरानें त्याचें उत्तम आदरातिथ्य करून 'काय अपेक्षा आहे? आज्ञा व्हावी' म्हणून हात जोडले 'तुझ्या या विशाल क्षेत्रामध्यें आम्हांला यज्ञ करावयाचा आहे' तरी एखादी 'शुद्ध भूमि' यज्ञासाठीं हवी आहे.' गयासूर 'ठीक आहे.' म्हणाला. त्यानें त्या दोघांना बरोबर घेऊन सर्व क्षेत्रभर हिंडविलें. जी जी भूमि गयासूर त्यांना दाखवी त्या त्या भूमीमध्यें ते कांहींना कांहीं दोष काढीत. निर्दोष अशी भूमि सांपडेचना. शेवटीं गयासुरानें 'माझा निरूपाय आहे. असें म्हणून हात जोडले. श्रीविष्णु म्हणाले, 'गयासुरा, असं कां बोलतोस? तुझं एवढं पुण्यपावन शरीर आहे ना? मग तींच शुद्ध भूमि. तुझ्या पाठीवर आम्हांस यज्ञ करण्यास परवानगी दे.' यावर गयासुर डगमगला नाहीं, भ्याला नाहीं अगर विवंचनेंत पडला नाहीं, उलट त्यानें तत्काल उत्तर दिलें. 'खरंच, मी विसरलोंच. फार छान कल्पना. बरं सुचवलंत, नाहींतर माझं सत्व गेलं असतं. मी पालथा निजतो. माझ्या पाठीवर स्थंडिल घाला व खुशाल आपला यज्ञ सिद्धीस न्या!!'

गयासुराच्या पाठीवर यज्ञ सुरूं झाला. अग्नि खूप प्रज्वलित झाला. शरीरभर आगजाळ भिनली. पण त्या महाभागाची सहनशक्ति त्याहून मोठी. त्यानें जरासुद्धां चुळबूळ केली नाहीं. अशा तऱ्हेनें एक दोन दिवस नव्हे तर तब्बल ९ महीने पूर्ण यज्ञ चालला. पूर्णाहुतीची वेळ आली. तेव्हां गयासुरानें सांगितलें, 'देवहो, माझ्या जड शरिराचा यज्ञासाठीं उपयोग झाला. त्याचें सार्थक झालें. आतां माझ्या पंचप्राणाची पूर्णाहुति अग्नीला समर्पण करा.' सर्वांच्या तोंडून उद्गार निघाले, 'धन्य गयासुर, धन्य महात्मा, शतवार धन्य!'

यम पुढें झाला त्यानें एक मोठी शिळा गयासुराचे शिरावर ठेवली. त्या शिळेवर श्रीविष्णूनें आपला पाय ठेवला. गयासुराचें प्राणोत्क्रमण होण्यापूर्वी श्रीविष्णूनें त्याला वरदान दिलें. " आजपासून हें क्षेत्र 'गयाक्षेत्र' या नांवानें प्रसिद्ध होईल. गयागदाधर या नांवानें मी या क्षेत्रीं कायमचा वास करीन. या शिळेवर माझें जेथें पाऊल उमटलें आहे तिथें जे पिंडदान करतील त्यांच्या पितरांचा उद्धार होऊन ते वैकुंठावासी होतील. "

या कथेचा चिकित्सक बुद्धीनें अर्थ लावावयाचा तर असें वाटतें कीं, या भागांत बुद्ध धर्माचा फार प्रसार होऊन वैदिक धर्म नष्ट होण्याचे पंथास लागला. परंतु नंतर शंकराचार्यांनीं या धर्माची येथून हकालपट्टी केली व पुन्हां वैदिक धर्माची स्थापना होऊन सर्व देवदेवतांचीं मंदिरें वगैरे झालीं. म्हणून गया ते बुद्धगया हा १० मैलांचा भाग पवित्र समजण्यांत आला, सर्व देवतांची वसती येथें केली गेली, व याला क्षेत्र म्हणून समजण्यांत आलें. बौद्धधर्माचा पाडाव व वैदिक धर्माचें वर्चस्व या गोष्टीचें वरील कथा-रुपक असावें.

यात्रा विधि

प्रथम घरीं मुंडन करून घरीं पिंडदान विधि करून घराला प्रदक्षिणा घालून ब्रह्मचर्यव्रतानें गया क्षेत्रीं जावें. तेथें जातांच पूर्व बाजूच्या नदीमध्यें स्नान, तर्पण, श्राद्ध, नंतर प्रेत पर्वतावर तिलयुक्त पिंडदान विधी. दुसऱ्या दिवशीं उत्तर मानसरोवर स्नान करून भगवानाची पूजा. तेथून मौनव्रतानें दक्षिण मानसरोवर जाणें. तेथें तीन्ही तीर्थावर स्नानादि पिंडदान विधी. फल्गु तीर्थावर विधी. नंतर गदाधराची पूजा वगैरे. दुसऱ्या दिवशीं धर्मारण्य तीर्थांत स्नान, मतंग तीर्थावर पिंडदान. तिसऱ्या दिवशीं गयाशिरावर पितरांचें श्राद्ध व कूपावर पिंडदान, ब्रह्माची पूजा, आम्रवृक्षाची पूजा, वृक्षाजवळ असलेला यमवली व वैवश्वत कुलोत्पन्न दोन कुत्रे याना बलीदान, चौथ्या दिवशीं फल्गु तीर्थावर स्नान, गयाशिरावर पिंडदान, गदाधर दर्शन व श्राद्ध, विष्णुपद, रुद्रपद, ब्रह्मपद, थावास्थ्यपद, शुक्तपद, नारदपद, अगस्तिपद, क्रौंचपद, मतंगपद, सूर्यपद, कार्तिकपद, गणेशपद, कश्यपद आदि तेरा पदांवर पिंडदान. पांचव्या दिवशीं गदालोलवर स्नान पिंडदानादि

विधी, अक्षय्यवटावर अक्षयवट पूजा व ब्राह्मण भोजन याप्रमाणें पांच दिवसांचा विधी वायु पुराणांत सांगितला आहे.

याशिवाय पहिला विधी म्हणजे मोठी गया ९९ श्राद्धें. याला १७ दिवस लागतात व खर्च अंदाजें २९० रु. येतो. दुसरा विधी म्हणजे ३५ श्राद्धें ९ दिवस खर्च रु. १७९. तिसरा विधी म्हणजे तीन श्राद्धें पहिलें फल्गु श्राद्ध, दुसरें विष्णुपदावर पिंडदान व तिसरें अक्षयवट श्राद्ध. २ दिवस खर्च ९१ रुपये, चौथा विधी विष्णुपदावर पिंडदान १ दिवस खर्च ३९ रु. वरील सर्व श्राद्धांचे वेळीं तुळशी अर्चन, अभिषेक, पवमान, दानें, ब्राह्मण भोजन, उपाध्या संभावना वगैरे करणेचें असतें. गयेला फार पूर्वीं श्राद्ध स्थानांची संख्या ३६० होतीं, परंतु आतां त्यांतील बरीच लुप्त झालीं. आतां फक्त ४५ राहिलीं आहेत.

श्राद्धविधी

कुरुक्षेत्रं गयां गंगां प्रभासं पुष्करं तथा ।
अेतानि पुण्यतीर्थानि श्राद्धकाले सदा पठेत् ॥

गया क्षेत्रीं मुख्य विधी श्राद्ध व पिंडदानाचा आहे व हा श्राद्धविधी 'गयाशिर' या भागांतच करण्याचा प्रघात आहे. गयाशिर हें नांव कसें पडलें व याच भागांत श्राद्धविधी कां करावयाचा यासंबंधींची प्राचीन कथा मागें आलेली आहे, श्राद्धविधीचे वेळीं वरील श्लोकांतील श्राद्धस्थानांचें स्मरण करावें. या सर्व स्थानांत श्राद्धविधीचे दृष्टीनें गया क्षेत्रालाच अधिक महत्त्व आहे.

मुख्य विष्णुपद देवळांत गाभाऱ्यांत आहे. याशिवाय अठरा विष्णुपदें आहेत. या प्रत्येक ठिकाणीं स्वतंत्र श्राद्धें करावयाचीं असतात. पिंडदान करावें लागतें. गयेस श्राद्ध व पिंडदान केलें म्हणजे इतर क्षेत्रीं पिंडदान करावें लागत नाहीं. श्राद्ध करणेंच असल्यास ब्रह्मार्पण विधीनें करावें. विष्णुपदीं पिंड अर्पण करतात, पण बदरीनारायणास ब्रह्मकपाटीं पिंडदान केल्यानेंच पूर्णता होते. गयेला लिंबाएवढें व ब्रह्मकपाटीं बोराएवढें पिंड करावे. मोठाले करूं नयेत.

श्राद्ध म्हणजे स्मरण—आपल्या पूर्वजांनीं, वाडवडिलांनीं आपल्या कल्याणासाठीं ज्या ज्या गोष्टी केल्या, त्याग केला त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याचें हें एक साधन आहे. म्हणून श्राध्द करून त्यांचें स्मरण करणें, याप्रमाणेंच आपल्या जातींतील, समाजांतील, धर्मांतील, राष्ट्रांतील ज्या थोर व्यक्तीनीं पराक्रम केले व राष्ट्र, धर्म, समाज हितास्तव जें बलीदान केलें त्यांचेंहि पुण्यस्मरण करावें. याच कारणास्तव श्राध्द स्थानांचे यादींत कुरुक्षेत्र व प्रभास या स्थानांचा समावेश करण्यांत आला आहे. कुरुक्षेत्रावर भारतीय युध्दाचे वेळीं सर्व भारतांतील आर्यांचे पितरांचे बलीदान झालें आहे; तर प्रभास क्षेत्रीं सर्व यादवांचें बलीदान झालें आहे. म्हणून या सर्वांचें स्मरण करून त्यांना साक्ष ठेवून ' आपण पूर्वजांसारखे होऊं, त्यांचें नांव घालविणार नाहीं, त्यांचेसारखे धर्माभिमानी, राष्ट्राभिमानी होऊं ' वगैरे हेतु मनांत धरणें व त्याप्रमाणें वागण्याचा सतत प्रयत्न करणें म्हणजेच श्राध्द. देवा ब्राह्मणांसमक्ष शास्त्रोक्त विधी करून ही प्रतिज्ञा करावयाची असते. याचाच अर्थ पितराचे गुण अंगीं बाणविणें, त्यांनीं आरंभिलेलीं कार्यें तडीस नेणें. यानेंच पितर खरे मुक्त होतात. निव्वळ यांत्रिक पध्दतीनें तंत्राचा अवलंब करून कर्मकांड करणें व ब्राह्मण भोजन, दक्षिणा देणें हें खरें श्राध्द नव्हे. ब्राह्मण भोजन, दक्षिणा विद्वान ब्राह्मणांचा योगक्षेम चालविण्यासाठीं आहे. म्हणजेच वेदविद्या, ब्रह्मज्ञान यांचें रक्षण करण्यासाठींच आहे. आपल्या पूर्वजांचें अविरत स्मरण रहाण्याकरितां व त्याप्रमाणें कृतीनें वागण्याकरितां या श्राध्द कल्पनेची केवढी उदात्त व अत्युत्तम योजना आपल्या पूर्वजांनीं करून ठेवली आहे. ती सतत पिढान् पिढ्या चालू रहाण्यासाठींच तिची धर्मांत योजना केली आहे. त्यामुळेंच ती आजतागायत परंपरेनें हजारों वर्षें चालूं आहे. वाईट इतकेंच वाटतें कीं, यांतील मूळ उच्च हेतु विसरला जात चालला असून तंत्रालाच महत्त्व येत चाललें आहे. तरी श्राध्द करणारांनीं किंवा धार्मिक कोणतेहि विधी करणारांनीं त्यांतील मूळ हेतु जाणून घेऊनच श्रध्देनें हे विधी करावेत. नुसत्या पोपटपंचीला किंवा नाटकी हावभावांना महत्त्व देऊं नये.

श्राद्ध प्रारंभ—श्राध्दाला आरंभ ' पुनरावृत्तिरहितं अक्षय्य विष्णु लोक प्राप्त्यर्थं आत्मनासह (येथें पितर, पूर्वजादिंचीं नामें स्मरणें) उध्दारार्थं

पितश्राध्दं करिष्ये' अशा संकल्पानें करावा. गयार्जन केल्यानें कर्त्याच्या मागच्या अकरा व पुढच्या अकरा पिढ्यांचा त्याच्यासह उध्दार होतो. येथें श्राध्दें बरींच करावीं लागत असलीं तरी त्यांत तीनच मुख्य आहेत. एक फल्गु नदीवर, दुसरें विष्णुपदीं व तिसरें अक्षय्यवटावर. अक्षय्य वटावरच गयार्जन होतें. याप्रमाणें श्राध्द व गयार्जन केल्यावर येथें आपल्या आवडीच्या वस्तूचा म्हणजेच वासनेचा त्याग करण्याचा प्रघात आहे. तशी मनाची तयारी करून संकल्प सोडावा. याचा अर्थ मनाला हळूहळू वासनामुक्त करण्याची तयारी करणें, म्हणजेच फलाशा सोडून निर्हेतुक कर्तव्यकर्म करीत रहाणें; यानें मन मायेंत गुंतून न रहातां मोक्ष मिळविण्याला तयार होतें.

☆ श्रीदत्तदिगंबर यात्रा कंपनीनें काश्मिर सहलींत ठेवलेल्या उत्कृष्ट व्यवस्थेचें प्रशस्ति-पत्र. ☆

C. K. Patel, M. B. E.,
M. L. C. (UGANDA),
F. A. I. A., F. C. I. I. (LONDON)
BARRISTER-AT-LAW.

Post Box 102
JINJA
Uganda. (B.E. Africa).
Date 1st June 55

I have a great pleasure to certify that Shri Datta Digambar Travelling (Yatra) Co.Poona-2., had given entire satisfaction to our party of six--teen members in our Kashmir Tour conducted by them. The service offered by them in respect of meals,-sightseeing etc.,,along with facilities provided - by them in making our tour most comfortable and - enjoyable as well as the personal attention devoted by their staff was the best,which could be desired. Should any outsider desire to visit places in India at a moderate cost with full facilities,I have no - hesitation in reccommending the services of the said Yatra Co.

I wish them every success in their future endevour.

C.K.Patel

(C.K.Patel)

गयावळाचें प्राबल्य

इतर अनेक क्षेत्रांप्रमाणें येथेंहि गयेचे पंडे असतात. त्यांना गयावळ म्हणतात. हिंदुधर्मीयांची भारतभर क्षेत्रें आहेत, त्यामुळें अखिल भारतांतील हिंदूंचीं एका धर्मामुळें एकता निर्माण झाली आहे. ती टिकविण्याकरितां व बंधुभाव वाढविण्याकरितां या धर्माचा, संस्कृतीचा व क्षेत्रांचा उपयोग होतो; परंतु दुःखाची गोष्ट अशी कीं, ही बंधुता, प्रेम, एकता यांच्या वाढीला पोषक असें वर्तन या पंड्यांच्या हातून घडत नाहीं. त्यामुळें हजारों मैलांवरून निरानिराळ्या ठिकाणांहून एकत्र येणाऱ्या सर्व हिंदूंच्या मनाला एक प्रकारें खेद होतो. हे पंडे अशिक्षित, अज्ञानी, परंपरागत रूढ चालींत मुरलेले व व्यसनी असल्यानें आधुनिक परिस्थितीची, कालमान बदलल्याची, आपल्या धर्मावर परकीय संस्कृतीचीं केवढीं गंडांतरें आलीं आहेत, त्यामुळें आपला समाज कसा विस्कळीत होत चालला आहे, धर्मावरची श्रध्दा कशी नष्ट होत चालली आहे, वगैरे या सर्व गोष्टींची जाणीव या वर्गाला मुळींच नाहीं. तरी यांतील शहाण्यासुरत्या व कर्तबगार व्यक्तींनीं या वर्गाची ही स्थिती पालटविण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे, तसें न झाल्यास हिंदुसमाज, संस्कृति, धर्म याला तर धोका आहेच, पण हा वर्गही नष्ट होऊन जाईल, हें त्यांनीं लक्षांत ठेवावें.

गयावळांच्या अंगीं स्वार्थी, अती लोभी वृत्ति निर्माण झाल्यामुळें त्यांच्याकडून यात्रेकरूंना योग्य मार्गदर्शन, मदत होण्याऐवजीं त्यांना लुबाडण्याकडेच त्यांची दृष्टि वळते. वाटेल त्या थापा देणें, फसविणें, धार्मिक विधी श्रद्धापूर्वक नीट न पाडणें, जेथें तेथें हरएक गोष्टींत पैशासाठीं अडवणूक करणें वगैरे अनेक प्रकारें त्यांचा त्रास होतो. ही ख्याति फार प्राचीन काळापासूनची आहे. त्यामुळें प्राचीन काळीं त्यांना प्रायश्चित्तही फार मोठें मिळालेलें आहे. तरी त्यांचे अजून डोळे उघडत नाहींत हें दुर्दैव नव्हें काय ?

द्वापारयुगांत श्रीरामचंद्र येथें आले असतां त्यांनीं पितरांच्या उद्धारार्थ अनेक दानादिक कृत्यें केलीं. त्यावेळीं गयावळांना रौप्यसुवर्णाचे दोन पर्वत व मधुपयाच्या दोन अक्षय्य वाहत्या नद्या दिल्या. तरी त्यांचा संतोष झाला नाहीं. या अती लोभाचा रामचंद्रांनाहीं राग आला व त्यांनीं शाप दिला. त्यामुळें 'अतिलोभान् विनश्यति' यानुसार मिळालेले रौप्य सुवर्णाचे पर्वत पाषाणाचे बनले. प्रेत पर्वत व राम पर्वत या नांवानें ते प्रसिद्ध आहेत. त्यावर रौप्य सुवर्णाच्या रेषा कोठें कोठें दिसतात.

दोन्ही मधुपयाच्या नद्या गुप्त झाल्या. फल्गु ही दुधाची नदी होती, ती पालथी झाली. त्यामुळें तीवर पाणी नाहीं, पण वाळू खणली असतां आंत प्रवाह आढळतो. म्हणून खड्डे खणतात व त्यांत स्नान, पिंडविसर्जन करतात. मधाची नदी नाहीं, फक्त तिचा प्रवाह जेथून निघाला तें स्थान आहे. त्याला 'मधुश्राव' म्हणतात. असे हे गयावळ लोभी वृत्तीचे आहेत! यांचेकडून 'तेरे पितर स्वरग गये' असा आशिर्वाद मिळाला म्हणजे पितृमुक्ती होते असा अज्ञ भाविक जनांचा समज असल्यामुळें हें गयावळ पैशाचे लोभानें या आशिर्वादाकरितां अडवतात. वस्तुतः गयावळांचा या धार्मिक कृत्यांशीं कांहींच संबंध नाहीं. त्याकरितां भिक्षुक असतात, परंतु रूढीमुळें यांचें प्राबल्य वाढलें असून तें परंपरागत चालू आहे. आपल्या उपाध्यामार्फत सर्व कृत्यें करावींत. या गयावळांचा मुलाहिजा ठेवण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, हें गयावळ व्यसनी असून धर्मज्ञान अगर विद्वत्ता यांच्या नांवानें यांचें आवळ्याएवढें पूज्य. असें असूनही आमचा धर्मभोळेपणा इतका विचित्र कीं, अशा व्यक्तीकडून धर्मविधी करून घेतला कीं पुण्यप्राप्ति होते व नरकांत पडलेले पितर स्वर्गास जातात अशी आमची खुळी समजूत!

येथें मिळणाऱ्या वस्तु

या प्रांतांत दगडी वस्तु चांगल्या मिळतात. यांत दगडी पंचपात्र्या, भांडी, सूर्यकांत मणि वगैरे मिळतात. विष्णुपद व स्फटिकांची माळ मुख्य होत. यात्रा पूर्ण होतांच उपाध्यामार्फत प्रसादाचें विष्णुपद मिळतें.

बुद्धगया

बुद्धगयेला जो रस्ता जातो त्या रस्त्यावर आंब्याचीं, शिंदीचीं व नारळाचीं झाडें आहेत. यामुळें रस्ता नेहमीं छायाच्छादित असतो. गया शहराचेंच उपनगर बुद्धगया होय. गयेहून येथें जाऊन यायला अंदाजें पांच रुपये खर्च येतो. प्राचीन कालीं निरंजना नदीवर उरुबिल्व नांवाचें स्थान होतें, तेंच आजचें बुद्धगया होय.

अडीच हजार वर्षांपूर्वी ज्या बोधिवृक्षाखालीं महात्मा गौतम बुद्धानें मानव जातीच्या दुःखावर उपाय शोधून काढला, तो पिंपळ वृक्ष, ज्या ठिकाणीं आहे तें बुद्धगया हें स्थान मूळ गयेपासून (मातृगया) सात मैलांवर आहे. सर्व बौद्ध धर्मियांची ही काशी आहे.

जगद्गुरू शंकराचार्यांचे मठ जसे भारतभर आहेत तसा येथेंहि आहे. हा मठ पूर्वीपासूनचा असून तो बौद्धांच्या ताब्यांत होता, परंतु शंकराचार्यांनीं बुद्ध धर्माला जिंकल्यामुळें तो आतां त्यांच्या ताब्यांत आहे. या मठावरील हिंदु महंताच्याच ताब्यांत सर्व गांव व बुद्ध धर्ममंदिर वगैरे आहे. त्याचा मोठा वाडा आहे. मठातर्फे अन्नसंतर्पणाहि होतें. येथेंहि धर्मशाळा वगैरे आहेत.



बुद्धमंदिर गया

बुद्ध मंदिर—हें मंदिर २० फूट उंचीच्या चौथऱ्यावर आहे. चबुतऱ्याच्या प्रत्येक कोनावर मुख्य मंदिरासारखेंच एक एक लहान मंदिर आहे. या मंदिराचा जीर्णोद्धार ब्रह्मी बौद्धानीं १४ व्या शतकांत केला. आजची भगवान बुद्धाची मूर्ति त्यांनींच बसविलेली आहे.

हें मंदिर व हें स्थान यात्रा बौद्ध कालांत फार भरभराट होती. परंतु कालांतरानें बुद्धधर्म

भारतांतून नष्ट झाल्यानें या स्थानाला सुद्धां अवकळा प्राप्त झाली. इतकी कीं हें मंदिर भूमीमध्यें गडप झालें. फक्त शिखर तेवढें शिल्लक राहिलें होतें. पण इंग्रज सरकारनें १८८१ सालीं उत्खनन करून याचा जीर्णोद्धार केला. त्यामुळें आतां हें मंदिर सर्व स्पष्ट झालें आहे. याची उंची १७० फूट आहे.

बुद्ध मंदिरांत बुद्धाची विशाल मूर्ति पूर्वेकडे तोंड असलेली व बैठी अशी आहे. मंदिरावर सोन्याचे कळस आहेत. हें मंदिर अडीच हजार वर्षांपूर्वीचें आहे. जवळच बुद्धकुंड आहे. यांत बुद्ध स्नान करीत असे. जवळच दीडशें पावलांवर जगन्नाथाचें मंदिर आहे. मंदिराच्या पश्चिमेस बोधिवृक्ष आहे. या वृक्षाचे दक्षिणेस हिंदु यात्रेकरू पिंडदानविधि करतात, जवळच व्रजासन देवीचें मंदिर आहे.

बोधिवृक्ष——ज्या पिंपळाच्या झाडाखालीं गौतम बुद्धानें ध्यानस्थ बसून तपश्चर्या आरंभिली व त्याला ब्रह्म साक्षात्कार झाला, त्याच पिंपळाला बोधिवृक्ष म्हणतात. याच वृक्षाची एक शाखा अशोकानें लंकेंत पाठविली. तेथेंहि त्या शाखेचा प्रचंड वृक्ष झाला आहे. जेथें जेथें बौद्ध लोक गेले तेथें तेथें त्यांनीं असे वृक्ष लावले व बुद्धाची मूर्ति स्थापन केली. आज जो बोधिवृक्ष (पिंपळ) दिसतो तो बद्धकालीन जरी नसला तरी मूळच्याच स्थानावर आहे, एवढें मात्र खरें. या वृक्षाजवळच सम्राट अशोकानें एक स्तूप उभारला आहे.

तेराशें वर्षांपूर्वी या देशांत एक ह्यूएनस्संग या नांवाचा जो चिनी प्रवासी आला त्यानें या वृक्षाबद्दलची एक आख्यायिका लिहून ठेविली आहे. ती अशी——

" या वृक्षाचीं पानें उन्हाळा असो अगर हिंवाळा असो, कोणत्याहि ऋतूंत झडत नाहींत. बाराहि महिने हा पर्णानीं बहरलेला असतो. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, महात्मा बुद्धानें येथील अवतार कार्य संपवून ज्या दिवशीं निर्वाण केलें तो वर्ष–दिवस जेव्हां येतो त्याच दिवशीं फक्त हा पिंपळवृक्ष संपूर्ण पर्णरहित होतो, आणि लगेंच पुन्हां दुसऱ्या दिवशीं तो पूर्वीप्रमाणें पर्णयुक्त होतो, पुन्हां त्याला ताजीं व सुंदर पानें फुटतात. या वर्षदिनाला बौद्धधर्मीय या वृक्षाच्या छायेखालीं जमतात, त्यावर

दुधाचा अभिषेक करतात. दिवे पाजळतात, फुलें वहातात आणि त्याची कांहीं पानें प्रसाद म्हणून बरोबर घेऊन जातात."

बुद्धावतार—अडीच हजार वर्षांपूर्वी नेपाळच्या सीमेवर कपिलवस्तु नांवाचें नगर होतें. तेथें शुद्धोदन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राणीचें नांव मायावती.वैशाख वद्य अष्टमी पुण्य नक्षत्र (इ.सनापूर्वी५६३) या शुभयोगावर मायावती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. याचें नांव सिद्धार्थ. सिद्धार्थ ज्या वेळीं जन्मला त्याच वेळीं पुढें जो शिष्य झाला तो आनंद व सिद्धार्थांचा आवडता घोडा कंथक जन्माला आले, आणि योगायोग असा कीं, भावी काळांत त्याला ज्या वृक्षाखालीं ज्ञान प्राप्त झालें तो पिंपळ वृक्षही त्याच वेळीं निर्माण झाला. राजानें त्याचें संगोपन उत्तम प्रकारें केलें. विद्याभ्यासाची व्यवस्था केली. तो सकल शास्त्रांत पारंगत झाला. त्याच्यासाठीं सर्व सुखसोयींनीं युक्त असा नवा राजवाडा बांधला. कोणत्याहि प्रकारें सुखांत न्यून पडूं नये म्हणून व्यवस्था केली. त्याला युवराज्याचा अभिषेक केला. महानामा राजाची कन्या यशोधरा हिच्याशीं त्याचा थाटामाटानें विवाह केला. 'हा वैराग्य होऊन घरादाराचा अन् राज्याचा त्याग करील' असें भविष्य त्याच्याविषयीं वर्तविलेलें असल्यानें राजानें त्याच्या दृष्टीला दुःख म्हणून पडूं नये, किंबहुना दुःखाची त्याला कल्पनाहि येऊं नये म्हणून त्याला विलासांत मग्न ठेवलें. २९ वर्षांपर्यंत त्यानें विलास भोगले. तेवढया अवधींत त्याला 'राहूल' नांवाचा पुत्र झाला. सुखोपभोग, पत्नी व पुत्र यांच्या मोहांत तो पार गुरफटल्यानें राजालाही समाधान वाटलें व तो निर्धास्त झाला. पण——

हा **पणच** सर्वांची निराशा करतो. मग राजा तरी त्याला अपवाद कसा ठरणार! विधिघटना वेगळी होती. येथून गौतमाच्या पुढील आयुष्याला निराळें वळण लागावयाचें होतें. एक दिवस सृष्टिसौंदर्य पहाण्यासाठीं तो आपल्या रथांतून बाहेर पडला. निसर्ग पाहून तो फार खुष झाला. 'किती सुखमय आणि सुंदर जग हें....' या कल्पनेंत तो दंग असतांच त्याच्या या कल्पनेचा चक्काचूर होईल असे एकामागोमाग एक अनेक प्रसंग त्याच्या दृष्टिपथांत आले. आणि त्याला धक्काच बसला. (१) म्हातारा मनुष्य पाहून त्याला वाटलें, 'आपल्याहि तेजस्वी शरिराला शेवटीं अशीच

अवकळा येणार तर ?' (२) शरीर-व्याधींनीं तळमळणारा मनुष्य पाहून त्याला वाटलें, 'राव असो रंक असो, शरीर-व्याधी कोणाला चुकत नाहींत.' (३) प्रेत पाहून वाटलें, 'शेवटीं शरिराची ही अवस्था होणार तर !' या तीन प्रसंगांनीं गौतम पार बदलून गेला. त्याच्या विचारांत क्रांती झाली, जरा, व्याधी आणि मृत्यु या त्रिविध दुःखानें जग ग्रासलें आहे. त्याची मुक्तता केलीच पाहिजे. भोगविलासांत राहून हें जमणार नाहीं. त्यासाठीं निर्जन वनांत राहून प्रखर साधना केली पाहिजे. असें ठरवून त्यानें राजवाडा, पत्नी, पुत्र, भोगविलास, राज्य या सर्वांचा एका रात्रीं त्याग केला व जगाला दुःखमुक्त करण्याचें साधन शोधण्यासाठीं मार्गस्थ झाला ! केवढा बलवत्तर त्याग हा ! आणि म्हणूनच गौतम हा गौतम न राहातां 'महात्मा गौतम' ठरला !

कांहीं मार्ग चालून झाल्यावर त्यानें बरोबर आणलेल्या आपल्या सारथ्याला निरोप दिला व आपला कंथक घोडाही त्याचे स्वाधीन केला, पण त्या मुक्या प्राण्यालाही धन्याचा वियोग सहन झाला नाहीं. त्याच्या शरिराला कंप सुटून तो धाडकन् खालीं पडला व त्यानें आपले प्राण धन्याच्या पायीं अर्पण केले !! सारथ्यानेंहि डोळ्यांत अश्रू आणून निरोप घेतला. तो म्हणाला, 'महाराज, आपल्या घरच्या मंडळींना किती दुःख होईल बरं ?' यावर गौतम म्हणाला, 'अरे, सगळ्या जगाचं दुःख मी दूर करणार आहे, त्यांत माझ्या घरच्या माणसांचेंहि दूर होईलच.' गौतमानें राजविलासी वस्त्रें उतरविलीं. साधें हलकें एकच वस्त्र ठेवलें. केस कापून टाकले, आणि पूर्ण बैरागी बनला.

त्यानें पुष्कळ प्रवास केला. अनेकांचा उपदेश घेतला, गुरु केले पण त्याचें कशानेंच समाधान झालें नाहीं. घोर तपस्या केली, शरीर झिजविलें म्हणजे तरी ज्ञानाचा उदय होईल या कल्पनेनें तो फल्गु नदीवर तपश्चर्येला बसला. अन्न वर्ज्य केलें. त्यामुळें त्याचें शरीर वाळून गेलें. इतकें करूनही ज्ञानप्राप्ति झाली नाहीं ती नाहींच. अखेर देहदंडनेनें ज्ञान मिळेल या गोष्टी-वरचा त्याचा विश्वास उडाला. धर्मज्ञान व्हावयाचें तें ध्यानानेंच होईल. आणि ध्यान स्थिर होण्याला शरीरस्वास्थ्य आवश्यक म्हणून त्यानें सात्त्विक माफक आहार घेण्यास पुन्हां सुरुवात केली. हटयोग बंद केला. फक्त ध्यान

व चिंतन मात्र अखंड करावयाचें. कोणताहि विक्षेप आला तरी सोडावयाचें नाहीं असें ठरवून त्यानें एका वृक्षाखालीं ध्यानाला सुरुवात केली. अखेर त्याच्या या श्रमास फळ येऊं लागलें. अज्ञानाचा एकएक पडदा गळूं लागला. सर्व विरोधी शक्तींनीं त्याच्या या कार्यांत विघ्न उत्पन्न केलें. मदनानेंहि प्रयत्न केला. पण गौतम डगमगला नाहीं व आपल्या निश्चयापासून परावृत्त झाला नाहीं. त्याची समाधि भंगली नाहीं. अशा रीतीनें ध्यान, धारणा चालूं असतां वैशाख पौर्णिमेच्या रात्रीचा तिसरा प्रहर संपून ब्राह्ममुहूर्त लागला त्या समयास अचानक गौतमाच्या हृदय मंदिरांत ज्ञानज्योत प्रगटली. त्याला 'बोधी' म्हणजे ज्ञान प्राप्त झालें. जगाला दुःखमुक्त करण्याचें निदान त्याला सांपडलें. आतां तो गौतमाचा 'बुद्ध' झाला ! ज्या पिंपळाखालीं ध्यानस्थ बसला होता तो वृक्ष 'बोधिवृक्ष' म्हणून प्रख्यात झाला. ज्ञान प्राप्तीनंतर १ महिना तो त्या वृक्षाखालींच ध्यानस्थ होता. नंतर तेथें वादळ झालें. पाणीच पाणी झालें. अशा समयीं मुचलिंद नागानें आपलें वेटोळें करून बुद्धाला त्यावर बसविलें आणि आपल्या सात फणांचें छत्र त्याच्या मस्तकावर धरलें. नंतर ब्रह्मा आणि इंद्र प्रगट झालें; आणि त्यांनीं 'भगवान् तुम्हांला जें ज्ञान प्राप्त झालें त्याचा जगभर प्रसार करा' असा आदेश दिला.

यानंतर बुद्धानें सर्वत्र संचार केला. आपल्या ज्ञानाचा प्रचार करून उदात्त आणि कल्याणमय असा धर्ममार्ग जनांना दाखवून दिला. त्याच्या या धर्माचा प्रचार एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाला कीं, आजहि जगांतल्या बऱ्याच मोठ्या भागावर बुद्ध धर्म चालूं आहे. हा महात्मा वयाच्या ८० व्या वर्षीं निर्वाणपदास गेला. हा निर्वाण या दिवसापासून या स्थानाला फार महत्त्व आलें आणि तें 'बुद्धगया' या नांवानें प्रख्यात झालें. हा दिवस बौद्धधर्मांत फार महत्त्वाचा समजला जातो. दर वर्षीं या दिवशीं या बोधिवृक्षाखालीं हजारों भक्त जमतात व पूजाअर्चा करतात.

बरोबर न्यावयाच्या वस्तू

याप्रमाणें प्रयाग, काशी व गया या तीन क्षेत्रांची यात्रा पूर्ण झाल्यावर परततांना पुन्हां काशीस जाऊन श्री काशी विश्वेश्वराचें दर्शन घेऊन मग परतावयाचें. बरोबर प्रयागचें गंगोदक, काशीची अन्नपूर्णेची मूर्ति, शिवलिंग, रुद्राक्ष माळ, काळभैरवाचा गंडा, भांडें व गयेचें विष्णुपद स्फटिकांची माळ इत्यादि वस्तु घ्यावात.

त्रिस्थळी यात्रा

उपसंहार

भारतवर्षातील अत्यंत प्राचीन, सुप्रासिध्द व पुण्यक्षेत्र मानलेल्या प्रयाग, काशी, गया या त्रिस्थळी क्षेत्रांची माहिती पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक, भौगोलिक स्थलवर्णनात्मक परिश्रमपूर्वक मिळविली आहे. सर्व माहिती भिन्न भिन्न मतांच्या वाचकांचा विचार करून लिहिली गेली आहे. ही त्रिस्थळी यात्रेची माहिती साधार अशी असून नवी व जुनी दृष्टी एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे.

त्रिस्थळी यात्रेस निघण्यापूर्वी प्रयाग, काशी, गया या ठिकाणी कोठें उतरावयाचें, प्रत्येक ठिकाणीं यात्राविधि काय काय करावयाचे, प्रेक्षणीय व दर्शनीय स्थळें कोणकोणतीं पहावयाचीं, याचा स्थूल कार्यक्रम अगोदर आंखणें अत्यंत जरूर आहे. प्रत्येक क्षेत्रीं उतरण्यासाठीं धर्मशाळा असतातच, शिवाय आपण ज्या उपाध्यायाकडे उतरावयाचे ठरविले असेल, त्यांच्याकडेहि उतरण्याची सोय बिनखर्चानें होतें. यात्रा किंवा पर्वणीसारख्या प्रसंगीं ही उपाध्याय मंडळी आपल्या यात्रिकांच्या सोयींसाठीं अनेक घरें राखून ठेवतात. क्षेत्रांत गेल्यावर तेथील तीर्थोपाध्ये यात्रिकांना विविध प्रकारच्या गोष्टी, विधि, दानधर्म, स्नान, पूजा, श्राध्दविधि करण्यास प्रवृत्त करतात. तुमची अमुक अमुक मंडळी येथें आली असतांना त्यांनीं अमुक अमुक विधि येथें केले, तेव्हां तुम्हीहि ते करणें आवश्यक आहे " असेंहि सांगून यात्रिकांना तसें करण्यास उद्युक्त करतात. परंतु हा धर्मश्रध्दा, विश्वास व भावनेचा प्रश्न असल्यामुळें तो ज्याचा त्यांनींच सोडविणें अवश्य आहे. तसेंच तेथील मार्गदर्शक व वाटाडे व पंडे अनेक प्रकारच्या दंतकथा सांगतात. आपण चिकित्सकवृत्तीनें व हंसक्षीर न्यायानें त्यांतलें पटेल तें ग्रहण करावें. बाकीचें सोडून द्यावें.

या त्रिस्थळी यात्रेंत श्रीकाशी येथील " श्रीविश्वेश्वर " हे बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक आहे. प्रयागला त्रिवेणी संगम स्नानाचें महत्त्व आहे. गया हे पितृऋणांतून मुक्त होण्यासाठीं श्राध्दाविधि करण्याचें क्षेत्र आहे. इतर यात्रा शक्तीप्रमाणें जरी करतां आल्या नाहींत तरी निदान मनुष्य-प्राण्यानें आयुष्यांत " त्रिस्थळी यात्रा " जरूर करावी, असें आपल्या हिंदुधर्माचें सांगणें आहे. श्रीदत्तप्रभुचरणीं हें " त्रिस्थळी " यात्रा वर्णन अर्पण करून ही लेखमाला संपवितों.

तस्मै श्रीगुरवे नमः

केवळ भारतांतच नव्हे तर पृथ्वीवरील चारी खंडांतील सहस्रावधि तीर्थस्थळांच्या यात्रा करून आलेले, आंतरराष्ट्रीय, जागतिक कीर्तीचे महान् तत्त्वज्ञ, द्रष्टे व साक्षात्कारी सिद्ध-संत न्यायरत्न डॉ. धुं. गो. विनोद यांचा आशीर्वाद माझ्या "अखिल भारतांतील तीर्थयात्रा" या ग्रंथास लाभला, हें माझें परमभाग्य होय. भारताचे 'अध्यात्ममहर्षि' म्हणून पुणें महानगर-पालिकेनें त्यांचा गौरव केला होता. दिल्ली, अहमदाबाद, लंडन, बर्लिन, न्यूयॉर्क, सॅनफ्रॅन्सिस्को, टोकियो, मॅनिला, रंगून, इत्यादि अनेकानेक दूरदूरच्या स्थळीं त्यांचें विश्वशान्ति-विषयक भरींव कार्य सुपरिचित आहे. त्या सर्व ठिकाणीं त्यांचा प्रचंड गौरव झाला आहे.

न्यायरत्न डॉ. धुं. गो. विनोद

अध्यात्म-महर्षि न्या. विनोद यांचें बहुतेक जीवन तीर्थयात्रा करण्यांत गेलें आहे. अलीकडे तर ते असतील तें स्थळ 'एक तीर्थच' होऊन जातें. भारतांतल्या सर्व तीर्थक्षेत्रीं, हिमालयांतल्या बहुतेक सर्व पुण्यस्थलीं कित्येक वेळां, त्यांची यात्रा व निवास झाला आहे. तिबेटांतहि ते जाऊन आले आहेत.

यात्रिकांचीं सुखदुःखें, अडीअडचणी त्यांना पूर्ण माहीत आहेत. आम्हांला व सर्व यात्रिकांना, त्यांनीं श्रीतुकोबांच्या अभंग – अमरवाणीनें एका वाक्यांत हितोपदेश केला आहे. अध्यात्म-महर्षि म्हणतात :–

"जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । ही अखंड ईश्वरसंगतीची भूमिका स्थिर ठेवण्यांत, यात्रा यशस्वी करण्याचें बीज आहे. सर्वेश्वराच्या सान्निध्यांत सर्व सुखसोयींची सहज-सिद्धि आहे."

अध्यात्म-महर्षि विनोद हे स्वतः एक जीवन्मुक्त महा-यात्रिक आहेत. त्या महायात्रेबद्दल त्यांनीं लिहिलेला 'धवलगिरि' हा अमर ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. श्री. विनोबाजी, प्रिं. दांडेकर, गोळवलकर गुरुजी इत्यादि अनेक व्यक्तींनीं न्यायरत्नांचा हा महायात्रा ग्रंथ गौरविला आहे. नित्य मननीय व तीर्थयात्रेच्या वेळीं जवळ ठेवल्यास शान्ति, समाधान, स्फूर्ति व संरक्षण देणारा असा हा पवित्र ग्रंथ आहे. हा स्वानुभाव आहे म्हणून मी सुद्दाम निर्देश करीत आहें. – *दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी*

"अखिल भारतांतील तीर्थयात्रा" – भाग १ ते ४ चार (मूल्य रु. ५)

प्राप्तिस्थान :– दत्तदिगंबर यात्रा कंपनी, गोखले हॉलसमोर–पुणें २

या ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत

REFBK-0014280

REFBK-0014280

दत्त दिगंबर यात्रा कंपनीच्या विद्यमानें

अनुकूल हवामानांत, सर्वांगसुंदर व्यवस्थेखालीं भारतांतील परमपवित्र पुण्यक्षेत्रें, निसर्गरमणीय स्थळें, बहुविध स्थापत्यकलांनीं नटलेली शहरें व औद्योगिक स्थानें यांसह यात्रासहली नियोजित केल्या जातात, त्यांतील निवडक यात्रासहली खालीं दिल्या आहेत.

१. काशी-हरद्वार-जगन्नाथपुरी यात्रा – यात्रेंत आग्रा, मथुरा, दिल्ली, कुरुक्षेत्र, भाक्रा-नानगल, हरद्वार ऋषिकेश, अयोध्या, प्रयाग, काशी, गया, टाटानगर, कलकत्ता, जगन्नाथपुरी, विशाखापट्टण, राजमहेंद्री हैद्राबाद, गाणगापूर ही स्थळें.

२. रामेश्वर-कन्याकुमारी यात्रा – गाणगापूर, तिरुपति, गिरिबालाजी, मद्रास, शिवकांची, विष्णुकांची, पक्षीतीर्थ, बंगलोर, श्रीरंगपट्टण, म्हैसूर, त्रिचनापल्ली, श्रीरंगम, मदुरा, त्रिवेंद्रम, सुचिंद्रम, कन्याकुमारी, तेनकाशी, कोट्टालम फॉल्स, रामेश्वर, धनुष्यकोडी

३. सौराष्ट्र-द्वारका-सोमनाथ यात्रा – बडोदें, आनंद, डाकोर, अहमदाबाद सोमनाथ, जुनागढ, सुदामपुरी, जामनगर, द्वारका, राजकोट, यातृगया-सिद्धपूर, माऊंट अबू.

४. राजस्थान-पुष्कर-नाथद्वार यात्रा – बडोदें, अहमदाबाद, अजमेर, पुष्कर, जोधपूर, जयपूर, नाथद्वारा, एकलिंगजी, उदेपूर, चितोडगड, उज्जयिनी, महांकाळेश्वर.

५. बदरीकेदार-नारायण यात्रा – हरद्वार, ऋषिकेश, देवप्रयाग, रुद्रप्रयाग, गुप्तकाशी गौरीकुंड, श्रीकेदारनाथजी, उषामठ, विष्णुप्रयाग, पांडुकेश्वर, श्रीबदरीनारायण.

६. मराठवाडा-वेरूळ-अजंठा सहल – औरंगाबाद, वेरूळ, घृणेश्वर, दौलताबाद, अजंठा, पैठण, औंढ्या-नागनाथ, परळी-वैजनाथ, अंबाजोगाई, हैदराबाद, श्रीशैल्य.

७. गोकर्ण-महाबळेश्वर-श्रीशैल्यमल्लिकार्जुन यात्रा – गोकाक धबधबा, गोकर्ण-महाबळेश्वर, हरिहर, दावणगिरी, गिरसप्पा धबधबा, श्रवणबेलगोळा, म्हैसूर, बंगलोर, श्रीशैल्ययमल्लिकार्जून विजयनगर, हंपी विरूपाक्ष, तुंगभद्रा डॅम.

८. भूनंदनवन काश्मीर-सहल – आग्रा, दिल्ली, भाक्रा-नानगल, अमृतसर, जम्मू व्हेरीनाग, श्रीनगर, पहलगांव, चंदनवाडी, गुलबर्गा, खिलनमर्ग, अच्छाबल, कोकरनाग नगीन, दल, मानसबल सरोवरें, शालीमार, निशात, चश्मेशाही.

९. निसर्गरम्य गोवा सहल – गोकाक फॉल्स, कवळें, (शांता दुर्गादेवी) मंगेशी, (श्रीमंगेश) सांखळी, मडगांव, म्हापसे, पणजी, मार्मुगांव बंदर, वास्को द गामा.

१० नेपाळ पशुपतिनाथ यात्रा – प्रयाग, काशी, पाटणा, देवपाटण, काटमांडू, भद्गिपूर, ललितपूर, पशुपतेश्वर.

११. काश्मीर-अमरनाथ यात्रा-सहल – वरील नं. ८ मध्ये नमूद केलेली सर्व स्थळें शिवाय पहेलगांवमार्गे श्रीअमरनाथजींची यात्रा श्रावण (ऑगस्ट) महिन्यांत.

याशिवाय आपल्या इच्छेप्रमाणे निवडक स्थळें घेऊन यात्रा-सहल काढावयाची असेल तर त्या बाबतींत आमचा लल्ला घ्या. योग्य खर्चांत, अपेक्षेप्रमाणें योग्य त्या व्यवस्था ठेवून ती सहल आम्ही पुरी करून देऊं.

फोन नंबर ५६०९०

तारेचा पत्ता : 'प्रवासी', पुणें

दत्तदिगंबर यात्रा कंपनी,

'श्रीदत्तनिवास', लक्ष्मी रोड, पुणें २

पवित्र भारतांतील तीर्थक्षेत्रांचें दर्शन घडाविणारा,
न्या. धुंडीराजशास्त्री विनोद यांनीं गौरविलेला ग्रंथ –

अखिल भारतांतील तीर्थयात्रा

(त्रिस्थळी, चारधाम, सप्तपुरी गंगोत्री-यमुनोत्रीसह)

अनेक क्षेत्रांतील मंदिरांची व देवतांचीं छायाचित्रें, मार्गदर्शन माहिती, नकाशे, आकर्षक मुखपृष्ठ व मजबूत बांधणी असलेलें

भाग १ ते ४, किंमत ट. ख. सह रु. ५–७५ पाठवून मागवा.

श्रीकाशी-विश्वेश्वराचें मनोदय दर्शन घडाविणारें

त्रिस्थळी यात्रा-वर्णन

(प्रयाग, काशी, गया या तिन्ही क्षेत्रांचें वर्णन)

प्रयागचा त्रिवेणी संगम, गंगेवरील मणिकर्णिका घाट, श्रीकाशी-विश्वेश्वर व मंदिराच्या सुवर्ण कळसाचें दर्शन, गयेचें विष्णुपद दर्शन आदि छायाचित्रें. संपूर्ण वाचाल तर तुम्हास काशी-यात्रा केल्याप्रमाणें त्यांतील वर्णन वाटेल.

किंमत ट. ख. सह रु. २–२५ फक्त, आजच आपली प्रत मागवा.

बदरीकेदार-नारायण यात्रा-वर्णन
भूनंदनवन काश्मीर सहल वर्णन

या दोन्ही पुस्तकांची किंमत ट. ख. सह रु. ३–५० फक्त.

वरील सर्व पुस्तकांची मागणी खालील पत्त्यावर करा :

दत्तदिगंबर यात्रा कं., गोखले हॉलसमोर, पुणें २

[केसरी मुद्रणालय, पुणें २]